म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भू-प्रवास
सं. क्र. १०५

REFBK-0029381

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
क्र. ८९४
२९३८९
२।२।९८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

भू-प्रवास
८९४
२९३८९
२।२।९

# गोष्टी देशांतरीच्या

REFBK-0029381
REFBK-0029381

९१०.४
बापट

मुद्रक
कुमुद करकरे
साधना प्रेस
४३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

प्रकाशक
साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

पहिली आवृत्ती :
११ जून १९९७, साने गुरुजी पुण्यतिथी

© वसंत बापट

मूल्य
रु. १००/-

चित्रे / मांडणी
चंद्रमोहन कुलकर्णी

मुखपृष्ठ
चंद्रमोहन कुलकर्णी

# गोष्टी देशांतरीच्या

वसंत बापट

**साधना प्रकाशन**
४३१ शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

मुशाफरीने माणूस माणसाळतो. तो आपला शिकारी स्वार्थ आणि दुष्ट पूर्वग्रह सोडून देतो. जेवढ्या नद्या तो ओलांडतो तेवढ्या खंदकांच्या पलीकडे जातो. जेवढ्या राज्यांच्या सीमा तो उल्लंघून जातो तेवढे तट तो मोडून टाकतो. जेवढी क्षितिजे तो छेदतो तेवढ्या त्याच्या शृंखला तुटतात. आणि जेवढ्या शहरा-गावांतून तो राहतो तेवढी नवी दालने त्याच्या वाड्यात उगवतात.

# अनुक्रम


## अमेरिके, अमेरिके, दार उघड!

१. नवकोट नारायण निसर्ग! ................२
२. लिंकन आपला सख्खा सोयरा .............८
३. विदेशात राखायचे स्वदेशाशी इमान! ...... १७
४. ते तसे, आम्ही असे .................. २४
५. बाह्यरंग, अंतरंग... .................. ३३
६. काळ नदीत बुडणारी तुमची आमची लेकरे . ४१
७. धर्मभेद बरे पण चर्मभेद भयंकर ......... ४८
८. बर्फातले बांफ, तिथे गंधकाची वाफ ...... ५४

---

## हाय् ऑस्ट्रेलिया, हॅलो न्यूझीलंड

१. नवलपरीचे रंगसंकुल .................... ६२
२. सिडनी नगरी बडी बाका ............... ७०
३. देखते रहना, काय काय नि किती! ...... ७७
४. थॅंक्यू पेंग्विन, थॅंक्यू कुक्! ............. ८२
५. फळांचे सुगंधीं मदिरेची धुंदी ............. ८८
६. सोनकिनारा ते समुद्रसेतू ................ ९२
७. जळी सप्तरंग आनंदतरंग ............... ९७
८. बाय ऑस्ट्रेलिया, हाय न्यूझीलंड ........ १०४



# नवकोट नारायण निसर्ग

अमेरिकेत सर्वांत श्रीमंत कोणी असेल तर तो निसर्गच. सर्वांत अधिक प्रेक्षणीय आहे तोही निसर्गच. भौतिक विकासाच्या रेट्याखाली आणि दिमाखदार दिखाऊपणाच्या भपक्यापुढे अमेरिकेतली सृष्टी दबलेली नाही, तिने हार मानलेली नाही.

सारे कसे पुष्कळ पुष्कळ. जे हिरवेगार आहे तेही पुष्कळ आणि जे वैराण आहे तेही पुष्कळच. कॅलिफोर्नियाचा काही भाग आणि ॲरिझोना म्हणजे रेताड, वैराण, उजाड असल्या विशेषणांची अधिष्ठाने आणि तरीही निसर्गाची विचित्रे तुमची नजर केव्हा खेचून घेतील, सांगता येत नाही. कॅक्टस ऊर्फ निवडुंग. ॲरिझोनात त्याला निवडुंगेश्वर किंवा निवडुंगोबा तरी म्हटले पाहिजे. एकेक निवडुंगोबा दोन दोन पुरुष सरासरी उंचीचा. नाहीत त्याला पाने, फुले किंवा रसाळ बोंडे. असली तरी असून नसल्यासारखी. प्रचंड चकलीपात्रातून निघाल्यासारखे या निवडुंगांचे देह. देह म्हणजे एक धड. त्याला दोन चार पाय किंवा हात. बाकी सगळ्या वनस्पतींना जराही जागा न देता शस्त्रसज्ज योद्ध्यासारखे निवडुंगोबा उभे. केवळ कबंध. पाहणाऱ्याचे मन भयचकित करणारे पण त्यांच्या आकृत्या मात्र चित्रात रेखाटल्यासारख्या रेखीव. वाळवंटात हे निवडुंगोबा चिलखतधारी, शस्त्रसज्ज, शापित, शिरोहीन शिपायांच्या पाषाणमूर्तीसारखे उभे आहेत. गंमत म्हणजे असे उघडेबोडके असूनही केवळ आकार विशेषांमुळे ते आपले लक्ष वेधून घेतात. प्रवासी आपल्याकडे वळावेत म्हणून हे प्रदेश जी पोस्टर्स काढतात त्यांत प्रवाशांना हाक मारण्यासाठी या विचित्र ऊर्ध्वबाहूंची योजना केलेली असते.

हा कसला निसर्ग, असे कोणी म्हणेल तर त्याने मात्र जरा अमेरिकेच्या मध्य प्रदेशापर्यंत मजल मारली पाहिजे. त्या बाजूला ग्रँड कॅन्यॉन नावाचे अद्भुत त्याला झपाटून टाकेल. हा उलटा पर्वत आहे! सपाटीचा भूप्रदेश मुख्य मानला तर डोंगर कसे त्याच्याहून अधिक उंच असायला हवेत. पण

इथे कोलोरॅडो नदीने भूमी खोदत खोदत खोल खोल दऱ्या निर्माण केल्या आहेत. त्यामुळे नदीच्या दोन्ही काठांवर पर्वतांचे विचित्राकार उभे राहिल्याचा भास होतो. त्यालाच म्हणायचे ग्रँड कॅन्यॉन! पण या उलट्या पर्वतांत खापे काय पडले आहेत, त्यांत मुरमाडे काय तयार झालेली आहेत, त्यांत तऱ्हेतऱ्हेचे रंग काय झळकताहेत! या सर्वांच्या पायथ्याशी पाताळाचा शोध घेण्यासाठी नदी खोल खोल जमीन पोखरत शतकानुशतके वाहते आहे.

निसर्गाच्या चिरंतन रूपांचे कौतुक करावे तेवढे थोडेच. पण ऋतुमानाप्रमाणे निसर्गाचे जे बदलणारे रंगढंग असतात, त्यांची नवलाईही काही न्यारीच! थंडीने पाणी गोठते. पण म्हणजे काय समुद्रानेही गोठावे? समुद्रासमान असणाऱ्या सरोवरांनीही गोठून जावे आणि त्यांचे चक्क आरसे व्हावेत? मग नायगाऱ्याने काय करावे? नायगाऱ्याकडे कितीही वेळ, कितीही दिवस, कितीही महिने, कितीही वर्षे टक लावून कोणी बसला तरी नायगाऱ्याचे पाणी धो-धो कोसळतच असते. त्याला खळ नाही, चढउतार नाही. जसे काही खाली कोसळते तेच पाणी कोणी अदृश्य शक्ती अदृश्य पंपांच्या मदतीने पुन्हा वर चढवते आणि म्हणून धबधबा अखंड कोसळतच राहतो. पण समजा, शून्याखाली ६० अंश इतके तापमान घसरले आणि धबधबाही गोठला तर? छट्! नायगारा कसा गोठेल? असे म्हणतात की जुन्याजाणत्या लोकांच्या स्मरणात आहे त्याप्रमाणे एकदा आणि फक्त एकदाच नायगारा गोठला होता. म्हणजे काय झाले असेल? वरून खाली झेप घेणारे पाणी अचानक मधेच स्तब्ध झाले असेल? एक काचेची खडबडीत भिंत तयार व्हावी तसे दृश्य नायगाऱ्यात दिसले असेल? तळाशी उसळणारे कोट्यवधी तुषार आकाशगंगेतील तारकांच्या चुऱ्याप्रमाणे अधांतरी तरंगले असतील? आणि हे सारे किती वेळ? किती वेळ थांबला असेल पाणी नावाच्या महाभूताचा अखंड घोष! अकस्मात अवतरलेल्या विलक्षण शांततेमुळे किती विचित्र वाटले असेल? माणसांनाच नव्हे तर पक्ष्यांना आणि कीटकांनाही? मला वाटते नायगारा एकदाही गोठला नसेलच. पृथ्वीचे भ्रमण क्षणभरही थांबत नाही तसा नायगाऱ्याचा प्रवाहही अविश्रांतपणे धो धो कोसळतच असणार. कारण नायगारा आहे निसर्गाच्या श्रीमंतीचा निखालस, निरपवाद पुरावा!

निसर्गसौंदर्य म्हटले की त्याच्या विलासाच्या खुणा चंद्र आणि चांदणे, नदी-निर्झर-समुद्रांचे पाणी आणि वन-उपवनांतील हिरव्या हिरव्या वृक्षवेलींवरील फुलाफळांचे बहार यांतूनच मुख्यतः आपण पाहतो. गुलाबांचे किंवा शेवंतीचे ताटवे, हजारो रानफुलांचे वाऱ्यावर झुलणारे दाट झुबके, वसंत ऋतूची द्वाही फिरवणारे रंगीबेरंगी फुलांनी लहडलेले वृक्ष... ही सगळी निसर्गाच्या वैभवाची राजचिन्हे आहेत असे आपल्याला वाटते. पण अमेरिकेतला निसर्ग असा श्रीमंत आहे बेटा की हिवाळ्याच्या पूर्वरंगात म्हणजेच शरद-हेमंत यांच्या सीमारेषेवर अमेरिकेत वृक्षांची पर्णशोभा अक्षरशः फुलांना लाजवून सोडणारी असते. या मोसमाला म्हणतात 'फॉल'. फॉल आला की एका रात्रीत रानेच्या राने कात टाकतात. पानापानांवरचे रंग जादू झाल्यासारखे बदलून जातात. आता हिरवट पाने, काळपट पाने, करडी पाने, राखाडी पाने, तपकिरी पाने, भुरकट पाने, मातकट पाने असली गरिबीची वेषभूषा वृक्ष-वनस्पतींनी भिरकावून दिलेली असते, आणि हळदी, केशरी, लिंबवर्णी, सोनेरी, तांबूस, लालचुटुक, गुलबाशी, कुसुंबी अशा उत्सवी रंगांचे पर्णसंभार वृक्षावृक्षांवर दाटलेले दिसतात. पाहावे तिकडे रंगपंचमीच सजलेली दिसते. फुलांच्या गमजा नकोत, हम भी कुछ कम नही असे निळ्याभोर आकाशाला बजावण्यासाठी असंख्य वृक्ष आपल्या कुंकमपताका वाऱ्यावर फडकवीत असतात.

या आव्हानाला फुलांचा दिमाख मिरवणाऱ्या वृक्षांपाशी उत्तर आहे, पण त्याच्यासाठी चेरी ब्लॉसम सीझनपर्यंत थांबायला हवे!

एप्रिल महिन्यात वॉशिंग्टनचा परिसर अभूतपूर्व सौंदर्याने नटतो. कारण एकच : चेरी ब्लॉसम रंगात आलेले असतात! महायुद्धात पराभूत झालेल्या जपानने अमेरिकेला दिलेली ही बहुमोल खंडणी आहे. आता ही अमेरिकेची चिरंतन जायदाद झाली आहे. कालांतराने इतिहास विस्मरणाच्या दाट अंधारात नाहीसा होईल; पण भूगोल कसा पुसला जाईल? पृथ्वीभोवती ऋतूंनी धरलेला फेर शाश्वत काळ चालणारच आहे; आणि प्रत्येक ऋतूच्या आगमनासरशी सृष्टीचे रंगविलास तसेच होत राहणार आहेत. शतकानुशतके चेरी ब्लॉसम बहरणारच; आणि त्यांचे वैभव पाहण्यासाठी फुलवेडी माणसे आसुसल्यासारखी फुलांच्या मुलखात फेरफटका करायला जाणारच!

फुलांचे कौतुक सर्व देशांत आणि सर्वांनाच असते. पण पानांचे कौतुक?

होय, चक्क पानांचे कौतुक! 'फॉल'मध्ये रायाच्या राया, रानेच्या राने रंगदार पानांनी सजणार आहेत, एवढ्यावरच शौकीनांचे समाधान होत नाही, ही रंगशोभा सूर्योदयाच्या आधी अर्धा तास पाहिली, तर खरे 'नेत्र निर्वाण' लाभते, हे रसिकांना माहीत आहे. म्हणून महाबळेश्वरला अगर बिहारमध्ये 'नेतरहाट'ला सूर्यास्त पाहण्यासाठी अर्धा अर्धा तास टपून बसावे लागते; कौसानीला हिमालयाच्या रांगांवरून परावर्तित होणारे कोवळे ऊन्ह पाहण्यासाठी सूर्योदयापूर्वी क्षितिजावर टक लावून बसावे लागते; किंवा कन्याकुमारीला एकाच वेळी सूर्यास्त आणि चंद्रोदय पाहण्यासाठी दोन समुद्रांच्या संगमावर, मुहूर्ताची वेळ साधून पौर्णिमेला टिपण साधावे लागते; तसे अमेरिकेतल्या 'फॉल'मध्ये पानांची रंगपंचमी सर्वांत सुंदर अवस्थेत पाहण्यासाठी सूर्योदयापूर्वी अर्धा तास सुयोग्य स्थळी अदृश्य माचणीवर बैठक जमवावी लागते, टिपण साधावे लागते. मगच हळदुल्या, नारंगी, लालवट, कुसुंबी, केसरिया पानांच्या दाटीला हळुवार हात लावणाऱ्या प्रकाशामुळे त्यांचे कवळे रूप कसे राजसवाणे होते, लसलस करू लागते, ते समजते!

अमेरिकेतले वृक्षकौतुक वेगळेच आहे. वृक्ष वनांतले, म्हणून अस्ताव्यस्त आणि प्रचंड. वृक्ष उपवनांतले, म्हणून विविधाकार आणि उत्तम पोसलेले. वृक्ष अंगणातले, वृक्ष परसांतले. छायाबहुल वृक्ष-रस्त्यावर कमानी रचणारे. सर्वांच्या पायातळी अतिविशाल हिरवेहिरवेगार गालिचे. प्रमाणात रेखलेली अनाम फुलांची वेलपत्ती.

मला वाटते, मशागत न करता जे भाताचं पीक प्राचीन भारतात येई, त्याला देवभात (नीवार) म्हणत. अमेरिकेत निगराणी न करता बेफाम वाढणारी वनराई नांदत असते, तिला भाविक माणसांनी 'देवराई'च म्हणायला हवे!

'पैशाकडे पैसा जातो' अशी आपल्याकडे म्हण आहे. अमेरिकेत सर्वच क्षेत्रांत विपुलतेकडे विपुलता जाते, असे निःसंशय म्हणता येईल. जे पिकते, ते उदंड; जे विकते, ते प्रचंड. जे फुलते ते भरभरून; जे फळते ते रसरसून. निसर्गाची कृपा अशी की निसर्गाचे युगानुयुगांचे साथीसोबती जे प्राणी, तेही अमेरिकेत बख्खळ आहेत. अवाच्या सवा आहेत! 'फॉल'च्या सुमाराला मृगवंश भलताच फोफावतो. हरणेच हरणे! काही

शहरांतून तर शहराच्या सीमेवरून जाणाऱ्या बिदीमधून हरणांचे कळपच्या कळप धावत असतात. 'नका रे हरणे मारू... त्यांचा निर्वंश होईल'– असे आपण आपल्या देशात कळवळून म्हणतो आणि त्या कळवळ्याची गरजही आहे. पण नुकत्याच संपलेल्या हरणांच्या 'शिझन'मध्ये हरणांची संख्या अमेरिकेत एवढी प्रचंड वाढली की त्यांच्या शिकारीला परवानगी दिल्याशिवाय अमेरिकन शासनाला गत्यंतरच नव्हते. तरी कनवाळू होऊन सरकारने या शिकारीवर मर्यादा घातली. मर्यादा काय माहीत आहे? 'या वर्षी फक्त दहा लाख हरणे मारण्यास परवानगी आहे!'– आता ही मारलेली हरणे कोण मोजते, माहीत नाही. बरे, या हरणांना 'गरीब बिचारी– वगैरे म्हणण्यातसुद्धा अर्थ नाही. त्यांतले काही काळवीट तर असे दांडगे आणि मस्तवाल की ते रस्त्यांतून जाणाऱ्या मोटरींवर हल्ले चढवतात! मोटरींच्या काचा कुणी लावून घेतलेल्या असल्या, तर आपल्या 'शिंगदार' डोक्यांनी ढुशा देऊन ते काचांचा चुराडा करून टाकतात. तात्पर्य– हरणेही हिंस्र असू शकतात!

– बाकी हरणांनाच बोल कशाला लावा! अमेरिकेतल्या प्रचंड उद्यानांतून ज्या खारी हिंडतात, त्यांची देखील भीतीच वाटते. एकतर त्या मुंगसाच्या दीडपट मोठ्या असतात; त्यांचा रंग काळाकुट्ट असतो. रामाची बोटे पाठीवर उठलेली खार म्हणजे त्यांत 'फॉरिनर'च समजली पाहिजे! काळ्या खारींचे डोळे रानमांजरासारखे वाटतात. आपल्या इवल्याशा हातांत भुईमुगाची शेंग धरून चिमुकल्या जिवणीत ती कोंबायची आणि मग भितुरड्या डोळ्यांनी इकडे तिकडे पाहत ती कशीतरी कुरतडायची; हे अमेरिकन खारींना मंजूर नाही. फरच्या कोटाच्या कॉलरएवढी गुबगुबीत शेपूट लबालबा हलवीत या महाकाय खारी झाडावर चढतात आणि तुरुतुरू पळतात, त्या आपल्या खारीसारख्याच; त्यांची घरेही झाडांच्या ढोलीतच खुबीदारपणे केलेली असतात. पण त्या खातात मात्र अचाट. मिळेल ते फस्तच करतात. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान करू शकतात.

पण अमेरिकनांना याची चिंता नाही. पिकते ते इतके विपुल, की खारींनी खाऊन खाऊन फार मोठे नुकसान थोडेच होणार आहे!

०००



# लिंकन-आयला सख्खा सोयरा

आपल्या देशात विमानप्रवास म्हणजे कपिलाषष्ठीचा योग. सटीसामासी घडून येणारी अविस्मरणीय घटना आणि अमेरिकेत?

तुझी माझी धाव आहे विमानातून विमानात, हा अगदी नित्याचा खाक्या. कधी कधी या विमानप्रवासाचा माणसाला कंटाळा येतो. आता असं म्हणणं म्हणजे कुणाला तरी ढोंग वाटेल. पण हे अगदी खरं आहे. मला तर वाटतं, आपण जेव्हा विमानातून जातो तेव्हा प्रवास म्हणजे आपलं गाठुडं इकडून तिकडे नेऊन टाकायचं, मालवाहू मोटारीनं पाठवलेल्या बोजासारखं. आपण जेव्हा आगगाडीतून जातो तेव्हा गाडी जर एकदम फास्टम् फास्ट असेल तर जवळजवळ असाच प्रकार असतो, पण जमिनीवरून सरपटत असल्यामुळे वृक्षवेली, खेडीपाडी, माणसंकाणसं यांची ओझरती तरी दर्शनं होतात. गाडी जर धीमी असेल— म्हणजे स्टॉपिंग ॲट ऑल स्टेशन्स अँड ऑल्सो इन् द मिड्ल— आणि आपल्याला जर वेळ भरपूर असेल तर अधिक मजा येते. मात्र कोणत्या स्टेशनवर काय खावं, काय प्यावं याची माहिती पक्की असली पाहिजे. सगळ्यात छान म्हणजे चाकावरून जगाची चक्कर! हवं तेव्हा निघावं, हवं तेव्हा पोचावं. कधी सुसाट सुटावं, कधी डकाव् डकाव् रमतगमत जावं. कधी हे पाहण्यासाठी किंवा ते पाहण्यासाठी वाट वळणाची पत्करावी. कधी गावकरी मंडळींशी गप्पाटप्पा कराव्या— तात्पर्य, संपूर्ण यात्राभर सुख घेतघेत जावं.

पण हे जमावं कसं? कारण आमचा कार्यक्रम असा की आज पश्चिम किनाऱ्यावर कॅलिफोर्नियात तर उद्या दक्षिणमध्य अमेरिकेत. मग परवा एकदम उत्तर दिग्विजय. आयुर्विम्याला जसा पर्याय नसतो तसा

विमानप्रवासाला तिथे पर्याय नाही. पण अचानक कधी कधी वेगळा योग येतो. सेंट लुईसहून ग्रे हाउंड वसने मी निघालो गेल्सवर्गला. ग्रे हाउंड ही अमेरिकन एष्टी – पण जरा कमी कष्टी. पोचेपोचेपर्यंत रात्र झाली. गेल्सबर्गला माझं हक्काचं घर होतं. के. नारायण काळ्यांचा मुलगा अशोक आणि त्याची वायको अजिता, मुंवईच्या डॉ. दिवेकरांची मुलगी– दोघेही 'साधना'चे लेखक. अजिता तर छोटी असल्यापासून आपली दोस्तच. मुख्य म्हणजे मला अत्यंत आवडणारं असं एक प्रलोभन त्यांनी माझ्यापुढे ठेवलं होतं. परतीचा प्रवास ती दोघंही आपल्या मोटरनं घडवणार होती. गेल्सबर्ग ते सेंट लुईस. या रस्त्यावरच आहे स्प्रिंग फील्ड.

लक्षात आलं ना, स्प्रिंग फील्ड. साधंसुधं नव्हे, अब्राहम लिंकनचं गाव. आयुष्यभर ज्यांच्याकडे खास आवडीचे नायक म्हणून पाहिलं त्यांत अर्थातच अब्राहम लिंकनचं स्थान आहे. लिंकनच्या गावी आपण जाणार या कल्पनेनंच मनातल्या मनात पुलकित का काय ते, झालो होतो.

अब्राहम लिंकन. आम्ही त्याला प्रेमानं ॲब लिंकन म्हणतो, हा मोठा अमेरिकन नेता होता. अमेरिकेच्या मोठ्या कठीण काळातला राष्ट्राध्यक्ष होता. अमेरिकेची छकलं उडू न देता यादवीचा निर्धारानं सामना करणारा आणि 'मानवाचे अंती एक गोत्र' असे मानणारा महान मानवतावादी होता ही त्याची ख्याती सर्वश्रुतच आहे. पण मला लिंकनच्या दुसऱ्याच काही गुणांमुळे त्याच्याबद्दल प्रेम वाटतं. त्याला वशिलेबाजीचा तिटकारा होता. त्याच्या ठायी निखळ प्रामाणिकपणा होता. तो अतिशय साधा होता आणि राजकारण्यांमध्ये क्वचित् आढळणारी मर्मग्राही विनोदबुद्धी त्याच्यापाशी होती. लिंकनची आणखी एक थोरवी म्हणजे मनुष्यमात्राच्या सर्वांगीण विकासाचा तो सतत विचार करीत असे. आपल्या मुलाच्या शाळेच्या हेडमास्तरांना महात्मा लिंकनने जे पत्र लिहिलं आहे त्यात जीवनाच्या समग्रतेचं त्याला सतत घडत असणारं दर्शन आपण स्पष्टपणे पाहू शकतो.

मला साहजिकच विलक्षण उत्सुकता होती– लिंकन कुठे, कसा राहत होता? त्याचं घर कसं असेल? केवढं असेल? प्रासादतुल्य असेल का? सामर्थ्यसंपन्न अमेरिकेच्या वैभवाची खूणगाठ ते घर पटवीत असेल का?

आदल्या दिवसापर्यंत गेल्सवर्गमधलेच बाकीचे कार्यक्रम पार पडले. रात्री झोपतेवेळीही मी मनातल्या मनात लिंकनच्या घराचाच जसा काही धोशा घेतला होता. त्याच्या पायी मी एक मूर्खपणा करून बसलो. गेल्सबर्गच्या जवळच जागतिक कीर्तीचा अमेरिकन कवी कार्ल सँडबर्ग याचंही घर राष्ट्रीय स्मारकासारखं जपून ठेवलेलं आहे, ते मी पाहायला हवं होतं. पण माझं मन लहान मुलासारखं एकच हट्ट घेऊन बसलं होतं– मला लिंकनकडे जायचंय!

गाडीने एक सफाईदार वळण घेतलं आणि ती स्प्रिंग फील्डमध्ये शिरली. स्प्रिंग फील्ड नावाप्रमाणेच हिरवळींच्या मैदानांनी व्यापलेलं आहे. गाव नेटकं आणि टुमदार आहे. हेच गाव लिंकननं आपल्या निवासासाठी का पसंत केलं याला काही तर्कसमर्थ कारण असेलही, हे न बाजाराचं गाव, न जादा गजबजलेलं, न राजरस्त्यावर मिरवणारं, पण न शुद्ध अज्ञातवासात राहणारं. साध्यासीध्या लिंकनला शिकागो फार जवळ नव्हे, फार लांब नव्हे अशी जागा हवी असावी. म्हणून त्यानं निवडलं असावं हे स्प्रिंग फील्ड.

अनेक एकर क्षेत्रफळाच्या विस्तृत हिरवळीवर लिंकनचं सार्वजनिक स्मारक उभं आहे. त्याच्यासारख्याच शेलाट्या बांध्याचा आणि ताठ मानेचा अग्रदार स्तंभ आपल्या अनलंकृत दिमाखात उभा आहे. तेच त्याच्या उत्तुंग व्यक्तित्वाचं स्मारक. जनसामान्यांच्या समजुतीसाठी स्तंभाच्या पायथ्याशी लिंकनचा पंचरसी पुतळा बसवलेला आहे. या स्मारकाच्या मागे एक बेतशीर स्मृतिगृह बांधलेलं आहे. त्यात लिंकनच्या आठवणी जपणारी चित्रं आहेत आणि ऐतिहासिक महत्त्वाचे शब्दही कोरून ठेवलेले आहेत. हे सारं पाहून झाल्यावर मात्र पुन्हा बाहेर यावं, हवं तर स्मृतिगृहाच्या सौधावर जावं, हवं तर प्रांगणातच थांबावं. उंच उंच वृक्ष अंतराअंतरावर आब राखून उभे दिसतील. पायतळी हिरवी मखमल आणि माथ्यावर निळा चांदवा. ऊन सौम्य आणि सुखकर. हवा चंद्रशीतल थंडाव्याची. ही जागा माणसांना म्हणते,

*या बांधवांनो, चहूंदिशांनी या.*
*कुबट तटभिंतींनी कोंड्या केलेल्या*
*बंदिस्त बंदिशाळा फोडून टाका.*

*मोकळ्या हवेच्या वारूवर*
*आपल्याच आकांक्षांची अदृश्य निशाणे*
*फडकवीत या.*
*मनुष्यमात्राच्या स्वातंत्र्याची गाणी*
*मुक्तकंठ आळवीत या.*
*मानवाच्या विशाल गोत्रामध्ये*
*ज्याला जे मिळायला हवे ते मिळो.*
*अन्यायाने कोणाला काही नाकारले गेले*
*तर मात्र शस्त्र उपसावे लागेल.*
*माणूस गोरा आहे की काळा,*
*तांबूस की पिवळा,*
*त्याचे आपले नाते असते हे विसरू नका.*

जागा बोलतात का? त्या झपाटलेल्या असतात का? गेलेला माणूस आपल्या स्पर्शाने आणि श्वासाने वास्तू भारून ठेवतो का? कोणास ठाऊक! पण काही ठिकाणी तरी प्रथम भेटीत ज्या व्यक्तीच्या नावाने ते ठिकाण तीर्थक्षेत्रासारखं झालेलं असतं, त्याने सारं आसमंत झपाटलेलं आहे असं वाटतं. असाच अनुभव पूर्वी शांतिनिकेतनाच्या प्रथमदर्शनात आला होता, आणि वाटलं होतं,

*ओळखीचे वृक्ष इथे का धरतात चित्राकार?*
*इथल्या अंधारात हलतात आभास*
*कृतार्थ होतो इथे तीर्थांचा प्रवास*
*इथे तो होता, तो आहे, तो असेल*
*केवढे हे आश्चर्य?*
*एक मृत्युवश माणूस*
*भारून ठेवतो या वास्तूचा आकार*
*वर्तमान त्याचेच, भविष्यकाळात*
*त्याचे झणझणतील अनाहत झंकार*
*पिढ्यांच्या गुढ्यांवर त्याची किरणे*
*येतच राहणार आहेत*
*अज्ञात उगमातून*

*आपल्या मनाची तार न् तार*
*तो छेडत राहील आतून*

स्मारकाच्या परिसरात हिंडताना लिंकनविषयी आपल्याला वाटणारं आकर्षण कसं वाढत गेलं याचा शोध माझं मन घेऊ लागलं. कसाबसा वकिली पास झालेला आणि अनेक सामान्य वकिलांप्रमाणे काम मिळावं म्हणून वणवणणारा लिंकन– आणि तरीही लबाडी करून खटले जिंकण्याचं अव्हेरणारा, लुच्चेपणाची वकीलपत्रं घेण्याचं नाकारणारा लिंकन, आपल्या मार्मिक भाषणांनी निवडणुका जिंकणारा लिंकन आणि आपली तत्त्वनिष्ठा व स्पष्टवक्तेपणा यांमुळे निवडणुका हरणारा लिंकन. गावंढ्या गावातून बाहेर पडून अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष झालेला. राष्ट्र दुभंगवू पाहणाऱ्या यादवीला खंबीरपणे तोंड देणारा लिंकन, जॉर्ज वॉशिंग्टनसारखा खंदा आणि उमदा सहकारी मिळाल्यामुळे संघराज्याचा विजयध्वज अभिमानाने उंच धरू शकणारा लिंकन. अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना न्याय मिळाला पाहिजे असं म्हणणारा त्यांचा कैवारी लिंकन. अशी लिंकन या महामानवाची कर्तुकी तर मला आठवत होतीच पण अशा महामानवांच्या ठिकाणी दुर्मिळ असणारी लिंकनची विनोदप्रियताही आठवून आठवून मला हसू येत होतं.

एकदा लिंकन आपल्या बुटांना पॉलिश करीत बसला असता एक घमेंडखोर ब्रिटिश वकील तिथे आला आणि त्याने तुच्छतेने लिंकनला विचारलं– 'काय प्रेसिडेंटसाहेब, तुम्ही तुमच्या बुटांना पॉलिश करता?' त्याची टवाळखोरी आपल्या लक्षात न आल्याचा बहाणा करून लिंकन म्हणाला, 'होय महाराज, मी माझ्या बुटांना पॉलिश करतो. आपण कुणाच्या बुटांना पॉलिश करता?'

लिंकनला भांजा-भतीजांना चिकटवून वशिलेबाजी करणे अगदी नापसंत असे. तरी त्याचे नातेवाईक, गाववाले अनेकदा त्याला गराडा घालीत आणि आपली वर्णी लावण्यासाठी तगादे लावीत. त्या सर्वांना थोडा वेळ बसायला सांगून एकदा लिंकन म्हणाला, 'मी तुम्हांला आधी एक गोष्ट सांगतो. कोणे एके काळी सगळे प्राणी आळीपाळीने एकेकाला आपला राजा करीत. होता होता गाढवाची पाळी आली. गाढवाचे भाईबंद आपल्याला अधिकार मिळावा म्हणून एकच हाकाटी करू लागले.

तेव्हापासून जगात तीच पद्धत पडली. आजही त्याचेच भाईबंद हक्कानं वशिला लावायला येतात.'

लिंकन, गुरू आहेस बाबा! माणसाच्या जीवनाच्या किती क्षेत्रांवर तू प्रकाश टाकला आहेस! मानवसमाज तुझ्या नेहमी ऋणात राहील.

लिंकनला मनातल्या मनात लाख प्रणाम करीत आम्ही ते स्मारकाचं उद्यान सोडायचं ठरवलं, पण त्या उद्यानाच्या कोपऱ्यात आणखी एक स्मारक आमची वाट पाहत होतं. व्हिएतनामच्या युद्धात हजारो अमेरिकन नवयुवक ठार झाले. एखाद्या तुघलकाप्रमाणे अमेरिकन शासनानं त्यांची आहुती देण्यासाठी त्यांना लढाईवर पाठवलं, ही एक लहर झाली. दुसरी लहर येताच युद्धबंदी पुकारून आणि जगात सर्वत्र उठलेल्या निषेधाच्या आवाजापुढं मान तुकवून व्हिएतनाममधून लष्कर परत घेतलं. साराच पोरखेळ. त्यांचा खेळ झाला पण असंख्यात निरागसांचा त्यात जीव गेला.

युद्धात मरण पावलेल्या सर्व सैनिकांची स्मारकं उभारणार तरी कशी? नुसते क्रूस उभारले तरी ते शेकडो एकर जमीन व्यापतील. त्यामुळे कोणा चतुर शिल्पकाराच्या कल्पकतेने 'अनाम सैनिक' ही संकल्पना काढली आणि या अनाम सैनिकाचे स्मारक म्हणजे सर्वच हुतात्मा सैनिकांचे स्मारक असं मानण्याचा जगभर प्रघात पडला. पण कल्पक बुद्धी कधी एका निर्मितीवर पूर्णविराम घेत नाही. म्हणून अलीकडच्या काळात अमेरिकेत वॉशिंग्टनजवळ काळ्या कुळकुळीत ग्रॅनाईट्सचे त्रिकोण अथवा शंकू रचून त्यांचा एक अमूर्त आकृतिबंध उभवण्यात आला आणि ग्रॅनाईटवर रणांगणात पडलेल्या सर्वांची नावं कोरण्यात आली. हे मोठं स्मारक आहे वॉशिंग्टनजवळ तर स्प्रिंग फील्डला असंच छोटं स्मारक उभारून सभोवतालच्या प्रदेशातील मृत सैनिकांची नावं त्यावर कोरण्यात आली आहेत. आम्ही पोचलो त्याच वेळी शालेय विद्यार्थिविद्यार्थिनी बसेसमधून स्मारकाला भेट देण्यासाठी आली होती. आपल्या प्रिय व्यक्तीच्या कोरलेल्या नावावरून हात फिरवताना किंवा ग्रॅनाईटच्या पायथ्याशी फुलं ठेवताना त्यांचे डोळे पाणावत होते. तशी सगळ्यांची दृष्टी शाबूत होती हे खरं पण डोळे पाण्याने भरल्यामुळे सारे जसे काही आंधळे झाले होते. ग्रॅनाईटवर नावं कोरलेली असल्यानं त्यांनी ती नावं एका अभिनव ब्रेल लिपीतच वाचली असं मला वाटलं.

स्मारकाच्या विशाल परिसरातून आमचा मोर्चा वळला आता लिंकनच्या घराकडे. लिंकनचं निवासस्थान एक राष्ट्रीय महत्त्वाची वास्तू म्हणून अवघ्या अमेरिकन राष्ट्रानं प्रेमादरानं जपलेलं आहे. हे घर तसं इतरेजनांच्या वस्तीतच बांधलेलं आहे. ते प्रासादतुल्य नाही, राष्ट्राध्यक्षाच्या वैभवाची मिजास मिरवणारं नाही. 'फुलबाग बगीचा भवती' घेऊन उभा असलेला 'बंगला नवा नवकोनी' नाही. पुढे मागे सज्जे काढलेलं ते एक दुमजली नीटनेटकं पण साधं घर आहे. त्याच्या संरक्षणाच्या दृष्टीनं आता कडीकोयंडे आणि साखळ्या-कठडे यांत वाढ करण्यात आली आहे. आत फिरण्यासाठी प्रदक्षिणामार्ग निश्चित करून देखभाल करायला माणसं नेमलेली आहेत, हेच त्याचं वेगळेपण आहे. गर्दी होऊ नये म्हणून मोजून मोजून ठराविक संख्येनं समुदाय आत सोडले जातात आणि ते बरोबर आहे. घर बघायला आलेल्या सर्वांचं वर्तन अगदी आदर्श असतं. आखून दिलेले मार्ग सोडून कोणी स्वैर भटकत नाहीत, घरातील वस्तूंना हात लावत नाहीत. लिंकनच्या स्मृतीच्या पावित्र्याला कोणीही थोडासुद्धा ढळ पोचू देत नाहीत.

लिंकनचं घर. घरंदाज गृहस्थाचं घर. बैठकीची खोली. छोटीशी अभ्यासिका. वाद्यं वाजवायची आणि गायची कौटुंबिक संगीतशाळा. अगदी गरजेपुरती शयनगृहं. भक्कम साधं फर्निचर. डामडौलाला फाटा देणाऱ्या गाद्यागिरद्या. भली मोठी स्वयंपाकाची भांडी. चुल्हाण. गंमत म्हणजे संडास चक्क घरापासून वेगळा – परसदारी! आर्किटेक्ट बहुधा भारतातून नेलेला असावा!!

घरातलं फर्निचर पाहताना मला लिंकनची आडमाप उंची आठवून मनातल्या मनात हसू येत होतं. त्याच्या उंचीच्या मानाने पलंगाची लांबी जरा कमी वाटली. बिच्चारा! पोटाशी पाय घेऊन झोपत असावा. स्वारीने पलंग रेडिमेड आणला होता की काय कुणास ठाऊक! पण घरासारखं घर होतं म्हटल्यावर त्यात सोयीप्रमाणे गैरसोयीही असणारच.

मला उगीचच हो चि मिन्हची आठवण झाली. आपल्या राष्ट्राचा प्रमुख झाल्यानंतर देखील त्याने तीन खोल्यांचा आपला फ्लॅट सोडला नव्हता म्हणे!

अहो दिल्लीमधील लहानथोर, पण बहुधा थोरच शहेनशहा हो! तुम्ही यांच्यापासून काहीही शिकू नका. तुमच्यापैकी प्रत्येकाला दहा-वीस

शयनकक्षं असणारा बंगला मिळालाच पाहिजे. तुमच्यापुढे आदर्श असावा तो लिंकनचा नव्हे आणि हो चि मिन्हचाही नव्हे. तुमच्यापुढे आदर्श हवा चौदाव्या लुईचा. रशियाच्या झारचा. अकबर शहाजहानचा. अलीकडच्या काळातला हवा असेल तर सातशे बिब्यांसह नांदणाऱ्या निजामाचा. लिंकनची भिकारडी लक्षणं त्याची त्यालाच लखलाभ असोत. तशी लक्षणं धारण करून महत्पदी चढणं लालबहादुर शास्त्रींना जमलं असतं, पण गेले बिचारे! लिंकनसारखीच शरीरयष्टी आणि विनोदबुद्धी असलेल्या आमच्या एसेमना ही लक्षणं शोभली असती. पण नशिबात पाहिजे ना!

ooo

# विदेशात राखायचे स्वदेशाशी इमान

स्वदेशात धूमधडाक्यात साजरे होणारे गणेशोत्सव म्हणजे साक्षात् डोकेदुखी! विघ्नहर्त्याचे आगमन म्हणजे शांतताप्रिय नागरिकांसाठी विघ्नाचेच आगमन. लोकमान्यांनी सद्हेतूने आणि सद्भावनेने सुरू केलेला गणेशोत्सव सांप्रत कोठे जाऊन पोचला आहे याचे जर लोकमान्यांना भान झाले तर त्यांच्या अंगाची नुसती लाहीलाही होऊन जाईल. जनजागरणाचा आपला उद्देश वेगळ्याच अर्थाने सफळ झाला आहे आणि दहा दिवस अवघ्या जनतेला आलोचन जागरण घडते आहे; विसर्जनाच्या दिवशी 'पुढल्या वर्षी लवकर या' हे शब्द उच्चारताना लोकांना फारच त्रास होत आहे, हे लक्षात येऊन लोकमान्यांना भलताच मनस्ताप झाल्याशिवाय राहणार नाही.

ते काही असो, देशांतरीची गोष्ट वेगळी. आपल्या घरापासून शेकडो मैल दूर गेल्यावर आणि आपल्या भारतीयत्वाशी पूर्ण फारकत झाल्यावर माणसे वर्षातून एकदा येणाऱ्या गणेशोत्सवाची किती आतुरतेने वाट पाहत असतात! म्हणजे वाट दिवाळीचीही पाहतात, वार्षिक संमेलनाचीही पाहतात पण गणपतिबाप्पाची मूर्ती आणण्यापासून आबालवृद्धांना ॲबँडन का कायसे म्हणतात, तसे वागण्याची म्हणजे मनमुराद मोकळेपणाने येईल तसे गाण्याची, नाचण्याची– किमान ओरडण्याची– जी संधी मिळते तिचे मोल काही वेगळेच आहे!

दूर देशांतरी असणारी मराठी माणसे आपला महाराष्ट्रीय बाणा नेमका कोणत्या गोष्टीत दाखवतात?

– साहेब वाट्टेल ते बोलायला लागला तर आपण नाही ऐकून घेत, हे आपल्या धर्मपत्नीला बजावण्यात.

– पार्टीला जाऊन घरी आल्यानंतर न विसरता पोटाला दहीभाताचे प्लास्टर करण्यात.

— अंबाबाई, खंडोबा, व्याघ्रेश्वर, रवळनाथ, दामोदर, शांतादुर्गा, मंगेश इत्यादींच्या दोन तरी तसबिरींसह पाण्याचा एक गडू कुठल्या तरी कोपऱ्यात मांडून ठेवण्यात.

— वृत्तपत्र ऊर्फ हस्तलिखित ऊर्फ कसले तरी अनियतकालिक काढण्यात.

— नाटक बसवण्यात.

— गणेशोत्सव आणि तोही सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यात.

आता एक गोष्ट खरी की यांतल्या काही गोष्टी विशेष वैयक्तिक पातळीवरच्या आहेत तर नाटक बसवणे किंवा गणेशोत्सव साजरा करणे यासाठी समुदायाने काही तरी करावे लागते आणि चार-सहा जण एका ठिकाणी आले की भांडणाशिवाय मजा नाही. भांडण हा तर मराठी बाण्याच्या वस्त्राचा प्रमुख ताणा. हे उदाहरणच घ्या —

स्थळ : काश्मीरमधील श्रीनगर, किंवा सिक्कीममधील गंगटोक, किंवा असेच कोणते तरी पहाडावरचे सुंदर पण एकाकी गाव. दहा किंवा अकरा मराठी उंबरे.



काळ : सरत्या श्रावणातला. म्हणजे गणेशोत्सव उंबऱ्याशी ठेपलेला. दिवस रविवार– सुटीचा. आणि वेळ : कांदापोहे आणि चहासाठी योग्य अशी– म्हणजे दुपारी ४-४॥ ची.

आठ दहा टाळकी जमलेली असतात. घर असते गतवर्षीच्या उत्सवाच्या कार्याध्यक्षांचे. थोडे इकडचे तिकडचे बोलून झाल्यावर येत्या गणेशोत्सवात जबाबदारी कोणी घ्यायची, याची चर्चा होते. तेवढ्यात एक खोचक प्रश्न कार्याध्यक्षांच्या काळजात भाल्यासारखा खोचला जातो. या वर्षी उत्सव करायचा म्हणता, पण गेल्या वर्षीचे हिशोब कुठे मिळाले आहेत? झाले. एकाच ठिणगीने वणवा लागावा तशी आग धुमसू लागते आणि सर्वांचीच डोकी तापतात. खरे म्हणजे हिशोब अगदी सरळ असतो. श्रींची मूर्ती– किंमत रु. १५०/-, सभागृहाचे दीड दिवसाचे भाडे– रु. १५०/-, आरास आणि पूजासाहित्य– रु. १५०/-, ५० रुपये निमंत्रण पत्रिका. जमलेल्या दोन हजार रुपये वर्गणीतून हे पाचशे रुपये गेल्यावर उरलेल्या दीड हजार रुपयांची खिरापत, खाणे आणि चहा-कॉफी. उत्सवाला चंदा तर लष्करातल्या जवानांनीच दिलेला असतो. ते काही का असेना, जमाखर्च व्यवस्थित हवा. खर्चात गुंतागुंत नसेलही. पण म्हणून काय झाले? हिशोब चोख हवा. तो आमच्या हाती सभेच्या आधी पडायला हवा. हा तत्त्वाचा प्रश्न आहे. मराठी माणसे भांडतात ती नेहमी तत्त्वासाठी भांडतात. अगदी मजा येते अशा भांडणात. थोड्या वेळाने पोहे संपतात, चहा निवतो. हळू हळू डोकीही थंड होतात आणि आगामी गणेशोत्सवासाठी वर्गणी दोन हजार जमवावी की तीन हजार आणि प्रसादाला मिठाई आणावी की मोतीचुराचे लाडू, याची चर्चा रंगू लागते आणि ज्याचे तत्त्व अधिक मोठ्या आवाजात मांडले जाईल त्याचा विजय होतो; तो कोणाचा का होईना पण मजा येते.

गणेशोत्सव देशांतरी असला तर अशी भांडणे होत नाहीत; झाली तर सौम्य किंवा अति सभ्य (सॉफिस्टिकेटेड) होतात. मांडव जाळण्याच्या किंवा उत्सव उधळण्याच्या धमक्या कोणीच देत नाही. बाप्पा आलेच पाहिजेत, उत्सव झालाच पाहिजे यावर सर्वांचे एकमत असते आणि ते बरोबरच आहे, कारण प्रश्न तत्त्वाचा आहे.

देशांतरीच्या गणेशोत्सवाला दहा दिवसांचा गणपती तर झेपत नाहीच; पण दोन दिवससुद्धा फार होतात. 'गणपतिबाप्पा झटकन् या, दुसऱ्या

दिवशी पटकन् जा' हे सर्वांच्या सोयीचे असते. विविध धर्मांत सख्य आणि स्नेहभाव असला पाहिजे यावर भारतातील गणेशोत्सवांत परिसंवाद ठेवा हवा तर, पण देशांतरी चर्चच्या प्रार्थनागृहातच गणेशमूर्तीची स्थापना होऊ शकते. एलेफंट हेडेड हिंदू गॉड ही गंमत पाहायला सर्वांनाच आवडते. विशेषतः सर्वच भारतीय प्रतीकांना जन्मापासून मुकलेल्या भारतीय मुलां-लेकरांनाच गणपतीची केवढी तरी अपूर्वाई वाटत असते. 'मम्मी, आपल्या गॉडला एलिफंटचं हेड कसं आलं? त्याला दोन दोन वाइफ आहेत का? व्हाय फोर हँडस्? त्याला पाण्यात का डुबवणार? असे प्रश्नांवर प्रश्न देशांतरीची मुले आपल्या आई-वडिलांना विचारीत असतात. उत्सव साधारणतः ११-१२ च्या सुमारास सुरू होतो. बिस्मिल्ला शास्त्र्यांची सनई आणि पॉप संगीत आलटून पालटून लावल्यास दोनही पिढ्यांचे समाधान होते. पूजेच्या आणि आरतीच्या वेळी मात्र 'नो नॉन्सेन्स हां!' मुख्य उपाध्याय ही भूमिका करणारी मंडळी प्रत्यक्ष जीवनात स्ट्रक्चरल इंजीनिअर किंवा ॲटॉमिक फिजिसिस्ट असू शकतात. ते ठीकच आहे. 'अणुरेणिया थोकडा, गणा आकाशाएवढा.' आज पूजा सांगणाऱ्याच्या गळ्यात नवे कोरे जानवे घातलेले असते. कमरेला पीतांबर आणि खांद्यावर शाल- शाल न मिळाल्यास सासूबाईंचा बुट्ट्यांचा बनारसी शेला बासनातून काढून पांघरला तरी चालतो. गणेश, शंकर, दुर्गा, विठ्ठल-रखुमाई, ज्ञानराजा इत्यादींच्या आरत्या फटाक्यांचा सर लागल्यागत एकामागून एक झडतात. एखादी आरती कमी पडल्यास साईबाबांचे पद चालते किंवा भगवान नामक नट ज्या गाण्यावर नाचतो, ते 'देवा हो देवा, गणपती देवा' हे गाणेही गायला हरकत नसते. त्यानंतर आठवेल तेवढा मंत्र जागर. शेवटी एकदा (किंवा एकदाचे) 'अच्युतं केशवं रामनारायणम्' झाल्यावर 'गणपतिबाप्पा मोरया'चा गजर केला की मंडळी तडक जेवणाच्या टेबलाकडे धावतात. आरतीच्या वेळी लघुप्रसाद, जेवण हा महाप्रसाद. मग गप्पांचे अड्डे, भगिनी वर्गातील स्टॉक टेकिंगच्या गोष्टी- म्हणजे कोणाचा वंश विस्तार किती झाला; कोणाचे कोणाशी किती सूत जमले आहे, इत्यादी. किंवा तरुण मंडळी चित्रपटातील गाण्यांच्या- अर्थात मुख्यतः हिंदी किंवा इंग्लिश- भेंड्या लावतात आणि त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम, ज्या त्या गावच्या शक्तिबुद्धीनुसार सुरू होतो.

हा सांस्कृतिक कार्यक्रम मात्र ठराविक असला तरी मेहनतीने बसविलेला असतो. मंचावर चाललेल्या झिम्मा फुगड्या, रेकॉर्ड-डान्स हा मुख्य सांस्कृतिक कार्यक्रम नव्हेच. शिट्ट्या, आरोळ्या, लहान मुला-मुलींचा प्रेक्षकवृन्दातच चाललेला लपंडाव किंवा चोर-शिपाई-शिवाशिवी हा मामला मुख्य. खेळात आनुषंगिक किंकाळ्या, आरडाओरडा. जादा चलाख मुलांनी स्टेजवर घुसून प्रेक्षकांना दाखविलेल्या वाकुल्या आणि त्यांना त्यांच्या पालकांनी दिलेली दाद किंवा कौतुकमिश्रित दटावणी– अशा तुंबळ रणसंग्रामाची पर्वा न करता कुणीतरी बिचारा नकला करीत असतो, कुणीतरी बिचारी नाचत असते किंवा कुणीतरी बिचारा चक्क कविता वाचीत असतो. एखाद्या शिष्ट कवीने किंवा वक्त्याने अशा वातावरणात आपला कार्यक्रम करण्याचे नाकारले तर मात्र सर्व बालचमूला दुसरीकडे नेण्यात येते. कोणीतरी उदार हृदयाच्या स्त्रिया त्यांना सांभाळण्याची–खेळवण्याची जबाबदारी घेतात आणि मग सारे कसे शांत शांत झाल्यावर कार्यक्रम नीटपणे पार पडू शकतो.

अर्थात हे देशांतरीचेच चित्र आहे असे नव्हे. देशांतरी देखील स्वदेशाशी इमान राखले जाते एवढेच सांगण्याचा इथे हेतू आहे. नाहीतरी मंचीय कार्यक्रम हा मुख्य नसतोच. मुख्य कार्यक्रम असतो सटीसामासी होणाऱ्या भेटींचा, चतुर-चहाटळपणाचा, चटोर गप्पागोष्टींचा, घालून पाडून बोलण्याचा– एकमेकींच्या वस्त्रांच्या आणि दागिन्यांच्या मूल्यमापनाचा– म्हणजेच खोट्याचे खरे करण्याच्या प्रयोगाचा, सहजगत्या घडणाऱ्या 'फॅशन शो'चा.

देशांतरी गेलेल्या स्त्रिया किती चटकन देशांतराशी एकरूप झालेल्या असतात! त्या छान छान मिनि-मिडी-मॅक्सी घालतात. अंगावर (प्रयासाने) जीन्स चढवितात. त्यावर मॅचिंग टॉप किंवा अघळपघळ टी-शर्ट घालतात. कोणी खांद्यापासून गुढघ्यापर्यंत अंगासरशी बसणारा फ्रॉक पेहेनतात. पण हे सर्व इतर वेळी. उत्सव असला किंवा "आपले" संमेलन असले की सुंदर सुंदर बहुमोल, बहुरंगी साड्यांना गेलेले राणीपद पुन्हा मिळते. आणि त्यांतही चक्क नऊ वारी साड्या, व्यवस्थित ओचेपदर खोवून नेसलेल्या, आपल्या अंगावर किती रुबाबदार दिसतात हे दाखविण्याची अहमहमिका लागते. नऊ वारी साड्या आणि शालू यांच्या खालोखाल मान असतो तो गुर्जर रमणींच्या पद्धतीने नेसलेल्या साडीचा. मराठी स्त्रिया गुजराती

पद्धतीने का नेसतात, असा भोचक प्रश्न मी केल्यावर मला माझा मुखभंग करणारे उत्तर मिळाले. 'नेसण्याच्या गुजराती पद्धतीत संपूर्ण पल्लू दर्शनी भागी मिरवता येतो आणि ती तर मोठी ऐट असते.' मला यावर गप्प बसणे भागच होते. मराठी समाजात लावणीनृत्य फार लोकप्रिय. प्रेक्षकांकडे पाठ करून लावणी नाचणारी नर्तिका एन्ट्री घेते ती (बहुधा) पदर दाखविण्याकरताच. त्यामुळे आपल्याकडे भरजरी पदराचे वर्णन दुमजली पदर, तिमजली पदर असेच केले जाते.

उत्सवात मिरविणाऱ्या स्त्रियांना एरवी नऊ वारी साड्या नेसण्याची सवय नसल्यामुळे अनेक वेळा त्यांची फजितीही होत असते. अंगापेक्षा बोंगा मोठा होतो. अर्भकि अंगाला झटू लागली तर अनवस्था प्रसंग निर्माण होतात. पण शेवटी हौस आहे ना!

अशीच आणखी एक हौस म्हणजे नाकातली नथ. हा अलंकार धारण करणारी पुरन्ध्री म्हणजे नवऱ्याच्या दृष्टीने नाकापेक्षा मोती जड असतो. आणि तिलाही नाकातली नथ म्हणजे नाकापेक्षा मोती जड असतो. त्यामुळे नथ कशीबशी सावरावी लागते, त्याने नाक लाल होते. क्वचित् नाका-डोळ्यांतून पाणी येते. पण तरी नथ घातलीच पाहिजे; कारण त्यातील मोती खरे असतात आणि सर्जाचं माणिक देखील खर्र्र असतं आणि ते सर्वांना दाखवावंच लागतं.


हा सगळा 'पासिंग शो' पाहून, राहून राहून मनात येतं, असलं पारंपरिक ऊर्फ खानदानी वैभव मिरवणं पुरुषांना अजिबात शक्य नाही. आता काय वाटेल ते झालं तरी उत्सवासाठी देखील पुरुष कळीचा अंगरखा घालणार नाहीत, गोंडे लावलेली बाराबंदी पेहेरणार नाहीत की जरीच्या झिरमिळ्या लावलेलं पागोटं घालणार नाहीत. कंगणीदार पगडी आणि हुरमुजी मोत्यांची भिकबाळी आता फक्त नाटकात. करवती काठाचं रेशमी उपरणं पुरुषांनी कायमचं झटकलं आहे आणि पायांत चटचट वाजणारा लाल पुणेरी जोडा घालणारे शहाणे एखादद्दुसरेच असले तर असतील. तात्पर्य काय, परंपरा सांभाळण्याचं श्रेय फक्त भगिनी वर्गाला आहे बरं! नटण्यासाठी का होईना, जुनं ते सोनं त्या अंगाखांद्यावर घालणारच, ऐट म्हणून का होईना— 'घातला दुहेरी कासोटा खेचुन, भरजरी पदर अन् कटिस दिला खोवुन' अशा मऱ्हाटी रमणी सणा-उत्सवाला आपल्या

पिढीजाद मिजाशीत कशा हिंडतात ते पहा. त्या कितीही शिकल्या, आधुनिकतेचा कळस त्यांनी गाठला, त्या पंचखंड विश्वाच्या नागरिक झाल्या आणि म्हणून आंतरराष्ट्रीय समाजाच्या अद्यतन प्रतिनिधी ठरल्या तरी त्यांच्या शहरात सामुदायिक मंगळागौर करा, हळद-कुंकू समारंभाचा थाट उडवा किंवा गणेशोत्सव हौसेने साजरा करा– अत्यंत रंगदार, थाटामाटाची वेषभूषा करून आणि चार ठळक डाग अंगावर घालून आल्याशिवाय त्यांना करमणार नाही. अशा थाटामाटाला 'एथ्निक' (जमातबंद) म्हणतात. ही जमातशाही भारतातील अन्य समाजांतही भरपूर प्रमाणात आहे. केरळीय, तमीळ, पंजावी, बंगाली असे कितीतरी समाज आपल्या प्रादेशिक वेषभूषेत झुंडीझुंडीने वावरतात हे दृश्य देशांतरी विविध सणांच्या निमित्ताने पाहायला मिळते. यांत बहुधा पहिला क्रमांक गुजरात-काठेवाडचा लागेल. एक तर ते संख्येने विपुल आहेत आणि स्त्री-पुरुष दोघांनीही सामुदायिक लोकनृत्यात रंगून नाचण्याचा त्यांचा परिपाठ आहे. विशेषतः नवरात्री हा तेथील हर्षोन्मादाचा उत्सव. या काळात जरतारी पाटोळे नेसलेल्या आणि उजव्या खांद्यावरून सैलसर घोळदार लफ्फ्याचा पदर घेतलेल्या किंवा घागरे, ओढण्या धारण केलेल्या गुर्जरी आणि कुर्ता-चुस्त पैजामा घातलेले युवक आपल्या खास प्रादेशिक ढंगात जात असतात, जमत असतात, नाचत असतात आणि सपाटून खात असतात. पण आनंदाची देवाण घेवाण करण्यात त्यांचा उल्हास ओसंडून वाहत असतो. ते जगाच्या पाठीवर कोणत्याही देशात असोत, आपली प्रादेशिकता हौसेने जपतात आणि आनंदाची गोष्ट अशी की त्यांच्या आनंदोत्सवात मराठी, पंजाबी अशा इतर समाजांतील तरुण-तरुणीही हौसेने सामील होतात. तसे सारेच 'गंगा गये गंगादास, जमना गये जमनादास' असतात. पण खास आपला उत्सव आला म्हणजे सगळ्यांच्याच मनात घराकडच्या आठवणी दाटून येतात. मग प्रादेशिक पोषाख, प्रादेशिक खाणंपिणं, पूजा विधी, गाणं, नाचणं, सर्वांभोवती प्रादेशिकतेचं आणि जमातबंदीचं कडं पडतं. मूलतः आपण सर्वच टोळ्या करून राहतो का? आणि टोळीचे विधिनिषेध झुगारले तरी साज श्रृंगार मात्र जपतो का?

देशांतरी गेल्यावर हे छोटे छोटे प्रश्न किती मोठे वाटू लागतात!


ooo

# ते तसे आम्ही असे!



शब्द किती ढिसाळपणाने वापरले जातात! अनेक अर्थांसाठी एकच शब्द वापरल्यामुळे तर महाघोटाळे होऊ शकतात. मराठीत 'संस्कृती' हा शब्द फारच भोंगळपणाने वापरला जात असल्याचे लक्षात येते. धुरळा उडणाऱ्या रस्त्यावरून डांबरी सडकेवर आल्यावर 'आता कसं सुसंस्कृत जगात आल्यासारखं वाटतं!'– असं आपण खुशाल म्हणतो. शहराच्या घामट भागापेक्षा आणि तेल्यातांबोळ्यांच्या वस्तीपेक्षा 'पॉश' वस्ती म्हणजे सुसंस्कृत जग– असं म्हणण्याचा प्रघात आहे. खरं म्हणजे रस्त्यात पचक्कन् थुंकण्याची सवय दोन्हीकडे असते. दुसऱ्या माणसांविषयी बेपर्वाई दाखवण्याचा गुणधर्म दोन्हीकडे दिसतो. कदाचित् 'पॉश' वस्तीत तो थोडासा जास्तच दिसेल! करमणुकीच्या वगैरे कार्यक्रमांना आपण सांस्कृतिक कार्यक्रम का म्हणतो? शाळेत 'सांस्कृतिक'चा तास का असतो? सनातनी मंडळींना 'संस्कृतिसंरक्षक' का म्हणतात? टिंबक्टूपेक्षा टोरांटो हे शहर सुसंस्कृत मानतात, ते कशाच्या आधारावर? जंगलातल्या वस्त्या आणि त्यांत राहणारी माणसे असंस्कृत; आणि महानगरातल्या उंच उंच माड्यांत राहणारी तेवढी सुसंस्कृत. हे कोणत्या निकषावर ठरते? घोटाळा, घोटाळा! नुसता गोंधळ!

इथे एक सरळ शास्त्रीय प्रश्न उपस्थित होतो, तो असा की, आखीव रेखीव रस्ते, योजनापूर्वक बांधलेली दर्जेदार वसतिस्थाने, शिक्षणसंस्थांच्या इमारती, इस्पितळे, उत्तमोत्तम बाजारपेठा इत्यादींनी परिपूर्ण असणाऱ्या देशाला आपण सुसंस्कृत म्हणावे, की केवळ 'सुविहित' म्हणावे? कारण सुसंस्कृतता हा मनोधर्म आहे. तुम्ही आणि तुमची जीवनसरणी जशी 'दिसते'– तिला सभ्यता किंवा सुविहितता– म्हणजेच तुमची 'सिव्हिलायझेशन' म्हणावे. आणि तुम्ही किंवा तुमची जीवनसरणी जशी 'असते'– तिला तुमची



प्रवास

सांस्कृतिक ईयत्ता म्हणावे, 'कल्चर' म्हणावे. पण सिव्हिलायझेशन आणि कल्चर... दोन्ही गोष्टी व्यक्त करायला मराठीत संस्कृती हा एकच शब्द वापरला जातो! दोहोंमधे खूपच भेद आहे. 'सिव्हिलायझेशन'मधे बाह्य परिवेष येतो, 'संस्कृती'ला मानसिकता अभिप्रेत असते.

– अर्थात हे देखील ढोबळ मानानेच खरे आहे. कल्चर आणि सिव्हिलायझेशन या कल्पना व्यक्त करायला हिंदी भाषेत 'संस्कृती' आणि 'सभ्यता', असे दोन शब्द वापरण्याचा प्रघात आहे. आपल्याला या दोहोंचीही अपेक्षा असते. दोहोंचा मिलाफ अथवा सुवर्णमध्य साधायला हवा असतो. राहणीमानही उंचावत जावे आणि मानसिकताही उन्नत होत जावी, अशीच अपेक्षा कोणीही सुबुद्ध व्यक्ती अथवा समाज करील. या दृष्टीने मराठीतही या दोन संकल्पनांसाठी दोन वेगळे शब्द हवेत. मात्र हिंदीतून उसनवारी करून भागणार नाही. कारण हिंदीत वापरलेला 'सभ्यता' हा शब्द मराठीत वेगळ्याच अर्थाने वापरण्यात येतो. एकदा वापरलेले काडतूस दुसऱ्यांदा वापरून काय साधणार! मला वाटते, संस्कृती (कल्चर), सुसंघटित राहणी (सिव्हिलायझेशन), या दोहोंतील भेदांची जाण बाळगून मग त्यांत अभेद पाहावयास शिकले पाहिजे आणि त्याला 'सम्यक् जीवनदृष्टी' असे काही तरी नवे नाव दिले पाहिजे.

'देशांतरीची गोष्ट' सांगताना ही चर्चा करण्याचे कारण काय?

कारण आहे आणि ते फार बलवान आहे. अमेरिकेचा शोध कोलंबसने लावलेला असो की त्याच्या आधी कोणी; त्याच्याशी काय करायचे आहे? आपण आजच्या अमेरिकेचा शोध लावला तर दिसते की,

हे एक जबरदस्त राष्ट्र आहे.

लष्करी दृष्ट्या ते जबरदस्त आहेच; पण ते तसे आहे याचे कारण त्यांचे विज्ञान आणि तंत्रज्ञान जबरदस्त आहे.

ते जबरदस्त आहे कारण त्यांची साधनसंपत्ती जबरदस्त आहे.

ती जबरदस्त आहे याचे कारण त्यांना निसर्गाने दिलेली देणगी जबरदस्त आहे आणि तिचा वापर करण्याची त्यांची बुद्धी जबरदस्त आहे.

दोन महायुद्धांचा निकाल लागला, तो अमेरिकेच्या निर्णायक समरप्रवेशामुळे. त्यामुळे वाढलेला अमेरिकेचा ताठा जबरदस्त आहे.

जगावर अधिराज्य गाजवण्याची महत्त्वाकांक्षाही जबरदस्त आहे.

ही संधी त्यांना मिळण्याची शक्यता जबरदस्त आहे.

याला कारण मात्र न केवळ त्यांची भूमीची संपन्नता, न केवळ शास्त्रज्ञान, न केवळ शस्त्रास्त्रांचा साठा. ही सर्व कारणे आहेतच, पण त्यांचा आधार आहे तो मुख्यतः त्यांच्या सुसंघटित जीवनदृष्टीचा. या जीवनदृष्टीचा प्रत्यय येथे पावलोपावली येतो, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात येतो. आणि असा प्रत्यय आला की आपले आणि आपल्या समाजाचे उणेपण मनाला फार सलू लागते.

या विधानाच्या पुष्टीसाठी अमेरिकन जीवनाच्या कोणत्याही अंगाकडे दृष्टी टाकावी.

माणसाच्या सुसंघटित जीवनदृष्टीचे एकवट दर्शन होते ते नगररचनेत आणि भिन्न भिन्न नगरांना जोडणाऱ्या महामार्गांच्या उत्कृष्ट अवस्थेत! रुंद रस्ते; त्यांचे टणक पण मऊसूत पृष्ठभाग, चौक असल्यास तेथील वाहतूक सुरळीत व्हावी म्हणून केलेल्या चतुराईच्या रचना. डोळे उघडे ठेवून कितीही दूर दूर प्रवास करावा, रस्त्यांची शिस्त पाहून मन स्तिमित होते. अत्यंत सुस्पष्ट आणि दुरून वाचण्यासाठी महाप्रमाण ठेवलेल्या अक्षरांच्या सुबक पाट्या, सुरक्षित वाहतुकीसाठी दिलेले इशारे, महामार्गांवर उपलब्ध असणाऱ्या दरोबस्त सुविधा आणि त्या कोठे उपलब्ध आहेत याच्या ठसठशीत पूर्वसूचना. मुशाफिराला वाट चुकण्यासाठी जरादेखील संधी नाही. आपल्याकडे वैकुंठ स्मशानात जाताना देखील वाट चुकून माणूस पाताळात पोचण्याची शक्यता! अमेरिकेतील महामार्गांना छेद देऊन जाणारे आडवे रस्ते सहसा नसतातच. त्यामुळे भरधाव जाणाऱ्या गाडीपुढे एकदम आडवी येणारी बैलगाडी– असली मौज तेथे नाही. समजा, आडवा रस्ता असला, तरी बैलगाडी जाणार कशी? कारण जनावरे जोडलेल्या गाड्यांना महामार्गावर प्रवेशबंदीच आहे! गुराखी आणि हेडे-कसाई यांनी मनमुराद जनावरे हाकत न्यावी हा आपल्याकडील सृष्टिसौंदर्याचा विशेष! अमेरिकेत गुरे-डुकरे इकडून तिकडे न्यावयाची असल्यास ती बंद गाडीतूनच न्यावी लागतात, मग ती जिवंत असोत वा मृत. वाटेत पेट्रोल पंपावर पेट्रोल (गॅस) भरण्यासाठी गाडी थांबली आणि समजा 'चुकून' बाईसाहेब छत्री किंवा थरमॉस विसरल्या, नाहीतर तुम्हीच तुमची हॅट किंवा ब्रीफकेस तेथे 'अजागळपणे' विसरलात,

तर गाडी 'रिव्हर्स'मध्ये नेता येत नाही. दोन-चार मैल गेल्यावर, उलट दिशेनें जाण्यासाठी खालून रस्ता गेलेला असेल तेथून गाडी न्यावी, 'गॅस-स्टेशन'चा रस्ता पकडावा, चार-आठ मैल गाडी पळवावी, ते गॅस-स्टेशन पुन्हा गाठावे, (दुसऱ्या कोणी नेल्या नसल्यास) आपल्या वस्तू मिळवाव्या आणि परत मार्गाला लागावे. हे सर्व करीत असताना, गाडीचा वेग किती ठेवावा याचे नियम तुम्हांला मोडता येणार नाहीत. वेग कमीच ठेवावा लागेल असेही नाही, इशारा असल्यास तो वाढवावाही लागेल.

अशा रितीने सर्व नियम पाळून निर्विघ्न आणि उत्तम वेगाने ज्या नगरात जायचे तेथे पोचलात की तुमच्यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या सुस्पष्ट पाट्या (सुस्थितीत!) उभ्या असतात. महामार्गावरून तुम्ही नगरप्रवेश केलेला असतो. आता 'डाउनटाउन' किंवा 'सिटी सेंटर' कोठे आहे हे कळणे जरुरीचे असते; किंवा उपनगरांची अचूक माहिती हवी असते किंवा बसचा नाहीतर विमानांचा 'अड्डा' हवा असतो. काळजी करू नका : ते सर्व अगदी व्यवस्थित सापडेल.

उत्तम नागर जीवनाचे असे किती म्हणून विशेष सांगावे? बसमधील आरक्षण असो, होटेलमधील अथपासून इतिपर्यंत सर्व व्यवस्था असोत, बँकेचे व्यवहार असोत, सर्व काही... टिक्‌टिक् देखील न करणाऱ्या सुरळीत चालणाऱ्या घड्याळासारखे सुविहित असावे, म्हणजे कमाल झाली.

कोणतेही चित्र एका रंगाच्या कागदावर, कागदाच्याच रंगाच्या शलाकेने काढता येत नाही, हे मला माहीत आहे. अमेरिकेतील सुविहित, सुसंघटित जीवनाचे कौतुक करीत असताना अलीकडे तेथे वाढत चाललेले अत्याचार मी साफ विसरतो असे नाही. म्हणजे शुभ्र प्रकाशाला कृष्ण छायेची जोड आहेच! वर्णविद्वेषापायी होणाऱ्या अत्याचारांच्या कहाण्या आता प्रत्यही ऐकाव्या लागतात. तळकोकणासारखा सदैव हिरवागार असणारा फ्लॉरिडा अलीकडे अनेकदा निरपराधांच्या रक्ताने रंगून निघतो, हे खरे आहे. नवतारुण्यात असलेली मुले निर्ढावलेल्या गुन्हेगारांहूनही क्रूर होऊ शकतात, म्हाताऱ्याकोताऱ्यांचे गळे घोटतात, आडबाजूला नेऊन कंठनाल चिरतात किंवा पिस्तुलाच्या गोळीने जीव घेतात... याच्याही भीषण कहाण्या रोजच्या रोज वाचाव्या लागतात. पण तरीही आशावादी मनाचे समाधान करण्यासाठी तेथे 'अजून येतो वास फुलांना, अजून माती लाल चमकते',

यावेगळ्या आणखीही काही गोष्टी आहेत. माणसाच्या वागण्यातील माणुसकी उणावल्यावर लगेच सृष्टीकडे धाव घेण्याचे तेथे कारण नाही. अजून तेथील भौतिक आणि ऐहिक जीवन बऱ्याच अंशी सुरळीत चालते आहे हा दिलासादेखील काही कमी नाही.

सिनेमातली अमेरिका वेगळी आणि लौकिक जीवनातली वेगळी. सिनेमातले अमेरिकन स्त्री-पुरुष जसे काही सदैव अनंग-रंगात रंगलेले, प्रेमाच्या त्रिकोणातून सुटण्यासाठी वा तो सोडवण्यासाठी ठो-ठो पिस्तुले उडवणारे, प्रचंड संपत्ती लुटणारे किंवा तिच्यात लोळणारे असे दिसतात. प्रत्यक्ष अमेरिकेत कुटुंबवत्सल माणसे आहेत. घाम गाळून, काम करून ती दाम कमावतात. बरीच माणसे प्रामाणिकपणे काम करतात. तोंडाने ती वेद-वेदान्त बोलत नाहीत. नीतिपाठही देत नाहीत. बहुधा आपल्या वैयक्तिक हितासाठी– 'स्वार्थासाठी' म्हणा हवे तर– झगडत असतात. ती साधूही नसतात की दुर्जनही नसतात. ती वासना-विकारांसह सुखाने नांदू पाहणारी माणसेच असतात.

त्यांचे राहू दे. आपण भारतीय कसे आहोत, हे राहून-राहून मनात येते. आता आपल्या देशातही महामार्ग आहेत. फक्त, त्यांची अवस्था दयनीय आहे. खूप सुधारणा करावी म्हटले, तर पैसा नाही. तो उभा करायचा म्हटले की भ्रष्टाचार येतो. मघाशी वर्णन केलेल्या 'सुविहित' व्यवस्थेऐवजी आपल्याकडे पाहावे, तर चुन्यावर किरट्या अक्षरात दर्शविलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या पाट्या. त्या शिमग्यातल्या होळीसाठी केव्हा पळवल्या जातील, सांगता येणार नाही. रस्त्यावर दिवे लावलेच, तर ते फोडले तरी जातील किंवा वीज पुरवठा हमखास बंद असेल! रस्त्यांत खड्डे की खड्ड्यांत रस्ते हे समजू नये अशी चोख व्यवस्था! शाळा-कॉलेजे बांधली, तर तेथे शिकणारी मुलेच तावदाने फोडतील, भिंती चिताडून ठेवतील आणि अंगण असलेच तर तेथे उकिरडा करून ठेवतील. तिकडे पाहावे तर प्रत्येक विद्यालयाला क्रीडांगणे; तीही सुंदर हिरवळीची. त्यांच्या भोवती छायाबहुल वृक्ष. शेजारून कालवा-नदी वाहत असेल तर पाणी कसे नितळ, स्वच्छ. महापुरुषांच्या स्मारकांचे दर्शन घ्यायला तिकडेही 'पाचवी-ब' अथवा 'आठवी- क' मधली मुले जात असतीलच; पण ती आपली स्मारके तेथे खडूने किंवा रंगीत पेन्सिलीने कशी करून ठेवीत नाहीत!

सर्व अमेरिकन जनतेबद्दल सरधोपट विधान करणे बरोबर नाही; पण बहुसंख्यांच्या उदाहरणांवरून निष्कर्ष काढला तर अमेरिकन माणसे नितांत स्वार्थी आहेत आणि आपल्या देशाच्या सीमांपलीकडील जगाच्या सुखदुःखांशी त्यांना काही सोयरसुतक नसते हे मान्य करावे लागेल. त्यांची वृत्तपत्रेच पाहावी. भारतासारख्या देशाबद्दल फारशी वृत्ते ती कधीच देत नाहीत आणि दिलीच तर त्यांना अत्यंत गौण स्थान दिलेले असते. या उलट स्थानिक बातम्या मात्र, त्यांना जागतिक महत्त्व असल्यासारख्या छापल्या जातात. न्यूयॉर्क टाइम्स किंवा वॉशिंग्टन पोस्ट अशा बोटावर मोजण्यासारख्या वृत्तपत्रांचे अपवाद वगळले तर अमेरिकेपलीकडे जगाचा विस्तार आहे याच्यावर कुठल्याच वृत्तपत्राची श्रद्धा दिसत नाही.

विश्वसाहित्य म्हणजे काय याची चर्चा विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकेतील विद्यापीठांतूनही बरीच चालते. त्यात एका समजदार प्राध्यापकाने एके ठिकाणी तिरीमिरीवर येऊन म्हटले आहे– आमच्या दृष्टीने विश्व विश्व म्हणजे काय? विश्व म्हणजे 'नाटो' कंट्रीज! खरेच आहे त्याचे म्हणणे– अमेरिका, इंग्लंड आणि पश्चिम युरोपीय राष्ट्रे यांच्याखेरीज अमेरिका जगात कोणाला मोजीत नाही.

राजकीय सत्तेचा तोल सांभाळण्याच्या दृष्टीने अमेरिकन लोक भारताला नगण्य समजतात आणि पाकिस्तान, चीनला झुकते माप देतात, हे आपल्याला माहीत आहेच.

जपानचा व्यापारी शह बसल्यामुळे अमेरिकन वजिराची नाकेबंदी झाली आहे आणि भरीला तैवान, कोरिया प्रभृती प्यादीही व्यापारात जोरावर आली आहेत, म्हणून त्यांना अमेरिकेच्या लेखी आता स्थान मिळू लागले आहे.

अरबांनी पेट्रोलियमचे काळे सोने अमाप साठवलेले असल्यामुळे ते अमेरिका खरेदी करू शकतील असे भय अमेरिकेला जरूर वाटते. म्हणून तेथील सारीपाटाच्या खेळात आपल्याला हवे तसे दान पाडून घेण्यासाठी अमेरिकन मुत्सद्दी तडफडत असतात.

आणि भारत?

असेल तुमची ऋषिमुनींची भूमी.

असेल ती प्राचीन मानवी संस्कृतीची अखंड परंपरा जपणारी, तुमच्या दृष्टीने पवित्र भूमी.

असेल ती बौद्ध धर्माची गंगोत्री, आणि अन्य छलित सांप्रदायिकांना आसरा देणारी ममताळू माताच जशी.

असेना का भारतात मध्य युगात देखील नानक, कबीर, ज्ञानेश्वर, तुकाराम, चैतन्य महाप्रभू यांसारख्या संतांनी मानवतावादाची पताका फडकत ठेवलेली.

विवेकानंद आणि रमण महर्षी, रवींद्रनाथ आणि अरविंद यांसारखे आध्यात्मिक जगद्वंद्य महामानव असतील जन्मले आणि प्रवर्तमान झाले भारतात.

लोकमान्यांचा कर्मयोग आणि महात्मा गांधींचा अनासक्तियोग यांना जिने जन्म दिला अन् शेकडो हुतात्म्यांना हसत हसत मृत्यूला आलिंगन देण्याचे सामर्थ्य जिने दिले त्या भगवद्गीतेचे कौतुक तुमचे तुम्हांला लखलाभ असो. अमेरिकेला त्याचे काही नाही. अपवाद इमर्सन किंवा थोरोसारख्या काही थोर वेड्यांचा.

असेल भारतात जगातली सर्वांत प्रचंड लोकशाही! अमेरिकाही आहे म्हणतात जगातली सर्वांत श्रेष्ठ लोकशाही! श्रेष्ठांना प्रचंडांबद्दल काही प्रेम तर नाहीच, पण साधे कुतूहलदेखील नाही. असलाच तर थोडासा दुस्वास आहे.

डिस्ने जगत् बघण्यासाठी एका अमेरिकन विद्यापीठाच्या गणित विभागाच्या प्राध्यापकाबरोबर– म्हणजे प्रकांड पंडिताबरोबर मी गेलो होतो. त्यात एक अमेरिकन अध्यक्षांची गॅलरी– म्हणजे मेणाच्या पुतळ्यांची– थाटलेली आहे. प्राध्यापक महाशयांनी एका उंच, सडसडीत अध्यक्षाकडे बोट दाखवून मला म्हटले, 'तो तिथे दिसतो ना, तो आहे अब्राहम लिंकन. हा १८६० च्या सुमारास अध्यक्ष होता.' मी चुणचुणीत शाळकरी पोराच्या तडफेने म्हटले– 'मला माहीत आहे हा लिंकन आहे ते. आणि तो रूझवेल्ट, तो वुड्रो विल्सन, तो केनेडी.'

प्रोफेसरांनी मला मध्येच थांबवून विचारले, 'हे सगळं तुम्हांला कसं माहीत?'

मी म्हटले, 'यांना जग ओळखतं, निदान भारत तरी ओळखतो.'

यावर प्रोफेसरसाहेब वरमून म्हणाले, 'पण मी नाही तुमच्या गांधींना, नेहरूंना ओळखत.'

मी शांतपणे सांगितले, 'त्यांची माहिती अमेरिकेला असावी अशी तुम्हांला कधी गरज वाटली नाही. पण जेफर्सन वॉशिंग्टनपासून, केनेडीपर्यंत सर्वांची ओळख असणं भारताला अत्यंत आवश्यक होतं.'

प्राध्यापकांच्या चेहऱ्यावर अपराधीपणाची, शरमिंदेपणाची भावना जरादेखील नव्हती. त्यांना माझे म्हणणे पटले असावे.

खरी गोष्ट अशी आहे की सुविहित, सुसंघटित म्हणजे सिव्हिलाइज्ड अमेरिकन समाजात राहणाऱ्या अति-उच्चशिक्षित माणसांचेदेखील सामान्यज्ञान तुटपुंजे असते. त्यांच्या त्यांच्या विषयांत ते अट्टल असतात. दर्जेदार तज्ज्ञ असतात. पण त्यांना मानवाचे गोत्र एक वाटत नाही. 'अन्याय घडो कोठेही, चिडून उठू आम्ही' अशी कळ त्यांच्या पोटात उठत नाही.

आणि आम्ही? आम्हांला मात्र शिकवण अशी आहे–

*'आपणांस चिमोटा घेतला। तेणे जीऊ कासावीस जाला*
*आपणांवरोनी दुसऱ्याला। वळखीत जावे'.*

*'वळ पाठीवर आमच्या, चाबूक उडो कोठेही'.*

भारतीय स्वातंत्र्य म्हणजे एक स्वतंत्र, सुटी घटना आहे असे गांधी-नेहरूंनी कधीच मानले नाही.

काय म्हणू या ह्या अमेरिकनांना?

सुविहित समाजातील सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेले लोक? आपापल्या विषयात तज्ज्ञ असे अल्पशिक्षित? नितांत स्वार्थी आणि डोळ्यांवर झापडे लावलेले? आत्मचर्चे चतुरू... यऱ्हवी वेडे?

आणि आपण कोण?

अत्यंत उदार अंतःकरणाचे? चिंता करितो विश्वाची म्हणत म्हणत उकिरड्यातही रहायला तयार असणारे? 'करंट्याला मोक्ष कैचा' असे रामदासांनी सांगितले तरी करंटेपण न सोडणारे? सुसंघटित समाजाचे जीवन जगायला नालायक असणारे?

तात्पर्य काय? जिथे सिव्हिलायझेशन आहे तिथे कल्चर नाही आणि जिथे कल्चरच कल्चर आहे तिथे सिव्हिलायझेनचा पत्ता नाही!

ooo

# बाह्यरंग, अंतरंग...

परदेश म्हणजे स्वप्नातला किंवा सिनेमातला देश. प्रत्यक्षात स्वदेश आणि विदेश यांतले अंतर तसे फार मोठे नसते. ऐहिक वैभव आणि लौकिक यश यांच्या दृष्टीने ज्या त्या राष्ट्राचे मोजमाप वेगळे असते. पण माणसांचे स्वभाव, त्यांच्यामधील नातेसंबंध, प्रेम आणि द्वेष यांची विलसिते सर्वत्र समानच असतात, असा अनुभव दृष्टी तल्लख असणाऱ्या मुशाफिराला केव्हा ना केव्हा तरी येतोच.

एका प्रसिद्ध विद्यापीठात काम करणाऱ्या प्राध्यापकांच्या घरची गोष्ट. प्राध्यापकांचा विषय गणित. त्यात त्यांची कुशाग्र आणि सर्वगामी बुद्धी विद्वत्सभेत मान्यता पावलेली. कुटुंबिनी विदुषी नसली तरी सुशिक्षित आणि समजदार. मुलांना न लाडावता त्यांचे उत्तम लालनपालन करणारी. मुलांमधे थोरला मुलगा अकरा-बारा वर्षांचा; मुलगी छोटी– सहा वर्षांची.

अस्मादिक या घरात पाहुणचार घेत असतानाची ही घटना : रडवेल्या चेहऱ्याने बिली सकाळी ११ च्या सुमाराला घरी आला. आईने त्याला जवळ घेतले तेव्हा जास्तच रडू लागला. कारण एवढेच– त्याला शाळेच्या चाचणी परीक्षेत गणितात पासापुरते मार्कही मिळाले नव्हते!

त्याची छोटी बहीण सर्व काही समजले असल्यासारखी कोपऱ्यातल्या कोचावर जाऊन आपल्या बाहुलीशी एकटीच खेळत बसली. आई काय करणार? घरात पाहुणे आलेले असल्यामुळे रडणाऱ्या मुलाला त्याच्या खोलीत सोडून ती पुन्हा आपल्या स्वयंपाकघराकडे वळली. पाहुणे टीव्हीवरचे नाटक पाहायचे नाटक करीत स्वस्थ राहिले.

थोड्या वेळाने प्रोफेसरसाहेब घरी आले.

गृहिणी लगबगीने हात पुसत पुसत बाहेर आली. पतिराजांना 'हाय्' करीत हाताला धरून आपल्या खोलीत घेऊन गेली. थोडा वेळ कानगोष्ट करून पुन्हा बाहेर आली आणि स्वयंपाकघरात आपल्या कामाला लागली.

घरातला गाऊन अंगावर चढवत प्रोफेसर मुलाच्या खोलीत गेले आणि त्यांनी दार लावून घेतले. बाहेर आम्हांला एक शब्दही ऐकू येऊ नये याची

ती खबरदारी होती. पण आम्ही पडलो चाणाक्ष वाचक. आत पिताजी काय बोलले असतील हे जाणल्याशिवाय राहतो थोडेच!

– मी गणिताचा एवढा प्रसिद्ध प्रोफेसर, आणि माझा मुलगा गणितात नापास होतो?

– तुला अभ्यासच करायला नको. पाहावं तेव्हा टीव्हीसमोर चिकटलेला!

– शेजारपाजारची उनाड मुलं गोळा करायची आणि त्यांच्याबरोबर हुंदडत फिरायचं. दुसरा उद्योग नाही तुला!

– पाहू दे मला तुझा पेपर. पेपर... म्हणजे प्रश्नप्रत्रिकाही आण.

– अगदीच सोप्पा आहे पेपर.

– तू गणितात अगदीच ढेग दिसतोस. घेऊन ये जा तुझं नोटबुक. मी आत्ता शिकवतो तुला.

पुढे दोन तास पितापुत्र– अध्ययन– सत्र चालू असावे. पहिल्यापासून अभ्यासाकडे लक्ष न देता मुलगा नापास झाल्यावर मात्र एका दिवसात सर्व गणित शिकवून टाकण्याची महत्त्वाकांक्षा धरणे हा स्वदेशी बापांप्रमाणे



विदेशी वापांचाही जन्मसिद्ध अधिकार असणार आणि प्रोफेसरसाहेब तोच अधिकार वजावत असणार हे उघडच आहे.

पित्याचे दुःख खरे होते, प्रामाणिक होते. त्यापायी त्यांची भूक हरपली होती. दीड वाजून गेला तरी त्यांनी आपला निर्जळी उपास काही सोडला नाही, मुलालाही काही खाऊ दिले नाही. बाहुलीशी खेळता खेळता छोटी कोचावरच झोपी गेली. पाहुणे चिंतातुर होत्साते पण टाइमपास म्हणून टीव्ही पाहत बसले. आणि मुलांची आई? स्वयंपाकपाणी संपवून आता आपले यजमान मुलाची किती कडक हजेरी घेणार, का त्याला मारणार, का उपाशीच ठेवणार अशा चिंतेत दिवाणखान्यात येरझारा घालत राहिली. थोड्या वेळाने खोलीचे दार उघडले आणि पितापुत्र बाहेर आले. बाहेर येताच मुलाने जाहीर केले– मम्मी, नाउ आय नो एव्हरीथिंग!

तणाव ओसरल्यावर सगळेजण टेबलाभोवती जमले आणि काही झालेच नव्हते अशा थाटात प्रार्थना करून जेवायला बसले.

हे दृश्य अमेरिकेतले? की इंग्लंडमधले? की जर्मनीतले? की जपानमधले? की भारतातले?

हे दृश्य कुटुंबसंस्था नांदत असणाऱ्या कुठल्याही मानव समाजातले.

आपले अभिमान किती लटके असतात! आम्हीच काय ते कुटुंबसंस्थेचे पावित्र्य मानतो, हा टेंभा आपण खुशाल मिरवतो. 'ते लोक' दारू पिणारे आणि सिगरेटी फुंकणारे म्हणजे व्यसनी असतात. 'आपले लोक' किती शुचिर्भूत असतात! मुलाबाळांसमोर तरी सिगरेट ओढत नाहीत, दारू पीत नाहीत, हे आपण खुशाल ठोकून देतो. आपला देश गरीब असल्यामुळे आपल्याला काबाडकष्ट फार करावे लागतात; त्या लोकांचं काय? त्यांना सगळा ऐषाराम मिळतो. पैसा असतो, गाड्या असतात. हे शेरे सर्रास ऐकू येतात. असल्या समजुती साफ खोट्या असतात असे नाही. त्यांत तथ्य असते, पण फार थोडे. 'ते लोक' काम फार करतात. करतात ते इमानाने करतात. विद्यार्थी, विद्यार्थिनी भरपूर अभ्यास करतात. आपल्याकडच्या छात्रांपेक्षा त्यांच्याकडील छात्रांना भरपूर गृहाभ्यास दिलेला असतो. ग्रंथवाचन नेमून दिलेले असते. त्याची टिपणे काढावी लागतात. विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेत कंबर

दुखेतो उभे रहावे लागते आणि मान मोडेस्तो काम करावे लागते. आपण केलेल्या प्रयोगाचे फलित काय आले आहे याचे सूक्ष्म निरीक्षण करण्यासाठी कधीकधी अपरात्री देखील प्रयोगशाळेत जावे लागते. आपल्याकडे या क्षेत्रात किती ढिलाई आहे! स्नातकोत्तर स्तरावरदेखील जुजबी अभ्यासावर भागवण्यात येते. रोज दोन तासदेखील सुविहित अध्ययनासाठी देण्याची गरज आपल्या देशात पडत नाही. एवढे करून वर ते चैनी आणि आपण खप्ये!

पाश्चात्य स्त्रीबद्दल तर आपले प्रचंड गैरसमज असतात. 'तिकडे' स्त्रिया स्वैरिणी असतात, धडाधड कुटुंबे कोसळतात, त्या वायकांना त्याची काही पर्वा नसते, त्या फुलपाखरी वृत्तीच्या असतात, फुलपाखरू जसे एका फुलावर टेकते, उडते, मग दुसऱ्या फुलावर टेकते– तीच गत या बायकांच्या प्रेमाची. भारतीय पतिव्रतांच्या निष्ठेची त्यांना काय कल्पना येणार? आर्य स्त्रीची पतिभक्ती त्या लोकांच्या कल्पनेपलीकडची असणार! असला बकवास आपण नेहमीच ऐकतो.

एकदा काय झाले–

पण मला ती सगळी हकीगतच सांगितली पाहिजे.

एक छोटेसे शहर. संपन्न देशातल्या अनेक शहरांपैकी एक. पण या शहराचे वेगळेपण असे की, गावचा कारभार चालवणारे मुख्य केंद्र म्हणजे तिथले नगरवाचनमंदिर. वाचनमंदिराचा प्रमुख हाच जसा काही नगराध्यक्ष, नगरपाल, कोतवाल आणि कारभारीही. तशात तो होता नामांकित प्रभावशाली कवी. तात्पर्य, जबरदस्त असामी.

मुलखावेगळ्या नगराची ही मुलखावेगळी कारभारयंत्रणा पाहायला तिथे अनेक मुशाफिर जात. तसाच मी एकदा गेलो. त्या थोर थोरल्या कारभाऱ्याने– मार्कने– माझे स्वागत केले. मार्क असेल साधारण ५५ वर्षांचा. मुद्रेवरून प्रगल्भ आणि प्रसन्न वाटणारा. दिमाखदार. त्याने मला नगरवाचनमंदिराचे सर्व विभाग दाखवले, त्यांची वैशिष्ट्ये सांगितली. ग्रंथ, मासिके, साप्ताहिके यांची तर तिथे रेलचेलच होती. त्याशिवाय बालवाचनालय, बालकांसाठी छंदःकक्ष, महिलामंडळासाठी विशेष सभागृह, पेंटिंग्जचे संग्रहालय– यांतून पुस्तकांप्रमाणे पेंटिंग्जही घरी लावण्यासाठी देण्याची सोय, ग्रामोफोन रेकॉर्ड्स्– कॅसेटस् इत्यादींसाठी असाच

विभाग... तात्पर्य, नाव लायब्ररी पण स्वरूप मात्र सांस्कृतिक संपन्नतेचे सर्वांगी संवर्धन करणाऱ्या संस्थेचे.

संस्था पाहता पाहता दुपारच्या जेवणाची वेळ झाली. भोजनकक्षही संस्थेतच असल्यामुळे मार्कने मला तिकडे नेले. आमच्या टेबलावर तीन माणसांसाठी वशा मांडलेल्या होत्या. मी कोड्यात पडू नये म्हणून मार्कने सांगितले, माझी वायको सोन्या आपल्यावरोबर जेवायला येईलच एवढ्यात.

सोन्या आली. असेल चाळीस-पंचेचाळीस वर्षांची. वय ओळखू येऊ नये अशी ती आकर्षक होती. तिचे केस पिंगट सोनेरी आणि डोळे निळे होते. नमस्कार चमत्कार होऊन हसत खेळत जेवण झाल्यावर मार्क म्हणाला, आता तुम्हांला विश्रांती नको असेल तर आपण, समुद्रकिनारी माझ्या एका चित्रकार मित्राने घर बांधले आहे ते पाहायला जाऊ या. लाकडाच्या ओंडक्यांचे ते घर त्याने आणि त्याच्या कुटुंवाने स्वतःच बांधले आहे. पाहा, येणार का? मी कशाला नाही म्हणेन! ६०/७० मैल दूर असलेल्या समुद्राच्या किनाऱ्यावरील त्या चित्रकाराच्या घरी आम्ही तासाभरात थडकलो. ओंडक्यांच्या पृष्ठभागावर चटया ठोकून खोट्या खोट्या भिंती तयार केल्या होत्या आणि जिथे तिथे सुंदर सुंदर रंगाकृती टांगलेल्या होत्या. बैठकीच्या जागी लोखंडी सांगाड्यावर मोठी कांगडी (शेगडी) ठेवलेली होती आणि तिच्यावर एका सॅमोव्हारमध्ये कॉफीचा उकाळा बुडबुडत होता. मस्त वातावरण, रसिक साथी-सोबती आणि खरपूस कॉफीचा उन्मादक गंध! वेळ कसा मजेत गेला. मी अस्सल भारतीय संस्कृतीचा उपासक असल्यामुळे शुद्ध कॉफी पीत होतो, तर बाकी मंडळी कॉफीत ब्रँडी घालून मिश्र काफीत रंगली होती!

परत शहराकडे येताना सोन्या मार्कला सतत सूचना देत होती– 'जपून चालव, वेग फार वाढवू नकोस, पुढे वळण आहे हां, आता रस्ता गावातनं जाणाराय, पाठीमागून पोलीसची गाडी येते आहे'... एक की दोन. बॅक सीट ड्रायव्हिंगचा जन्मसिद्ध अधिकार ती बजावत होती. मी बरोबर असल्यामुळे मार्क जराही चिडत नव्हता. मी दोघांची भरपूर टिंगल करीत होतो. 'तू आमच्या देशातल्या बायकांसारखीच आहेस', 'त्यापेक्षा तू दुहेरी

नियंत्रण असणारी गाडी का विकत घेत नाहीस', 'तुझ्यासारखी पिडणारी बायको असल्यावर कोणताही नवरा घटस्फोटच घेईल', 'तू फार गोड असल्यामुळे मार्क तुझी वटवट चालवून घेतो आहे'... थट्टेथट्टेत मी तिला वाटेल ते बोलत होतो. शेवटी मोटर घरापाशी आल्यावर मार्कने दाराशी गाडी थांबवली आणि खोटा सुस्कारा टाकून मला म्हटले, 'सुटलो बाबा हिच्या कटकटीतून! आता हे बडबडयंत्र घेऊन तू वर जा. मी रात्री जेवायला येईन तेव्हा भेटेन.'

आता तू कुठे जाणार आहेस, वगैरे काही विचारायच्या आतच मार्क निघूनही गेला. मी सोन्याच्या मागोमाग तिच्या घरात गेलो. ती मला म्हणाली, 'आता मीही दोन तास जाऊन येणार आहे. इथे पुस्तकं आहेत ती हवी तर चाळ, हा टाइपरायटर, हे कागद. तुला बायकोला पत्र टाइप करायचं असलं तर कर. फ्रीजमधे ऑरेंज ज्यूस आहे, बीअर आहे– काय हवं ते पी. भूक लागली असली तर इथे थोडं खायलाही ठेवलं आहे.'

मी विचारले, 'दोन तास तू कुठे जाणार?' ती म्हणाली, 'आमच्या दोन मुलांना मला शाळेतनं आणायचं आहे. मुलगी राहते तिच्या वडिलांकडे– म्हणजे मार्कच्या घरी आणि मुलगा राहतो माझ्याकडे– म्हणजे या घरी.'

मी अचंब्याने उद्गारलो, 'हा काय प्रकार आहे? मला नाही समजलं.' ती जराशी हसली आणि म्हणाली, 'समजेल थोड्या वेळानं.' मला अधिक बोलू न देता झर्रकन् ती निघूनही गेली.

ठरल्याप्रमाणे मी दोन तास वेळ काढला आणि ती तिच्या मुलाला घेऊन परत आली. दोघांच्याही हातांत पिशव्या आणि पुडे होते. ती होती रात्रीच्या जेवणाची जंगी तयारी.

एक एक करीत आठदहा माणसे आली. मग आला मार्क. त्याचा चेहरा नुसता फुललेला होता. स्वारीने पुन्हा बऱ्यापैकी मद्य झोकलेले असावे. त्याच्या डाव्या हाताचा विळखा पंचवीस-तीस वर्षांच्या एका तन्वीच्या कमरेभोवती लपेटलेला होता. ही मार्कची मुलगी नक्कीच नव्हती. ती होती त्याची प्रेयसी! नंतर समजले, ती फ्रेंच होती. गंमत अशी की, ती मार्कबरोबर आली याचे काहीच वैषम्य सोन्याला वाटलेले दिसले नाही.

मार्कने मैत्रिणीच्या मुखाचे एक मनसोक्त चुंबन घेतले आणिं सोन्याच्या कपाळावरही ओठ टेकवले. मग तो सर्व कंपनीत सामील झाला.

पार्टी जोरात झाली. नेहमीसारखी. थोडे नाचगाणे झाले. नगराचा तो सर्वेसर्वा कारभारी विनोद करीत होता, हसत होता, हसवत होता. मग एकाएकी त्याने आपला हात मैत्रिणीच्या कमरेभोवती गुंफला आणि म्हणाला, 'गुड नाइट फोक्स्. मी जातो.' माझ्याकडे वळून त्याने मला सांगितले, 'सोन्याकडे तिची मोटर आहे. ती तुला तुझ्या घरी जाण्यासाठी जवळच्या रेल्वे स्टेशनवर सोडेल. बाय बाय.'

मार्क हसत गेला– ढगासारखा आणि बरोबर त्याची ती भिंगरी– बिजलीसारखी.

आलेले पाहुणेही हळूहळू पांगू लागले. दोनतीन उरलेले पाहुणे आणि मी यांना आपल्या फॉक्स वॅगनमध्ये बसायला सांगून सोन्या जवळ जवळ मध्यरात्री निर्भयपणे निघाली. एकेका मित्राला सोडत शेवटी मला स्टेशनजवळ उतरवण्यासाठी तिने गाडी थांबवली. तिचा निरोप घेण्यापूर्वी मी तिला विचारले– 'मघाशी तू म्हणालीस की तुला समजेल सगळं थोड्या वेळानं. आता सांग, काय झालंय नेमकं!'

सोन्याने आवाजात जराही रडवेपणा न आणता सांगितले– 'अरे काही नाही. आमचा समाज श्रीमंत आहे ना? त्या श्रीमंतीच्या रोगाचे हे दुष्परिणाम आहेत. ही छेलछबिली माझ्या नवऱ्याला अशीच एका जंगी पार्टीत भेटली. मार्कला तिचं वेडच लागलं. तो तिच्या सलोनवर जाऊन राहू लागला. 'मी त्याला म्हटलं, 'मार्क ती जर तुझ्या मनात भरली असली तर खुशाल तू मला सोड आणि रहा तिच्याकडे. आपली मुलं आपल्याला दोघांना आवडतात ना! एक मी सांभाळते, एक तू सांभाळ. तुला मी तीन वर्षांची मुदत देते. तुझं प्रेम तिच्यावरच कायम असलं तर आपण फारकत घेऊ. नसलं, तर तू केव्हाही माझ्याकडे परत ये. घर तुझ्यासाठी उघडंच आहे असं समज. कारण माझं तुझ्यावर आणि फक्त तुझ्यावरच प्रेम आहे...'

मलाच विनाकारण भरून आलं होतं. 'सोन्या, तू ग्रेट आहेस. मघाशी आपण समुद्रावरून शहरात परत येताना तुम्ही लग्नगाठ पक्की असलेली नवराबायको आहात असं मी धरून चाललो होतो. आणि

तुझी भरपूर टवाळी केली होती. तू त्याबद्दल मला माफ करशील अशी मला आशा आहे.'

'काही नाही, काही नाही. त्यात काही विशेष बिघडलं नाही', असे म्हणत सोन्याने माझा सहजपणाने निरोप घेतला.

घरी परत येताना लोकल गाडीच्या चाकांच्या तालावर माझ्या मनात प्रश्नांची वलयावर वलये उठत होती. त्यांतला मुख्य प्रश्न एकच–

आर्य पतिव्रता फक्त आमच्याच देशात असतात [illegible] का? आणि असल्या तर त्या सोन्यासारख्या प्रगल्भ– मॅच्युअर– असतात का? आणि असे असणे चांगले की वाईट.

या यक्षप्रश्नाचे उत्तर कठीणच आहे. पण त्यात कोठे तरी भारतीयांच्या खोट्या अहंकाराच्या फुग्याला सपाट करून टाकणारी टाचणी निश्चितच लपलेली आहे.

०००

# काळ-नदीत बुडणारी तुमची आमची लेकरे

आपल्याकडच्या एका विद्वानाने एका अमेरिकन पुस्तकाचा मराठी अनुवाद केला. त्यात अनेक ठिकाणी 'लाल भारतीय', 'लाल भारतीय' असा उल्लेख आला होता. अनुवाद तपासून घेण्यासाठी गेला एका विनोदी लेखकाकडे. 'लाल भारतीय' हा शब्दप्रयोग पाहताच त्याचा त्रिफळाच उडाला. 'रेड इंडियन' याचा तो अनुवाद होता. इतका विनोदी अनुवाद करणे आपल्यालाही जमले नसते याची जाणीव होऊन तो खो खो हसत सुटला. पुढे त्या अनुवादाचे काय झाले ही एक वेगळी कहाणी आहे. ती राहू दे.

इथे प्रश्न लाल भारतीयांचा नसून पिंगट भारतीयांचा आहे. जे भारतीय देशांतर करून अमेरिकेत स्थायिक झाले आहेत, ते तिथे सुखी असोत. त्यांच्या वंशाचा वेलविस्तार होणारच, तसा तो होवो. पण अनेक वेळा वंशवेल वाढविण्यासाठी सोयरिकी झालेल्या असतात भारतीय कुटुंबांतच. थंड हवामानामुळे थोडाफार फरक पडला तरी ती संतती गौरवर्णीय थोडीच होणार! गोऱ्या कुटुंबांशी सोयरिकी झाल्या तरी देखील कातडीत असलेला मूळचा तपकिरी रंग पूर्ण लोप पावणे शक्य नाही. पांढरे उंदीर आणि तपकिरी उंदीर यांत संकर झाल्यावर वर्णसंकराचे दृश्य परिणाम प्रत्येक पिढीला कसकसे बदलत जातील याचे मेन्डेल या शास्त्रज्ञाने कोष्टकच दिले आहे. त्याच्या सिद्धांतात जास्त खोलवर न जाता एवढेच म्हटले तरी पुरे, की त्या तपकिरी आणि पांढऱ्या उंदरांची पिले कधी संमिश्र वर्णाची, कधी काही पांढरी, काही तपकिरी, कधी पिढीच्या पिढी पांढरी तर कधी पिढीच्या पिढी तपकिरी... पिढ्यान् पिढ्या बदलत जाणारे वर्णसंकराचे हे विचित्रायन! समजा, असेच झाले तर माणसांचाही पिंगट वर्ण अजिबात नाहीसा होणार नाही हे उघड आहे. आणि स्वदेशातल्या आजीबाई आणि आत्याबाई यांना जरी ती मुले गोरीपान दिसली तरी परदेशी डोळे फसणार नाहीत. कितीही प्रयत्न करा किंवा कितीही पाणी वाहून जाऊ द्या, पिंगट भारतीयत्वाची खूण पुसणे अशक्य.

ठीक आहे! चोखोबा म्हणाले होते, काय भुललासी वरलिया रंगा– बापहो, बहिरंगाचे राहू द्या. अंतरंग तर पालटू शकते की नाही? जरूर पालटू शकते. इतकेच नव्हे तर जे बुद्धिपुरस्सर अंतरंग पालटतात, नव्या निष्ठा स्वीकारतात,




त्यांच्या स्वभावातल्या कडवेपणाला एक वेगळीच धार येते. जन्मजात अमेरिकन माणसांपेक्षा अमेरिकेला दत्तक जाऊन अमेरिकन झालेल्यांचे

अमेरिकन संस्कृतीवरचे प्रेम अधिक गहिरे असते. उत्कट असेल नसेल, डोळ्यांत भरणारे असते. इतर संस्कृतींचा तिटकारा अशी माणसे फारच आवेगाने करतात. ही माणसे दुष्ट असतात असे नाही, नीच अथवा देशद्रोही असतात असेही नाही. त्यांना दुर्गुणी देखील म्हणता येणार नाही. असे काही म्हणणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय होईल. ही विपरीत करणी अगदी स्वाभाविकपणेच घडत जाते. सवयीने म्हणा, सरावाने म्हणा, अनुकरणप्रियतेने म्हणा किंवा वडीलधाऱ्यांच्या परधार्जिणेपणामुळे निर्माण झालेल्या, समकालीन फॅशन्सच्या आहारी जाण्यामुळे हे घडत असावे! कारणमीमांसेकडे दुर्लक्ष करून एक वास्तव म्हणून आपण या प्रश्नाकडे पाहिले तर आज दिसणारे चित्र म्हणजे दीर्घकालीन चलच्चित्राचा केवळ आरंभ आहे असे म्हणता येईल.

आज अमेरिकेत जे भारतीय राहतात, त्यांच्या स्थूलमानाने तीन पिढ्या आहेत. पहिल्या पिढीला भारताविषयी आजही भरपूर आत्मीयता आहे, भारतीय संस्कृतीविषयी प्रेम आहे. भारतीय साहित्याशी सर्वांचा गाढ परिचय नसला तरी बऱ्यापैकी ओळख आहे. भारतातील अनेकांशी त्यांचे स्नेहबंध आहेत. वारंवार येणे-जाणे सुरू राहावे असे त्यांना वाटते. दूरदेशी परभाषेच्या मुलखात आपली भाषा बोलणाऱ्या माणसांचे आवाज कानावर पडले की त्यांना रोमांचित व्हायला होते. 'आपल्या'कडचे खाणे-पिणे म्हणजे त्यांचा महदानंद असतो. सारांश, 'पोटासाठी भटकत जरी' ते दूरदेशी गेलेले असले तरी त्यांच्या मनात आपण कोण आहोत या विषयी ज़राही शंका नसते. स्मरणसुखात (नोस्टाल्जिया) गुरफटून घ्यावे आणि वियोगाचा बोचरा गारठा तेवढ्याने दूर करावा हा छंद त्यांना आहे. त्यांच्या नंतरची पिढीही आता अनेक वर्षे अमेरिकेत स्थायिक झालेली, हुद्देदार, श्रीमंत आणि आधुनिक जीवनाला सरावलेली– चटावलेली, पण तरीही दोन चार वर्षांनी का होईना, मायदेशच्या मायेचा वारा खाल्ल्याशिवाय बरे न वाटणारी अशी. नंतरची तिसरी पिढी मात्र अगदी वेगळी. तिचा भारताशी आधी संबंधच आलेला नाही. या देशाच्या वळचणीला त्यांचा खोपा कधीच नव्हता. या नव्या पिढीतली माणसे तिकडेच जन्मली, तिकडेच शिकली, वाढली. आपले वाडवडील भारतातून इकडे आले एवढेच त्यांना माहीत आहे.

वडीलधाऱ्यांची भाषा त्यांना बोलता येत नाही, वाचता येत नाही. समजली तर थोडी थोडी समजते– क्वचित् मूळ मराठी भाषिक असलेल्या घरातली ती मुले आता मराठी बोलली तर गेल्या शतकातल्या किंवा आजही आपल्या नाटकातल्या पाद्र्यासारखी किंवा गोऱ्या सोजिरासारखी बोलतात. आपल्या बेबीला अमेरिकन ॲक्सेंटमध्येच फक्त इंग्लिश बोलता येते, आपल्या बाबाला मराठीची अक्षरओळखही नाही हे आईवडील सहजपणे आणि अभिमानाने सांगतात. यात काही गैर आहे असे कोणालाच वाटत नाही.

घड्याळाच्या लंबकाप्रमाणे दुसऱ्या टोकाला जाणारी माणसेही देशांतरी नांदताहेत. ती जानवी घालतात, घरात धोतर नेसून उघडीबंब फिरतात, सण साजरे करतात, 'एकादशी– दुप्पट खाशी' हे व्रत आचरतात. श्रावणी देखील करीत असतील! देऊळ बांधायसाठी किंवा स्वदेशातील धर्मजातींचे सोवळे भांडे सांभाळणाऱ्या संस्थांसाठी ती निधी जमवायला मदत करतात. आता या गोष्टींतच भारतीय संस्कृती ज्यांना दिसत असेल त्यांचे एवढ्याने समाधान होत असेल तर ठीकच. मात्र या जमातीतसुद्धा मुले-मुली आणि त्यापेक्षाही नातवंडे पूर्वजांचा कित्ता गिरवतील अशी आशा त्यांनी न धरलेली बरी.

खरा यक्षप्रश्न आहे, तो संस्कृती आणि भाषा यांच्यापुरता मर्यादित नाही. यक्षप्रश्न आहे तो राष्ट्रीय अस्मितेचाही! ज्या दिवशी जगातल्या सर्वच राष्ट्रीय अस्मिता पुसल्या जातील त्या दिवशी हा प्रश्न सुटलेला असेल. भगवद्गीतेत म्हटले आहे, 'सर्वत्र पाणी, पाणी आणि पाणीच झाल्यावर विहिरीला, जलाशयाला काही अर्थ उरतो का?' सर्वच राष्ट्रीय अस्मिता मावळल्या तर तुम्ही अमेरिकन, का ब्रिटिश, का कॅनेडियन, का चिनी, का भारतीय याला काहीच अर्थ उरत नाही. अशी अवस्था केव्हा येईल ती येवो. डॉ. लोहियांना एकदा त्यांची आदर्श जगाची कल्पना विचारली असता त्यांनी फार सुंदर उत्तर दिले. ते म्हणाले होते, 'ज्या जगात कुठेही जायला पासपोर्ट लागणार नाही ते आदर्श जग'. अशी स्थिती अजून हजारो वर्षे तरी येईल असे वाटत नाही. त्यामुळे विनोबांसारखा कोणी द्रष्टा 'जय जगत्'ची घोषणा करो, आम्हां छोट्या माणसांना राष्ट्रीयत्वाच्या संरक्षक कवचाची फार फार गरज वाटते आणि ज्यांचे

राष्ट्रीयत्वच धोक्यात आले आहे, त्यांच्याविषयी चिंता वाटते, कीव वाटते आणि त्यांचे आपले नाते तुटेल की काय, असे भय वाटते.

देशांतरीची मुले जेव्हा माझी भाषा नाकारतात, त्यांना जेव्हा आमचे साहित्य आवडणे सोडाच पण समजूही शकत नाही, भारतीय संगीत म्हणजे ज्यांना आशयशून्य आऽऽ ऊऽऽ ची कसरत वाटते, त्यांची माझी जवळीक साधायची कशी? मी गरमागरम थालिपीठ आणि लोणी खात असताना त्याला नाक मुरडून जर ती वर्गरचाच लचका तोडणार असतील तर अशी पार्टी किती दिवस रंगू शकेल? भारतीय इतिहास, मिथ्ये, सृष्टिवैभव, जनसमुदायाचे नाच-गाणे, सण-उत्सव, कशाकशात जर या मुलांना तिळमात्र गोडी नसेल तर आम्ही दोन वेगळ्या ग्रहांवर राहतो असेच मला वाटणार. हिमालयाची अत्युच्च शिखरे किंवा कन्याकुमारीचा तीन समुद्रांचा संगम या गोष्टी भारतात नसून तैवानमध्ये किंवा सुदानमध्ये असलेल्या ज्यांना चालतील, त्यांच्याशी माझे भांडण आहे. जगातले जे जे उत्तम, उन्नत आणि उदात्त आहे ते भारतात आहे असे म्हणण्याचा गर्विष्ठपणा मी करणार नाही; पण भारतात जे जे उत्तम, उन्नत आणि उदात्त आहे त्याचे जगाने कौतुक केले नाही तर त्याचा मला राग येईलच.

देशांतरीची नवी पिढी आता म्हणू लागली आहे, 'आम्ही भारतीय नाहीच मुळी!' टोरांटोच्या मराठी भाषिक मंडळाच्या स्नेहमिलनाचा एक भाग म्हणून जे सांस्कृतिक कार्यक्रम झाले त्यांत युवकांचे मनोगत स्पष्टपणे मांडण्याचा एक प्रयत्न झाला. युवकांचे म्हणणे असे की, तुमची भाषा आम्हांला येत नाही म्हणून आम्हांला नावे ठेवू नका, हसू नका. आम्ही महाराष्ट्रीय नाही की भारतीयही नाही. आम्ही कॅनेडियन आहोत. फार फार तर असे म्हणता येईल की आम्ही मूळ वसतिस्थान भारतात असलेल्या भारतीय वंशाचे कॅनेडियन आहोत. या वाक्याला लहान-मोठ्या प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून शाबासकी दिली. मूळ उद्‌गार भयंकर की शाबासकी भयंकर, असा विचार माझ्या मनात आला.

त्या दिवशी रात्री झोप कशी ती येईना. अनेक प्रतिक्रियांनी मनात एकच गलबला माजवला—

*'अरे हुडुत... मग आज इथे आलातच कशाला?'*

*'डोमकावळ्यांनी मोरांची पिसे लावली म्हणून मोर त्यांना आपल्यात*

घेणार नाहीत. एक दिवस तुम्हांला टोचून टोचून पळवून लावतील. कदाचित्, ठारही करतील.'

'या पुढचा इदी अमीन कुठल्या देशात जन्माला येईल, ते कोणी जाणले आहे? तो कॅनडात जन्माला आला तर काय कराल?'

'स्किन हेड्स् आणि ब्राउन बॉम्बर्स या इंग्रज असुरांचे साम्राज्य इतर खंडांत पसरणार नाही असे समजू नका.'

'युरोपीय वंशाच्या अतिरेक्यांना भारतीय, पाकिस्तानी, बांगला देशी, ब्रह्मी, सिलोनी, अफगाण... सगळे सारखेच असतात, 'पाकी' असतात हे विसरू नका.'

'सध्याच कॅनडात आशियाईंना समजून घ्या, सामावून घ्या असे म्हणणारे राजकीय पक्ष आहेत, याचे कारण एकच. आशियाईंना जागा देऊ नका असे म्हणणारे आहेत म्हणूनच.'

'केवळ भीतीमुळे, धाकामुळे आम्ही भारतीय आहोत असे म्हणू नका. पण बाळांनो, या विचित्र जगात, या संघर्षमय युगात कधी शरणार्थी व्हाल, सांगता येत नाही. युगांडातले लोक तिथे लाथ बसल्यावर आणि ब्रिटननेही दरवाजे बंद केल्यावर कुणीकडे गेले? जे लोक सोन्याच्या शिडीवरून वैभवाच्या शिखरावर पोहोचले होते ते इदी अमीन नावाच्या सापाच्या तोंडातून मूळ स्थानी पहिल्या घरात– भारतात आले.'

'तुम्ही खुशाल नाकारा तुमचे भारतीयत्व. भविष्यकाळात तुम्ही नाही तर तुमची नातवंडे, पतवंडे किंवा त्यांचीही नातवंडे, पतवंडे... अडलेली-नाडलेली, चुरडलेली, भिकेला लागलेली, तिय्यम नागरिक किंवा गुलाम म्हणून आयुष्य कंठणारी, आपली पाळेमुळे (रूट्स्) शोधत भारतातच येतील. तेव्हाही उदारतेने भारतच त्यांना दारे उघडून आत घेईल आणि पोटाशी धरील.'

'अरे, तुम्ही नाकारता तो वारसा साधासुधा नाही, तो फार मोठा आहे. 'यूनान, मिस्र, रूमा सब मिट गये जहांसे'– ग्रीस, इजिप्त, रोम यांची नावनिशाणी जगात राहिली नाही पण ज्याची छत्रच्छाया कायम आहे त्या भारताचा टिळा तुमच्या भाळी लागलेला आहे. तुम्ही कसेही असा, कुठेही असा, जगाला सांगा, 'कुछ बात है कि हस्ती मिटती नही हमारी'– अशा 'सारे जहाँसे अच्छा' असलेल्या देशाचे आम्ही वारसदार आहोत.'

दुसरा दिवस उगवला. आता भावनांचा हलकल्लोळ थांबला होता. कोणारकला सारा देश पाठीशी घेऊन पूर्व समुद्राच्या किनाऱ्यावर उभे राहावे, समोर क्षितिजापर्यंत लाटा उचंबळत असतात आणि त्यांच्या मागून सूर्याचे आरक्त बिंब डोके वर काढीत असते. भावनांच्या हलकल्लोळाच्या मागून वर डोकावणारा विचार असाच घासून पुसून लख्ख झालेला विचार असतो.

देशांतरीच्या बांधवांशी आपले संबंध कसे वाढवता येतील, स्नेहबंध कसे दृढ करता येतील, कोळपत चाललेल्या वृक्षवेलींना नव्या धुमाऱ्यांची फूट कशी फुटेल याचा विचार आपण स्वत:पासून केला पाहिजे आणि इतरांनाही तो करायला प्रवृत्त केले पाहिजे, यापेक्षा वेगळा निर्धार अशा क्षणी दुसरा कोणता असू शकणार?

आपल्या मनात कवितेची शिंपण पहिल्यापासून होत आली असली तर मनाशी संवाद होत असताना किंवा आपुलाचि वाद आपणासी होत असताना कवितेतलेच काही आठवते. मला भा. रा. तांबे यांनी रॉबर्ट ब्राउनिंगच्या 'पाइड पायपर'चा केलेला अनुवाद आठवला– त्यातला पुंगीवाला कोतवालाच्या विनंतीवरून गावातले सर्व उंदीर पुंगी वाजवून भुलवतो, झुलवतो आणि शेवटी नदीच्या पाण्यात बुडवतो. आपले काम झाल्यावर कोतवाल पुंगीवाल्याची बक्षिसी नाकारतो. मग पुंगीवाला पुन्हा आपली पुंगी वाजवतो तेव्हा गावातली मुले त्याच्या मागे जातात. तीही तशीच नदीत बुडतात, आणि पाताळमार्गे जाऊन चीन देशात प्रकट होतात.

**असे चीन देशामधें एक जात, निराळी तिची त्या स्थळीं रीतभात**
**निराळें तिचें रूप, तैसाच वेष बघोनी जनीं बोलवा ही विशेष**
**'कुणी एकदा भूमिच्या गूढ पोटीं मुलें कोंडिलीं भारतीं सान-मोठीं**
**तयांची असे संतती येथ आली न ठावी परी त्या कशी, कोण काळीं!'**

माझ्या मनात विचित्र कल्पना आली, संपन्नतेच्या पुंगीला भुलून निघालेली आमची हजारो मुले काळनदीत बुडाली, ती तूर्त अमेरिका खंड नामक पाताळात आहेत. ती हरवलेली जमात एखाद्या तार्तार देशात कायमची नाहीशी होऊ नये यासाठी आपली प्रेमाची हाक त्यांच्या कानावर पडायला हवी.

०००



# धर्मभेद बरे पण चर्मभेद भयंकर!

'काळे राळे, गोरे राळे, राळ्यांत राळे मिसळले.' हे पालुपद आमच्या लहानपणी आम्ही एकमेकांना म्हणायला सांगत असू. सावकाश वेगाने हे वाक्य उच्चारले तर उच्चारात घोटाळा होण्याची शक्यता कमी असायची, पण वेग जसा वाढवत जावे तसतशी र, ळ ही अक्षरे एकमेकांत मिसळून जात आणि अखेर सर्वांचीच बोबडी वळे. या गमतीचे कारण र आणि ळ यांचे पुनरावृत्त होणारे साहचर्य म्हणजे जिभेची एक अवघड कसरत! टंग ट्विस्टर म्हणतात ते हेच. आता मला यात दुसरी एक गंमत दिसू लागली आहे. गौरवर्णीय आणि कृष्णवर्णीय माणसे सरमिसळ होऊ लागली की काही ना काही घोटाळे अटळच असतात. ब्रेन ब्रेकर्स किंवा हार्ट हार्मर्स म्हणू या त्यांना. गौरवर्णीय



आणि कृष्णवर्णीय दोन्ही माणसेच ना? फरक काय तो कातडीच्या रंगाचाच ना? तर मग त्यांच्यात एवढा प्रचंड विद्वेष का असावा?

या प्रश्नाची बाळबोध सोडवणूक करायची म्हणजे गौरवर्णीयांना उन्मत्त साम्राज्यशाहीवादी म्हणायचे आणि कृष्णवर्णीय तेवढे भरडले जाणारे, पीडित, गरीबडे, बिच्चारे असतात असा सोप्पा निष्कर्ष काढून मोकळे व्हायचे.

हे अंकगणित इतके सरळ नाही. व्यस्त आहे. आपल्या अधिकारांची जाणीव झालेल्या कृष्णवर्णीयांची संख्या जेथे गौरवर्णीयांपेक्षा मोठी असते तेथे कृष्णवर्णीयांचे समुदाय गौरवर्णीयांना धाकात ठेवू शकतात. धाक म्हणजे चक्क प्राणभय! जगात अपवादात्मक का असेनात, पण अशाही

घटना घडतात की जिथे गोरे लोक काळ्या लोकांना घावरून भिजल्या मांजरागत चोरपावलांनी वावरतात.

आपण माणसे कशी कोडगी असतो. आपल्यावर अन्याय झाला की आपण जगाच्या चावडीवर त्याची हाकाटी सुरू करतो. पण तोच अन्याय दुसऱ्यावर करताना आपल्याला दिक्कत वाटत नाही. आफ्रिका खंडात आणि अमेरिकेत गोऱ्यांनी ज्यांच्यावर गुलामी लादली ते नीग्रोवंशीय लोक वंशभेदाचाच आसूड घेऊन, तपकिरी अथवा पिवळ्या रंगाच्या आशियाई लोकांशी बंधुभावाने वागत असतील, असला भोळसट गैरसमज कोणी करून घेऊ नये. 'वरच्या लत्ता झेलित माथां। सवेचि हाणी खाली लाथा' या गोविंदाग्रजांच्या उक्तीप्रमाणे कृष्णवर्णीय माणसेही आशियाई बांधवांशी( ?) गुर्मीनेच वागत असतात.

माझा एक तरुण मित्र फार हुशार डॉक्टर आहे. अपघातात सापडलेल्या हतभागी लोकांवर तातडीने इलाज करणे या विषयात त्याने विशेष कौशल्य (स्पेशलायझेशन) प्राप्त केले आहे. एकंदरीतच भारतीय डॉक्टर सापेक्षतः अधिक वाकबगार, अधिक इमानी, तत्पर असतात असा त्यांचा अमेरिकेत लौकिक आहे. पण माझ्या मित्राचे अनुभव फार विचित्र आहेत. दारूच्या धुंदीत बेफाम गाडी हाकणारी कृष्णवर्णीय मंडळी अपघातात सापडतात आणि जबर जखमी होऊन बेहोष अवस्थेत इस्पितळात दाखल होतात. शुद्धीवर आल्यावर आपल्याला जीवदान देणाऱ्या भारतीय डॉक्टरचे आभार मानण्याऐवजी 'तू कॉकेशस वंशीय आहेस, आमच्या देशात कशाला आलास? चालता हो...' ही भाषा त्याला ऐकवण्यात येते. किंवा 'अरे इंडियन डुकरा, आमच्या देशातून तू केव्हा घरी जाणार?' असला सवाल हे दारुडे त्याला ऐकवतात आणि मनातली तळमळ ओकून टाकतात. एकदा तर एक मोटरगाडी उलटी पालटी होऊन प्रचंड विद्युद्भार वाहून नेणाऱ्या तारांत गुरफटली. ती गाडी आणि आतले प्रवासी यांना सोडवणार कोण आणि कसे? पण ते काम प्रयासाने कोणा बहाद्दराने केले. अपघातग्रस्तांना आपल्या भारतीय डॉक्टर मित्राच्या स्वाधीन केले. पेशंटची लघवी तपासणे आवश्यक होते. तसे त्याला सांगितल्यावर त्याने डॉक्टरसमोर आपल्या चड्डीतच लघवी केली. त्याचे कपडे फाटून गेले होते, ते बदलावे लागले. आवश्यक ते इलाज

करून झाल्यानंतर अपघातग्रस्तांनी एकच हेका डॉक्टरांजवळ धरला– तुम्ही आमचे कपडे फाडलेत, नव्या कपड्यांसाठी आम्हांला पैसे द्या. ताबडतोब पैसे द्या, आत्ताच्या आत्ता पैसे द्या.

कदाचित डॉक्टर कोणत्याही वर्णाचा असता तरी त्यांनी हेच केले असते, डॉक्टर ताम्रवर्णीय भारतीय आहे हे पाहिल्यावर त्यांना अधिकच चेव आला होता.

गौरवर्णीय गुंडांच्या टोळ्या इंग्लंडमध्ये आहेत, अमेरिकेतही आहेत. पण अशाच कृष्णवर्णीयांच्या काही टोळ्या– निदान अमेरिकेतील काही शहरांत– आहेतच आहेत. अटलांटाला काळ्या लोकांसाठी भुयारी नगरच वसविण्यात आले, शिकागोतही त्यांचा धुमाकूळ असतो. आश्चर्य म्हणजे राजधानी वॉशिंग्टनमध्ये काळ्या लोकांची वस्ती आहे आणि तेथे त्यांच्या टोळ्याही पुष्कळ आहेत. हे सगळे गरीब असतील असे आपल्याला वाटते, पण हाही एक भ्रमच. प्रचंड ऐषआरामी मोटरींचा षौक कृष्णवर्णीयांनाच अधिक आहे. कृष्णवर्णीय गुंडांच्या गुंडगिरीचा एक नित्याचा प्रकार म्हणजे कोणा तरी श्रीमंत दिसणाऱ्या एकट्या दुकट्या फिरस्त्याला गर्दी नसेल त्या ठिकाणी गाठून त्याला मोफत 'राइड' देऊ करणे आणि मग मोका बघून लुटणे! त्या बापड्यापाशी फारसे काही मिळाले नाही तर, तो कफल्लकासारखा का हिंडतो, म्हणून त्याला खडसावून त्याच्या छातीत खंजीर खुपसणे किंवा गोळी घालणे. एक गोष्ट खरी की अशा घटना काही रोज रोज घडत नसणार. पण अधून मधून घडल्या तरी त्यांचा भरपूर बभ्रा होतो आणि सर्व जण अशा गुंडांची कायमची धास्ती घेऊन बसतात.

गोऱ्या-काळ्यांतली भेदभावना ओसरत जाऊन त्यांना समंजसपणे एकत्र नांदणे शक्य होईल का? कदाचित होईलही. माणसांच्या आवडीनिवडी या राहणारच. गोऱ्या माणसांना गौर वर्णाचे आणि सोनेरी पिंगट केसांचे कौतुक फार वाटते. तसे ते नेहमीच वाटत राहील. पण काही थोड्या गोऱ्यांना का होईना 'काळी सांवळी राजसबाळी' (ब्लॅक इज ब्यूटिफुल!) असे वाटेलच. कृष्णवर्णीय तरुणांना असंख्य छोट्या स्प्रिंग्जसारख्या कुरळ्या केशसंभाराचे अप्रूप वाटत असेल आणि तरुणींना काळ्यासावळ्या तरुणांच्या भरदार देहयष्टीचे किंवा रुंद जिवणीचे सौंदर्य भावत असेल.

पण यातही कधी ना कधी रुचिभेद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र एक खात्री वाटते : भारतीय वंशाचे लोक आणि नीग्रो वंशीय कधीच प्रेमभराने एकत्र नांदणार नाहीत!

अमेरिकेतील गौरवर्णीय तरुण-तरुणी आणि कृष्णवर्णीय तरुण-तरुणी आता खूपच सरमिसळपणे वावरतात. क्रीडा आणि संगीत या दोन क्षेत्रांत काळ्या आदमींचे निर्विवाद वर्चस्व आहे. नीग्रो धावतात बेहोषीने. मुष्टियुद्ध खेळतात इरेसरीने. इतरही मैदानी खेळांत, बारा बैलांची ताकद स्नायूंत रिचवली असल्याकारणाने, झुंज घेतात. गातात तेव्हा तळहातावर पंचप्राण घेऊन ते चहुदिशांत भिरकावून देतात. वाद्ये वाजवताना आग्या ढोल असो किंवा झंझावाती झांज असो, अशा जोरकस आघातांचा मारा करतात की हजारो देहांमधल्या धमन्यांनी या वाद्यांच्या ठेक्यावरच ठोके द्यावेत. पण हे सगळे अद्‌भुत करीत असताना जर चार गोरे चेहरे त्यांच्या जल्लोषात सामील झाले तर नीग्रो त्यांचा दुस्वास नाही करीत. गोरे-काळे, काळे-गोरे मिसळून खेळतात आणि मिसळूनच नाचतात. भारतीयांची गोष्ट वेगळी आहे. ते अशा गंगायमुना संगमापासूनही जरा दूरच राहतात. कधी बागेत 'तरुणतरुणींची सलज्ज कुजबुज' चालते, त्यात गोरा युवक आणि काळी युवती रंगात दंग झालेली असतात. कधी काळ्याकभिन्न पहाडी छाताडावर गौरकाय नाजुक वेल विसावलेली असते. पण असे प्रेमाचे नाते भारतीय आणि नीग्रो यांच्यात कधीच दिसत नाही. मला वाटते, भारतीय आपल्याला गोऱ्यांहून गोरे समजतात. गोऱ्या रंगाचे वेड भारतीयांइतके दुसऱ्या कोणाला क्वचितच असेल. पुराणकथांची गोष्ट वेगळी. त्यांत देवाधिदेव महादेव शंकर सोडल्यास श्रीराम, श्रीकृष्ण हे देव काळे सावळेच आहेत, मेघश्याम, घनश्याम आहेत. नीलोत्पलदलश्याम आहेत. 'गौरतनु जानकी, राम घननीळ तो। रुक्मिणी गोरटी कृष्ण काळा। सावळा वर बरा गौर वधुला। नियम देवादिकीं हाचि परिपाळिला॥' हे आपले साहित्यात ठीक आहे. पण 'चिंगी तुला नवरा कसा हवा, काळा की गोरा?' याचे उत्तर मात्र 'गोरा' असे येते! ही स्थिती नवऱ्याची. मग नवरीचा वर्ण तर काय विचारावा? 'गोरी गोरी पान, फुलासारखी छान' अशाच वहिनीची ऑर्डर छोटी आपल्या दादाला देते. आपल्या देशातले एक थोर वादक कलाकार नुकतेच अमेरिकेत गेले होते. त्यांचा आकार

शिलाखंडासारखा आणि रंग शाळिग्रामाचा. विमानतळावर कृष्णवर्णीय हमाल त्यांचे सामान उचलून नेण्यासाठी आला. तेव्हा ते व्यथित होऊन अमेरिकेतील आपल्या यजमानाला म्हणाले, 'काय हो काळा काळा रंग हा!' भारतीय यजमानाला थोडी विनोदबुद्धी होती. त्यांनी हसून प्रतिप्रश्न केला– 'काय अण्णा, फार दिवस, आरशात स्वतःला पाहिलं नाही वाटतं?' याच्यावर आमचे ते वादक कलाकार ढगासारखे हसले– काळ्या नव्हे हां, पांढऱ्या ढगासारखे!

मानवाचे अंती एक गोत्र, असे कितीही कवींनी कितीही प्रकारांनी सांगितले तरी या गोत्रातली भाऊबंदकी गोडीगुलाबीने मिटण्याची आज तरी चिन्हे नाहीत. राष्ट्रभेद मावळतील कदाचित पण रंगभेद, रूपभेद आणि या दोहोंवर आधारलेला वंशभेद– छे छे! कफ, वात, पित्त तिन्हींमधील बिघाडामुळे मानवतेला जडलेली त्रिदोषाची व्याधी केव्हा हटणार हे सांगणे ब्रह्मदेवालाही शक्य नाही.

ooo



# बर्फातले बांफ, तिथे गंधकाची वाफ


शहराचे नाव कॅलगेरी.

देश कॅनडा.

कॅनडा आणि कानडा यांचा काही संबंध नाही.

पण कालगेरी हे नाव मात्र तद्दन कानडी असायला हरकत नाही. कर्नाटकात केरे, गेरे, केरी, गेरी हे शब्द ग्रामनामाच्या उत्तरार्धात आले की समजावे, या गावाजवळ एक मोठे तळे आहे किंवा होते. जसे दुधाचे सरोवर या अर्थी हालगेरे. पण कॅलगेरीला अर्थातच ही व्युत्पत्ती लागू नाही असे मी समजत होतो. लवकरच मला कळले की या शहरात आलोच आहे तर जवळच असलेला तलाव पाहिल्याशिवाय जाणे म्हणजे शुद्ध अरसिकपणा होय.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे



जवळच म्हणजे सुमारे दोनशे मैलांवर! त्या खंडाच्या मानाने हे अंतर जवळचेच. कॅलगेरीला पोचलो तेव्हा अंधार झालेला होता. माझ्या कल्पनेपेक्षा कॅलगेरी मोठे शहर निघाले. घरी जाईस्तो भरपूर गप्पा झाल्या. कॅलगेरीच्या यजमानांनी 'जवळच्या' सरोवराची महती माझ्या मनावर बिंबवली. त्यामुळे रात्री झोप येईस्तो आपण तिकडे गेलेच पाहिजे हेच मनाशी घोकत राहिलो.

दिवस उजाडला. तापमान शून्यावर स्थिरावले होते. बाहेर डोकावून पाहिले तर झिरिमिरी झिरिमिरी बर्फाच्या म्हाताऱ्या वरून खाली गिरगिरत होत्या. रस्त्यांत बर्फ साठत चालले होते. हिरवळीवर मोठमोठे पांढरे धब्बे साठू लागले होते. झाडांचे शेंडे आणि अस्ताव्यस्त फांद्यांची अग्रे... सर्वत्र बर्फच बर्फ.

थोड्या वेळाने सकाळची उन्हे आली. हिमवृष्टी थांबली पण तापमान शून्यावर ते शून्यावर. ऊन आणि बर्फ, यांचे असले सहजीवन मी प्रथमच पाहत होतो. 'तू पड, मीही पडतो' असा समजूतदारपणा दोघेही दाखवीत होते. या समजूतदारपणापायी भर मध्यान्हीही तापमान शून्य. उन्हे कलली. सूर्याचे किरण तिरपे पडू लागले. तापमान शून्य...

तात्पर्य, सर्व दिवस शून्य अंश तापमानात गरम गरम काहीतरी लपेटून स्वस्थ बसून राहणे हा एकच महान उद्योग त्या दिवशी करणे शक्य होते. जे मद्यपान करू शकतात ते कदाचित् आतूनही स्वतःला तापवू शकत असतील. पण हालचाल म्हणाल तर अशक्यच! साहजिकच कितीही जवळची असली तरी सरोवराची सफर त्या दिवशी जमण्यासारखी नव्हतीच. संधी हुकल्याचा परिणाम एवढाच झाला की उत्कंठा द्विगुणित झाली आणि आणखी एक रात्र न पाहिलेल्या सरोवराचे चित्र डोळ्यांसमोर आणण्यासाठी उपयोगी पडली.

दुसरा दिवस उजाडला तो उत्तम हवा घेऊनच. 'दिशः प्रसन्नाः मरुतो ववुः सुखाः' (दिशा उजळ अन् वारे सुखकर) अशी हवा. कोवळ्या उन्हात स्वाऱ्या सरोवराकडे निघाल्या. अशा यक्षभूमीचे नावही विचित्रच हवे, नाही का? ते आहे बांफ. वाट वळणाची. दोन्ही बाजूंना विचित्र आकारांच्या तेढ्या-मेढ्या शिखरांच्या रांगा. बर्फ आणि काळे करडे कडे यांतून निर्माण झालेली महाप्रमाण कृष्णधवल छायाप्रकाश चित्रे. धुळीने

कणभरही धूसर न झालेली सृष्टी. पाहावे ते सारे लखपख आणि स्वच्छ. निसर्गरम्य प्रदेशाकडे जाताना प्रवासाचा मार्ग गलिच्छ करून टाकण्याचे नाना प्रकार आपण स्वदेशी पाहतो. पण तो देश कानडा, आणि कानडा शब्दाचा संत साहित्यात अर्थ आहे 'अद्‌भुत.' बांफ नगरी देखील आहे-नाहीच्या सीमेवर उभी आहे. म्हणजे ती वास्तवातली आहे की स्वप्नातली ते कळत नाही. मजेशीर मायाबाजार, खमंग आणि स्वादिष्ट पदार्थांचे वास दरवळत ठेवणारी उपाहारगृहे. या खंडातल्या मूळ वस्तीकरांचे चित्रविचित्र पोषाख आणि अलंकार यांचेही हाट ठिकठिकाणी थाटलेले. ते तर पाहावेतच पण ते सर्व एकत्र पाहण्यासाठी इथला अजबखानाही पाहावा. इथल्या वन्य जनावरांची आणि तऱ्हेवाईक पक्षिगणांची ओळखही बांफच्या अजबखान्यात उत्तम प्रकारे होऊ शकते. बांफच्या रस्त्यांतून हिंडताना आपण उत्तर अमेरिका खंडात नसतो, कॅनडा नावाच्या देशात नसतो, आपण एखाद्या अनोळखी देशाच्या मध्ययुगीन आटपाट नगरात भटकणारे फिरस्ते असतो. हिंडत हिंडत फिरत फिरत जराशी मुलूखगिरी केली म्हणजे आपण पोचतो एका चमत्कारिक क्षेत्रापाशी. हिमाच्छादित पर्वतराजीला खिजवणारी– किंवा फसवणारी म्हणा हवे तर– इथे आहेत गरम पाण्याची कुंडे. अज्ञात आणि गूढ गुहांमधून गंधकमिश्रित पाणी वाहणे हा चमत्कार आपण अनेक ठिकाणी पाहतो, तोच बांफला पाहायचा. पण हे पाणी कुठल्याही देवतेच्या अंगठ्यातून किंवा जटेतून आलेले नाही हे एक वैशिष्ट्य आणि दुसरे म्हणजे त्याचा उपयोग कोणीही रोगनिवारण किंवा पापनिर्मूलन यांसाठी करीत नाही. एखाद्या शांत स्वभावाच्या विशाल एकत्र कुटुंबात एक दोन संतापी माणसांना समजुतीने सांभाळून घ्यावे तशी इथली हिमशीतल मंडळी या उष्णोदकवाल्यांना सांभाळत असतात.

मुख्य सरोवर मात्र बांफपासून थोडे फटकून पण शिवेपासून जवळ निवांत पहुडले आहे. लेक लुई! एक जलाशय... बर्फील्या थंडगार पाण्याचा न डहुळणारा छोटा समुद्रच... न कोणी बांधलेला... न कोणी खोदलेला... न भूमीच्या पोटातल्या जिवंत झऱ्यांनी जमिनीतला खळगा भरल्याने निर्माण झालेला. पाणी इतके शुद्ध आणि स्वच्छ आहे की नास्तिकांनी सुद्धा त्याला स्वर्गीय म्हणायला हरकत नाही.

सहजपणे घरंगळत आलेल्या हिमनदीने आणि आस्ते कदम वितळत राहिलेल्या हिमखंडांनी लेक लुई नावाचा हा जलदर्पण निर्माण केला आहे. पाणी आपली शुद्धता जराही बिघडू नये म्हणून इतके सावध आहे– कोणाचा स्पर्श होऊ नये म्हणूनच बहुधा आपले तापमान शून्य ठेवून उभे आहे. किनाऱ्यावरची झाडे शहाण्या मुलासारखी 'हाताची घडी - तोंडावर बोट' अशी उभी. चिवचिवाट करणारी बोलकी पाखरे चिडीचूप! फक्त निसर्गशोभेपुरते दोन-तीन चुकार पक्षी एकलकोंड्या फांदीच्या निराधार झुल्यावर झोके घेत बसलेले. माणसांनाच हौस फार. या दृश्यात आपल्याला खरोखर काहीही जागा नसते. पण आपल्याला तरीही त्यात घुसायचे असते म्हणून आपण तिथे आपले फोटो काढून घेतो. तुमच्या अंगणात आम्हांला घ्या, अशी एक प्रकारे ती भुणभूणच असते. देशांतरीची यात्रा संपल्यावर कणाकणात सौंदर्य भरलेल्या दृश्याच्या चौकटीत आपली छवी दाखवून, हे भाग्य ज्यांना लाभले नाही त्यांना आपल्याला हिणवायचे असते, 'टुक् टुक् – साई सूऽट्योऽ आम्ही कुऽऽठे.'

लेक लुईच्या सान्निध्यात मीही माझे दोन-चार फोटो काढून घेतले, आणि मग माझी मलाच लाज वाटली. एक प्रचंड पर्वत आणि विशाल जलाशय यांच्या शेजारी मी किती छोटा आहे हे राहून राहून मनात येऊ लागले. अशी भावना हिमालयात छळते आणि निर्जन झालेल्या समुद्रकिनाऱ्यावरही समुद्राच्या एकसुरी गाजेबरोबर हीच भावना आपल्या मनावर लयदार आघात करत असते. लेक लुईला जन्म देणाऱ्या पर्वतांना हिमालयाची रौद्र भव्यता नव्हती आणि लेक लुईला महासागराचे प्रमाण नव्हते. मग ही आपल्या क्षुद्रतेची जाणीव, आपण एकटे आणि धाकुटे असण्याचा प्रत्यय कशामुळे येत असावा? मला वाटते, रॉकी पर्वतराजीच्या कुशीत नांदणारी विलक्षण नीरवता, तेथे निर्माण झालेले पराकोटीचे सौंदर्य, ते पाहायला जमलेल्या स्त्रीपुरुषांनी धारण केलेले मौन या सर्वांचा एकवट परिणाम होऊन आपल्या इंद्रियवृत्ती स्तिमित होतात. शून्य तापमानातील हिमशीतल जलाशयाच्या काठावर उभे राहिल्यावर आपला अहंकार थिजून जातो. आपल्या पूर्वायुष्यात आपण काही पुरुषार्थ केला आहे किंवा उत्तरायुष्यात आपण यंव किंवा त्यंव करणार

आहोत या कल्पनेतून निर्माण होणारी अस्मिता एकाकी पक्षिणीसारखी निःस्तब्ध होते आणि विश्वाच्या पसाऱ्यात आपण आपाततः तरंगणारा एक रजःकण आहोत एवढीच आपल्या अस्तित्वाची किंमत आपण मनोमन करतो.

आता अधिक काही पाहायचे नव्हतेच. फक्त परतीचा प्रवास. नदीच्या किनाऱ्या-किनाऱ्याने किंवा डोंगरांच्या रांगांची दुतर्फा सलामी स्वीकारत स्वीकारत. थोड्या वेळाने आपल्याला भूक लागली आहे याची जाणीव होते. देहधर्म सुचू लागतात. निःस्तब्धतेचा अनुभवही धनुष्याची दोरी ताणावी तसाच असतो. तो हळू हळू सैल पडू लागतो. मीही हळू हळू माणसात आलो. प्रवाशाला जे सहजपणे दिसावे ते पाहू लागलो. मघाशी ही सिमेंटची फॅक्टरी कशी दिसली नव्हती याचे आश्चर्य करू लागलो. छोटी गावे आणि मोठे माळ यांची संख्या वाढू लागल्यावर शहरी वस्ती जवळ येत चालली म्हणून सुखावू लागलो.

सूर्य मावळतीकडे कलला. तापमान मात्र शून्यावरून जराही इकडे-तिकडे गेले नसावे. कॅलगेरीच्या सीमान्तावर स्वतंत्र बंगले बांधून राहणाऱ्या श्रीमंतांची उपवने आतील बंगल्यांसह आमंत्रण देऊ लागली. कॅनडात जागा विपुल आहे आणि लोकसंख्या तुरळक. त्यामुळे छोट्या छोट्या कुटुंबांच्या वाट्याला मोठ्या मोठ्या इस्टेटी येतात. साहजिकच ही कुटुंबे ज्या जमिनीवर घरे बांधतात त्यांना प्लॉट म्हणत नाहीत, त्यांना लॉट म्हणतात. एक एक लॉट पुष्कळदा पाच-पाच एकरांचा असतो. तेथे वृक्षारोपण वगैरे करणे सुद्धा शक्य नसते किंवा आवश्यकही नसते.

मला आवडले असते का पाच एकर जमिनीच्या मध्यभागी भल्यामोठ्या घरात एकलकोंड्या भुतासारखे रहायला? इथे 'शेजारी' किमान एक मैलावर घर बांधून राहणार! जेवायखायला, गप्पा मारायला जमायचे तर मोटरी काढून, अनेक मैलांचा प्रवास करून जमले पाहिजे. या लॉटपासून बाजार किती दूर असतील? आणि डॉक्टर कुठल्या कुठे राहत असतील? 'काय मावशी, बऱ्या आहात ना?' हा प्रश्न विचारायला माझ्या बायकोला किती दूर जावे लागेल? आणि मावशी घरी नसल्या तर? की साधी विचारपूस करायला

जाण्याआधी टेलिफोन करायचा? की हळू हळू एकाकीपणाचीच सवय जडवून घ्यायची? मग मुलाबाळांनी कुणाशी खेळायचे? की तेही सारे बंद? एकटे रहायचे, एकटे जगायचे, एकटे मरायचे? एकट्याने जन्मून एकट्याने अनंतात विलीन व्हायचे?

*मग लॉट तरी कशाला आणि बंगला तरी कशाला? कॅलगेरी तरी कशाला? बांफच्या पल्याड लेक लुईच्या काठावर पद्मासन घालून निवांत प्राणायाम करावा हेच उत्तम!*

ooo


# हाय् ऑस्ट्रेलिया, हॅलो न्यूझीलंड!

# नवलपरीचे रंगसकुल



ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड! विषुववृत्ताच्या दक्षिणेला असलेल्या या प्रदेशांत मुशाफिरी करणारे भटके तसे आपल्याकडे तुलनेने कमीच. भ्रमंतीत शरीर आज इथे आणि उद्या तिथे असतेच; पण मनही असे अचपळ की त्याची स्थितीही 'नावरे आवरीता' अशी होऊन जाते. दृष्टीला आणि त्याबरोबर अंतश्चक्षूंनाही जी चित्रेविचित्रे दिसतात त्यांपैकी काहींना शब्दरूप देण्याचा आनंद काही निराळाच!

जगात सर्वांत लहान आणि सर्वांत महान् काय, या कोड्याचं उत्तर अगदी सोपं आहे. पंचखंड पृथ्वीवरचं सर्वांत लहान खंड ऑस्ट्रेलिया; आणि चहूबाजूंनी समुद्रवलयांकित असलेलं पृथ्वीवरचं सर्वांत मोठं बेट ऑस्ट्रेलिया!



आपलीदेखील कमाल असते. स्वदेशाची सीमा ओलांडून परदेशात जायची ओढ आपल्यापैकी पुष्कळांना असते. पण पाहावं तर ज्याची त्याची धाव, पूर्वी असायची इंग्लंडकडे आणि अलीकडे पाहावं तर अमेरिकेकडे. काही विशेष कारणासाठी युरोप खंडातील जर्मनी, फ्रान्स, रशिया यांची यात्रा करणारे कोणी कोणी असतात तर कोणी आशिया खंडाची शान आणि अभिमान असणाऱ्या जपानकडे आपली पावले वळवतात. चित्तथरारक अनुभव घेण्यासाठी कोणाकोणाला आफ्रिकन सफारी हवी असते. तर कोणाला झगझगीत रोषणाईमधील चैनबाजीसाठी सिंगापूर, बँकॉक, हाँगकाँग या चैनीच्या माहेरघरांचे आकर्षण वाटते. 'पोटासाठी भटकत कुणी वाळवंटात जाती', म्हणून आखाती देशांत जातात. पण वाटली हौस म्हणून केली बांधाबांध आणि निघाले ऑस्ट्रेलियाला, असे कलंदर मुशाफीर एकंदर कमीच.

कदाचित असंही असेल की विषुववृत्ताच्या दक्षिणेला आणि दक्षिण ध्रुवाशी लगट करायला जायचा योग फार थोड्यांच्या कुंडलीत वर्तवलेला असतो. पृथ्वीगोलाच्या नकाशाकडे पाहताना नेहमी एक गंमत वाटते की जसजसे वर (म्हणजे उत्तरेला!) पाहावे तसतसे प्रदेश विस्तृत होत गेलेले, रुंदावत गेलेले दिसतात. उलट, दृष्टी खाली (म्हणजे दक्षिणेला!) वळवावी तर प्रदेश चिंचोळे होत समुद्रात पाय बुडवून बसलेले दिसू लागतात. म्हणूनच की काय कोणास ठाऊक सुरक्षितपणाची हमी वाटून आपलं दळणवळण, चलनवलन, वियोगमिलन उत्तरगोलार्धात जास्त आणि दक्षिण गोलार्धात कमी. ऑस्ट्रेलियाची स्थिती जरा वेगळी आहे. स्वारीने आसनमांडी घालून प्रशांत महासागरात बैठक मांडली आहे. आणि त्याच्या जरा पुढे पाण्याबाहेर केवळ पावले दिसावीत तशी न्यूझीलंडची दक्षिणद्वीप आणि उत्तरद्वीप अशी दोन बेटं आपल्या गोंडसपणानं आपली नजर खेचून घेत असतात.

ऑस्ट्रेलिया काय आणि न्यूझीलंड काय, दुनियेच्या राजकीय भूगोलात या नावांना स्थान मिळालं आहे केवळ गेल्या दोन शतकांत. युरोपीय राष्ट्रांच्या साम्राज्यलालसेला सीमा नव्हती आणि ती लालसा पुरी करण्यासाठी आवश्यक ती बेफाम जिद्द, साहसी वृत्ती आणि मरणावर मात करण्याची विजिगीषा ज्यांच्या ठायी आहे अशा पुरुषार्थी आणि पराक्रमी बहाद्दरांची युरोपमध्ये वाण नव्हती. वास्को द गामा, कोलंबस यांच्या

परंपरेतला नव्हे पण नव्या भूमीच्या शोधासाठी प्राणांची बाजी लावणारा कॅप्टन कुक हा एक अचाट साहसी दर्यासारंग इंग्रजांचा झेंडा मिरवीत दक्षिण महासागराच्या छाताडावर आपले जहाज हाकारीत राहिला. नित्य नव्या संकटांशी झुंजत त्याने दक्षिण ध्रुवानजीकच्या भूमिभागावर मानवी महत्त्वाकांक्षांचे बीजारोपण केले. या भूमीचा शोध लागला तेव्हा देखील या भूमीवर संस्कृतीची नवी दालने थाटली जातील अशी कोणाला खुद्द कुक्‌लाही सुतराम् कल्पनाही आली नसेल.

उन्हाळ्यात अंगाची लाहीलाही करून टाकणाऱ्या झळा आणि हिवाळ्यात रक्त गोठवून टाकणारी थंडी. जीवनाला आवश्यक असणाऱ्या अन्न-वस्त्र-निवाऱ्याची वानवा. व्यापाराच्या आणि इतरही व्यवहारांच्या वर्तुळापासून फटकून दूरच दूर असलेले कष्टप्राप्य स्थळ – अशा ठिकाणी जावे कोणी, राहावे कोणी आणि कुटुंबकबिल्यासह नांदावे कोणी? दयाळू मायबाप इंग्रज सरकारने याचे उत्तर बरोबर शोधून काढले. उद्दाम गुन्हेगारांना, भगोड्या कैद्यांना, खतरनाक गुंडांना जेरबंद करून जन्मठेप भोगण्यासाठी, निदान आठदहा वर्षे छळछळ करून झिजवण्यासाठी ऑस्ट्रेलियात पाठवण्याचा सपाटा इंग्रजांनी सुरू केला. पण धन्य आहे या बंद्यांची आणि त्यांच्या वंशजांची. त्यांनी राखेतून गगनभरारी घेणाऱ्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे या त्यक्त बहिष्कृत मानवसमूहातून एक उद्यमशील, संपन्न राष्ट्र निर्माण केले. आजही ऑस्ट्रेलिया एका परीने इंग्लिश लोकांची एक वसाहत असण्यात धन्यता मानीत असेल; पण तेवढ्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाच्या चित्रावर कलंक पडलेला आहे असे वाटत नाही

आपण नाही का भारतात एखाद्या क्षेत्राला दक्षिणकाशी म्हणत? दक्षिण ध्रुवाजवळील निवाऱ्यालाही पवित्र मानून आपण नाही का त्याला गंगोत्री हे अभिधान देत? याच न्यायाने ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंड म्हणजे दक्षिण गोलार्धातील ग्रेट ब्रिटनच आहे ग्रेट ब्रिटनच्या बऱ्याच गुणांचे आणि दोषांचेही दर्शन या नवजात राष्ट्रांत घडू शकते. इथली गोरी माणसे आपण अँग्लो सॅक्सन असल्याचा अभिमान बाळगतात आणि त्यांचा हा दर्प ऑस्ट्रेलियाच्या वातावरणात सर्व इतरेजनांना जाणवतो या अँग्लो सॅक्सनांनी आपल्या अहंकारापोटी आणि निखळ स्वार्थासाठी ऑस्ट्रेलियाच्या

आपलीदेखील कमाल असते. स्वदेशाची सीमा ओलांडून परदेशात जायची ओढ आपल्यापैकी पुष्कळांना असते. पण पाहावं तर ज्याची त्याची धाव, पूर्वी असायची इंग्लंडकडे आणि अलीकडे पाहावं तर अमेरिकेकडे. काही विशेष कारणासाठी युरोप खंडातील जर्मनी, फ्रान्स, रशिया यांची यात्रा करणारे कोणी कोणी असतात तर कोणी आशिया खंडाची शान आणि अभिमान असणाऱ्या जपानकडे आपली पावले वळवतात. चित्तथरारक अनुभव घेण्यासाठी कोणाकोणाला आफ्रिकन सफारी हवी असते. तर कोणाला झगझगीत रोषणाईमधील चैनबाजीसाठी सिंगापूर, बँकॉक, हाँगकाँग या चैनीच्या माहेरघरांचे आकर्षण वाटते. 'पोटासाठी भटकत कुणी वाळवंटात जाती', म्हणून आखाती देशांत जातात. पण वाटली हौस म्हणून केली बांधाबांध आणि निघाले ऑस्ट्रेलियाला, असे कलंदर मुशाफीर एकंदर कमीच.

कदाचित असंही असेल की विषुववृत्ताच्या दक्षिणेला आणि दक्षिण ध्रुवाशी लगट करायला जायचा योग फार थोड्यांच्या कुंडलीत वर्तवलेला असतो. पृथ्वीगोलाच्या नकाशाकडे पाहताना नेहमी एक गंमत वाटते की जसजसे वर (म्हणजे उत्तरेला!) पाहावे तसतसे प्रदेश विस्तृत होत गेलेले, रुंदावत गेलेले दिसतात. उलट, दृष्टी खाली (म्हणजे दक्षिणेला!) वळवावी तर प्रदेश चिंचोळे होत समुद्रात पाय बुडवून बसलेले दिसू लागतात. म्हणूनच की काय कोणास ठाऊक सुरक्षितपणाची हमी वाटून आपलं दळणवळण, चलनवलन, वियोगमिलन उत्तरगोलार्धात जास्त आणि दक्षिण गोलार्धात कमी. ऑस्ट्रेलियाची स्थिती जरा वेगळी आहे. स्वारीने आसनमांडी घालून प्रशांत महासागरात बैठक मांडली आहे. आणि त्याच्या जरा पुढे पाण्याबाहेर केवळ पावले दिसावीत तशी न्यूझीलंडची दक्षिणद्वीप आणि उत्तरद्वीप अशी दोन बेटं आपल्या गोंडसपणानं आपली नजर खेचून घेत असतात.

ऑस्ट्रेलिया काय आणि न्यूझीलंड काय, दुनियेच्या राजकीय भूगोलात या नावांना स्थान मिळालं आहे केवळ गेल्या दोन शतकांत. युरोपीय राष्ट्रांच्या साम्राज्यलालसेला सीमा नव्हती आणि ती लालसा पुरी करण्यासाठी आवश्यक ती बेफाम जिद्द, साहसी वृत्ती आणि मरणावर मात करण्याची विजिगीषा ज्यांच्या ठायी आहे अशा पुरुषार्थी आणि पराक्रमी बहाद्दरांची युरोपमध्ये वाण नव्हती. वास्को द गामा, कोलंबस यांच्या

परंपरेतला नव्हे पण नव्या भूमीच्या शोधासाठी प्राणांची बाजी लावणारा कॅप्टन कुक हा एक अचाट साहसी दर्यासारंग इंग्रजांचा झेंडा मिरवीत दक्षिण महासागराच्या छाताडावर आपले जहाज हाकारीत राहिला. नित्य नव्या संकटांशी झुंजत त्याने दक्षिण ध्रुवानजीकच्या भूमिभागावर मानवी महत्त्वाकांक्षांचे बीजारोपण केले. या भूमीचा शोध लागला तेव्हा देखील या भूमीवर संस्कृतीची नवी दालने थाटली जातील अशी कोणाला, खुद्द कुक्‌लाही सुतराम् कल्पनाही आली नसेल.

उन्हाळ्यात अंगाची लाहीलाही करून टाकणाऱ्या झळा आणि हिवाळ्यात रक्त गोठवून टाकणारी थंडी. जीवनाला आवश्यक असणाऱ्या अन्न-वस्त्र-निवाऱ्याची वानवा. व्यापाराच्या आणि इतरही व्यवहारांच्या वर्तुळापासून फटकून दूरच दूर असलेले कष्टप्राप्य स्थळ – अशा ठिकाणी जावे कोणी, राहावे कोणी आणि कुटुंबकबिल्यासह नांदावे कोणी? दयाळू मायबाप इंग्रज सरकारने याचे उत्तर बरोबर शोधून काढले. उद्दाम गुन्हेगारांना, भगोड्या कैद्यांना, खतरनाक गुंडांना जेरबंद करून जन्मठेप भोगण्यासाठी, निदान आठदहा वर्षे छळछळ करून झिजवण्यासाठी ऑस्ट्रेलियात पाठवण्याचा सपाटा इंग्रजांनी सुरू केला. पण धन्य आहे या बंद्यांची आणि त्यांच्या वंशजांची. त्यांनी राखेतून गगनभरारी घेणाऱ्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे या त्यक्त बहिष्कृत मानवसमूहातून एक उद्यमशील, संपन्न राष्ट्र निर्माण केले. आजही ऑस्ट्रेलिया एका परीने इंग्लिश लोकांची एक वसाहत असण्यात धन्यता मानीत असेल; पण तेवढ्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाच्या चित्रावर कलंक पडलेला आहे असे वाटत नाही.

आपण नाही का भारतात एखाद्या क्षेत्राला दक्षिणकाशी म्हणत? दक्षिण ध्रुवाजवळील निवाऱ्यालाही पवित्र मानून आपण नाही का त्याला गंगोत्री हे अभिधान देत? याच न्यायाने ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंड म्हणजे दक्षिण गोलार्धातील ग्रेट ब्रिटनच आहे. ग्रेट ब्रिटनच्या बऱ्याच गुणांचे आणि दोषांचेही दर्शन या नवजात राष्ट्रांत घडू शकते. इथली गोरी माणसे आपण ॲंग्लो सॅक्सन असल्याचा अभिमान बाळगतात आणि त्यांचा हा दर्प ऑस्ट्रेलियाच्या वातावरणात सर्व इतरेजनांना जाणवतो. या ॲंग्लो सॅक्सनांनी आपल्या अहंकारापोटी आणि निखळ स्वार्थासाठी ऑस्ट्रेलियाच्या

मूळ वसतीकरांचे आरंभी आरंभी निर्दालन केले. टास्मानियात चक्क नरमेध केला. चेंगीजखानाला देखील लाजवतील अशा कत्तली करून येथील आदिवासींना शरण आणले. तरस आणि लांडगे यांच्यापेक्षा कैक पटींनी हिंस्र होऊन अनन्वित अत्याचार केले. ही सर्व कहाणी अंगावर शहारे आणणारीच आहे; कधी ना कधी नियती त्या क्रूरकर्म्यांचा प्रतिशोध घेईल असे वाटायला लावणारी आहे. पण हे सर्व खरे असले तरी ऑस्ट्रेलियन राष्ट्राच्या जडणघडणीत गोऱ्या लोकांनी दाखवलेल्या बुद्धिचातुर्याचा, परिश्रमशीलतेचा आणि त्यांच्या अपराजित जिद्दीचा गौरव आपल्याला करावाच लागेल.

हे सर्व विचार मनात गर्दी करीत असताना सिडनी विमानतळाकडे प्रचंड जम्बो विमानाने झेप घेतली आणि एकाच सफाईदार हालचालीत विमान आणि मी योग्य त्या पातळीवर आलो! सिडनी महानगर आले तर! मघा अस्ताव्यस्त पसरलेल्या मनुष्यवस्तीच्या सीमेवर आणि प्रशांत महासागराच्याही सीमेवर मधोमध उभा राहिलेला तो अवाढव्य राजहंस पक्षी मला दिसला. तो कुठल्या अद्‌भुत जगातला होता बरे? कोणत्या सम्राटाच्या स्वप्नाची ती कमनीय संगमरवरी प्रतिमा मी पाहिली? ती होती सिडनीच्या वैभवाची पंचखंडांत वाखाणली गेलेली अलौकिक निशाणी. सिडनी ऑपेरा. तो अवाढव्य राजहंस म्हणजे जगातील रंगभूमीवरील राजहंसांचे परम पवित्र तीर्थक्षेत्र – सिडनी ऑपेरा. इथून पुढे मला सौंदर्याचे जे असंख्य आविष्कार दिसणार होते त्यांची ग्वाही देणारा हा विसार – सिडनी ऑपेरा!

सिडनी ऑपेरा हे नाव तसं कोड्यात टाकणारं आहे. वास्तविक हे आहे रंगमंचसंकुल! ऑस्ट्रेलियातले सर्वांत मोठे नगर सिडनी... आणि सिडनीमधील सर्वांत मोठे आकर्षण सिडनी ऑपेरा. जगामधील सर्व रंगकर्मींना, ऑपेराच्या रसिकांना आणि कॉन्सर्टमधील संगीताने धुंद होणाऱ्या कलाप्रेमींना सिडनी ऑपेरा तीर्थक्षेत्रच वाटले तर आश्चर्य नाही. प्रत्येक शहरात एखादी वास्तू त्या शहराचे भूषण असते, प्रतीक असते. कोठे संसद भवन, कोठे गगनभेदी मिनार तर कोठे प्रार्थना मंदिर. सिडनीचे प्रतीक आहे सिडनी ऑपेरा – सिडनी बंदरात सिडनी पुलासमीप संगमरवरी शुभ्र हंसाच्या दिमाखात उभे असणारे नवलपरीचे रंगसंकुल!

एका म्यानात दोन तलवारी राहोत की न राहोत, पण एका वास्तूत एकाहून अधिक रंगमंच निश्चित नांदू शकतात, इतकेच नव्हे तर आकर्षक प्रपंच मांडू शकतात याचा प्रत्यय या अद्भुतरम्य वास्तुशिल्पात येतो. जगातील अनेक चोखंदळ रसिकांनी या वास्तूवर गौरवाची फुले उधळलेली आहेत. कोणी त्याला ऑस्ट्रेलियाचा ताजमहाल म्हटले आहे, कोणी जगामधील आश्चर्यमालिकेत त्याचे नाव गुंफले आहे. एक गोष्ट निश्चित – सिडनी ऑपेराचे रूप असे देखणे आहे की 'देखते रहना', असे सर्वसामान्य मुशाफिरापासून ते दर्दी जाणकारापर्यंत सर्वांना होऊन जाते.

याची संकल्पना ज्याच्या मनात प्रथम साकारली तो होता एक तरुण डॅनिश वास्तुशिल्पी – यॉर्न उट्झॉन. तसा आरंभी तरी तो वास्तुकलेत अनभिज्ञच होता. पण न्यू साउथ वेल्स प्रदेशात राष्ट्रीय प्रेक्षागृह बांधण्यासाठी जी स्पर्धा झाली ती या पठ्ठ्याने जिंकली. त्याच्या डोक्यात कल्पनांना तोटा नव्हता, पण बांधकामाची कंत्राटे देणे आणि गिऱ्हाइकाला संतोष देईल अशा चतुराईने काम पुरे करून घेणे, याचा त्याला अनुभव नव्हता. त्याच्या वडिलांच्या मुळे त्याला गलबतांच्या, जहाजांच्या बांधणीचा उत्तम परिचय झालेला होता आणि प्रथम तरी या ऑपेरा हाऊसकडे पाहिल्यावर अनेक गलबते आपली शिडे फुगवून शेजारी शेजारी उभी आहेत असा भास होतो. पण या वास्तुशिल्पीच्या मते त्याच्या मनात असलेला आकृतिबंध त्याला सुचला तो नुकत्याच उघडलेल्या नारिंगाच्या मोहक फोडींवरून! पण हे रंगसंकुल उभे आहे सिडनी बंदरात – प्रशांत महासागराच्या किनाऱ्यावर; त्यामुळे आम्हां अलबत्यागलबत्यांना ते शुभ्र शिडांच्या गलबतांचीच आठवण करून देते.

ऑस्ट्रेलिया हे तसे नवजात राष्ट्र आहे. तेथे दीर्घकालीन परंपरा नावाची चीज दुर्मिळच. म्हणून राष्ट्रीय पातळीवरील अत्यंत महत्त्वाच्या वास्तुरचनेसाठी जागतिक स्तरावर स्पर्धा भरवली तर सापेक्षतः अल्प खर्चात अत्युत्कृष्ट नमुना हाती लागण्याची शक्यता चतुर शासकांच्या बुद्धीला जाणवली असली तर नवल नाही.

डिझाइन तर उत्तम मिळाले पण प्रत्यक्षात ते उभे करणे हे महादुर्घट काम होते. तीस वर्षे सिडनी ऑपेरा हाऊसची उभारणी चालूच

राहिली. मध्यंतरी मतभेदांनी उग्र रूप धारण केले. वास्तुशिल्पी नाराज होणे आणि त्यांनी काम सोडून जाणे हेही ओघानेच आले. परंतु ई. एच. फार्मर या शासकीय वास्तुशिल्पीने उर्वरित काम संपवण्याची जबाबदारी घेतली. त्याच्या मदतीला धावले आणखी काही हुन्नरी वास्तुविशारद. अंतर्गत मांडणी व सजावट तडीस नेली ती हॉल, टॉड आणि लिट्ल्मोअर या तिघांनी. सिडनी ऑपेराच्या निर्माणावर एक पुस्तकही लिहिले गेले आहे आणि त्यात सर्व परिश्रमांची, अडचणींची आणि त्यांच्या-वर मात कशी केली त्याची तपशीलवार हकीकत दिलेली आहे. ती वाचली की वास्तुशिल्पाच्या इतिहासातले एक रोमहर्षक पान आपल्या डोळ्यांसमोरून उलगडत जाते.

समुद्रसपाटीच्या खाली ४० फूट खोल उभ्या केलेल्या ५५० भक्कम स्तंभांवर ऑपेरा हाऊसचा मूलाधार सुस्थिर केलेला आहे. रंगसंकुलात कॉन्सर्ट थिएटर, ऑपेरा हाऊस, म्युझिक चेंबर, नाट्यगृह, प्रदर्शन कक्ष, तीन उपाहारगृहे, सहा मधुशाला, एक ग्रंथशाला यांचा विशाल संसार थाटलेला आहे. कलाकारांचे रंगपट, कपडेपट यांसाठी साठ खोल्या बांधलेल्या आहेत. सर्वत्र ऐसपैसपणाची जाणीव आपल्याला होते, पण हे रंगसंकुल अतिशय भव्य आहे याचा प्रत्यय येतो तो मात्र पाकळ्या पाकळ्यांच्या आकृतींनी उभारलेल्या विशाल आणि उत्तुंग छतामुळे. त्यांतली एक पाकळी तर आहे २२१ फूट उंच. तिच्या तळाशी उभा राहिलेला माणूस म्हाताऱ्याच्या हातातल्या काठीएवढा दिसतो!

किती प्रेक्षक या प्रेक्षागृहात मावतात? ध्वनिक्षेपकाशिवाय छोट्या नाट्यगृहात खेळ होतात, तेथे आहेत फक्त ३६० आसने. ऑपेरा थिएटरमध्ये १५०० तर मोठ्या कॉन्सर्ट थिएटरमध्ये २६७९. येणाऱ्या प्रेक्षकांच्या हजारो मोटरी मावतील एवढी मोकळी जागा संकुलाभोवती हवी. ती मिळणे अशक्यच! म्हणून आता रंगसंकुलापासून जवळ एक सात मजली प्रचंड कारपार्क बांधण्यात आला आहे. सगळं काम कसं भव्य आणि शिस्तीत.

एवढ्या आलिशान प्रेक्षागृहात खेळ बघायला तिकीट जरा भारीच असणे स्वाभाविक आहे. त्यातच आपण एक डॉलर म्हणजे २७-२८ रुपये असं गणित मनाशी मांडलं तर आपण कुठले या थेटरात फिरकणार! ३५ डॉलर्स

म्हणजे झाले का जवळजवळ हजार रुपये. आपण बहुतेक, जन्मात कध्धी नाटक पाहणार नाही, अशी भीष्मप्रतिज्ञा करणार! पण असा गुणाकार विसरल्यास एखाद्या वेळी जायला हरकत नाही!!

सिडनी ऑपेराचा आसमंत विशाल आहे. मोकळा आहे. अंगघसणीची गर्दी येथे क्वचितच.

ऊपर गगन विशाल! सामने सतत भूमीकडे धाव घेणारे महासागराचे तुडुंब पाणी. त्यावर डौलाने डुलत जाणाऱ्या छोट्यामोठ्या होड्या. अधूनमधून सुसाट वेगाने दुतर्फा फुर्रर फुर्रर पाणी उडवीत भिन्नाट फिरणाऱ्या मोटरबोटी. जरा अंतरावर महाकाय आगबोटी. खाडीच्या पलीकडच्या किनाऱ्यावर पाण्याशी लगट करणारे बंगले इमले.

ऑपेरा हाऊसच्या निकट असलेल्या फरसबंदी रुंद चौपाटीवरून फेरफटका करताना एका जादुई दुनियेत आपण आलो आहोत हे वेगळे सांगावे लागत नाही.

सिडनी बंदरात, 'माझी आगबोट चालली दर्यात ग' असं आपल्याशीच गुणगुणत, मजेत फिरावं. तिथं खावं-प्यावं पण सगळं पुन्हा स्वच्छ आणि नीटनेटकं ठेवावं! चुरगळलेल्या कागदातले कळकट पदार्थ भले चटकदार असतील – ते तुमच्या देशातच चाखा. इथे कसलीही घाण खपवून घेतली जाणार नाही. स्वच्छतेचा एक प्रकारचा धाकच निर्माण झाला की माणसं कशी आपोआप शिस्तीत वागायला लागतात.

ही जागा किती सुंदर असली तरी हा केवळ शुभारंभ आहे. सिडनीमधली सौंदर्ययात्रा मुशाफिराला त्याच्या मर्जीप्रमाणे घडवण्यासाठी 'सिडनी एक्स्प्लोरर' नावाची बस आरामशीर असते, केव्हाही सज्ज असते आणि ऑपेरा हाऊसच्या जवळच तिचा थांबा आहे. मी निघतोच आता फेरफटका करायला!

ooo

राहिली. मध्यंतरी मतभेदांनी उग्र रूप धारण केले. वास्तुशिल्पी नाराज होणे आणि त्यांनी काम सोडून जाणे हेही ओघानेच आले. परंतु ई. एच. फार्मर या शासकीय वास्तुशिल्पीने उर्वरित काम संपवण्याची जबाबदारी घेतली. त्याच्या मदतीला धावले आणखी काही हुन्नरी वास्तुविशारद. अंतर्गत मांडणी व सजावट तडीस नेली ती हॉल, टॉड आणि लिट्लमोअर या तिघांनी. सिडनी ऑपेराच्या निर्माणावर एक पुस्तकही लिहिले गेले आहे आणि त्यात सर्व परिश्रमांची, अडचणींची आणि त्यांच्या-वर मात कशी केली त्याची तपशीलवार हकीकत दिलेली आहे. ती वाचली की वास्तुशिल्पाच्या इतिहासातले एक रोमहर्षक पान आपल्या डोळ्यांसमोरून उलगडत जाते.

समुद्रसपाटीच्या खाली ४० फूट खोल उभ्या केलेल्या ५५० भक्कम स्तंभांवर ऑपेरा हाऊसचा मूलाधार सुस्थिर केलेला आहे. रंगसंकुलात कॉन्सर्ट थिएटर, ऑपेरा हाऊस, म्युझिक चेंबर, नाट्यगृह, प्रदर्शन कक्ष, तीन उपाहारगृहे, सहा मधुशाला, एक ग्रंथशाला यांचा विशाल संसार थाटलेला आहे. कलाकारांचे रंगपट, कपडेपट यांसाठी साठ खोल्या बांधलेल्या आहेत. सर्वत्र ऐसपैसपणाची जाणीव आपल्याला होते, पण हे रंगसंकुल अतिशय भव्य आहे याचा प्रत्यय येतो तो मात्र पाकळ्या पाकळ्यांच्या आकृतींनी उभारलेल्या विशाल आणि उत्तुंग छतामुळे. त्यांतली एक पाकळी तर आहे २२१ फूट उंच. तिच्या तळाशी उभा राहिलेला माणूस म्हाताऱ्याच्या हातातल्या काठीएवढा दिसतो!

किती प्रेक्षक या प्रेक्षागृहात मावतात? ध्वनिक्षेपकाशिवाय छोट्या नाट्यगृहात खेळ होतात, तेथे आहेत फक्त ३६० आसने. ऑपेरा थिएटरमध्ये १५०० तर मोठ्या कॉन्सर्ट थिएटरमध्ये २६७९. येणाऱ्या प्रेक्षकांच्या हजारो मोटरी मावतील एवढी मोकळी जागा संकुलाभोवती हवी. ती मिळणे अशक्यच! म्हणून आता रंगसंकुलापासून जवळ एक सात मजली प्रचंड कारपार्क बांधण्यात आला आहे. सगळं काम कसं भव्य आणि शिस्तीत.

एवढ्या आलिशान प्रेक्षागृहात खेळ बघायला तिकीट जरा भारीच असणे स्वाभाविक आहे. त्यातच आपण एक डॉलर म्हणजे २७-२८ रुपये असं गणित मनाशी मांडलं तर आपण कुठले या थेटरात फिरकणार! ३५ डॉलर्स

म्हणजे झाले का जवळजवळ हजार रुपये. आपण बहुतेक, जन्मात कध्धी नाटक पाहणार नाही, अशी भीष्मप्रतिज्ञा करणार! पण असा गुणाकार विसरल्यास एखाद्या वेळी जायला हरकत नाही!!

सिडनी ऑपेराचा आसमंत विशाल आहे. मोकळा आहे. अंगघसणीची गर्दी येथे क्वचितच.


ऊपर गगन विशाल! सामने सतत भूमीकडे धाव घेणारे महासागराचे तुडुंब पाणी. त्यावर डौलाने डुलत जाणाऱ्या छोट्यामोठ्या होड्या. अधूनमधून सुसाट वेगाने दुतर्फा फुर्रर फुर्रर पाणी उडवीत भिन्नाट फिरणाऱ्या मोटरबोटी. जरा अंतरावर महाकाय आगबोटी. खाडीच्या पलीकडच्या किनाऱ्यावर पाण्याशी लगट करणारे बंगले इमले.

ऑपेरा हाऊसच्या निकट असलेल्या फरसबंदी रुंद चौपाटीवरून फेरफटका करताना एका जादुई दुनियेत आपण आलो आहोत हे वेगळे सांगावे लागत नाही.

सिडनी बंदरात, 'माझी आगबोट चालली दर्यात ग' असं आपल्याशीच गुणगुणत, मजेत फिरावं. तिथं खावं-प्यावं पण सगळं पुन्हा स्वच्छ आणि नीटनेटकं ठेवावं! चुरगळलेल्या कागदातले कळकट पदार्थ भले चटकदार असतील – ते तुमच्या देशातच चाखा. इथे कसलीही घाण खपवून घेतली जाणार नाही. स्वच्छतेचा एक प्रकारचा धाकच निर्माण झाला की माणसं कशी आपोआप शिस्तीत वागायला लागतात.


ही जागा किती सुंदर असली तरी हा केवळ शुभारंभ आहे. सिडनीमधली सौंदर्ययात्रा मुशाफिराला त्याच्या मर्जीप्रमाणे घडवण्यासाठी 'सिडनी एक्स्प्लोरर' नावाची बस आरामशीर असते, केव्हाही सज्ज असते आणि ऑपेरा हाऊसच्या जवळच तिचा थांबा आहे. मी निघतोच आता फेरफटका करायला!

ooo



# सिड्नी नगरी बडी बांका ऽ

लोकसंख्या आणि विस्तार – दोन्ही दृष्टींनी ऑस्ट्रेलियातले सर्वांत मोठे शहर सिडनी. पण लोकसंख्या किती? तर अवघी तेहतीस लाख! म्हणजे मुंबईच्या एक तृतीयांश. आणि विस्तार? तो अंदाजे सांगायचा झाला तर शे-सव्वाशे किलोमीटर लांब आणि शे-सव्वाशे किलोमीटर रुंद. (चूकभूल द्यावी-घ्यावी.) बिनचूक विधान एवढेच की सिडनी शहर अवाढव्य आहे, उभे आडवे पसरलेले आहे. खरे म्हणजे एकमेकांत गुंतलेल्या अनेक उपनगरांचे मिळून तयार झालेले ते एक महानगर आहे. नगर आटपाट. चढउतारांचे घाट. जावे तिथे ऐसपैस सहापदरी वाट. अशा प्रासांच्या मालिकेत, वस्ती कशी दाट दाट, हा प्रास चपखल बसण्याजोगा होता. पण नाही. आपल्या देशाच्या परिमाणानुसार पाहिले तर एवढ्या विशाल भूमिभागावर फक्त ३३ लाख माणसे राहतात, याचा अर्थ वस्ती विरळ आहे असाच होऊ शकतो.



वस्ती विरळ असली तरी मोटरगाड्यांचे प्रमाण मात्र तद्दन व्यस्त आहे. बहुधा ३३ लाख स्त्रीपुरुषांना २० लाख तरी मोटरगाड्या हव्यातच असे गृहीत धरलेले असावे. त्यामुळे दिवस उजाडला रे उजाडला की रुंदरुंद रस्त्यांवरून हजारो मोटरी वेगवेड्या होऊन धावत सुटतात. राहत्या घरापासून लोकांच्या कामधंदा करायच्या जागा ५० मैल दूर असल्या तर, 'भाग्यवान आहेत लेकाचे, त्यांना अगदी जवळ घर मिळालेलं आहे' असे शेरे गंभीरपणे मारले जातात. गोंगाट आणि गजबज, गर्दी आणि गोंधळ यांना टाळून जरा दूर निवांत जागी राहिलेले बरे, असा विचार करणारे हौशी लोक आपखुशीने ८० मैल, १०० मैल अंतरावर टुमदार उपनगरांत ठेंगणाठुसका बंगला बांधून तेथून दररोज सकाळ-संध्याकाळ चाकांवरून शहराची चक्कर मारतात. बाजारपेठांत खरेदीची झिम्मड उडवायला (शॉपिंग स्प्री) जाताना माणसे रस्त्याने चालतात किंवा अफाट विस्तारलेल्या पार्कात मोकळेपणाने हवा खायला जायचे तर पायी हिंडतात... एरवी झपकन् इकडे मग सपकन् तिकडे जायचे तर चकाचक मोटरगाडीशिवाय भागणार कसे? मला तर वाटते की जगात अनेक शहरे सिडनीपेक्षा मोठाली आहेत. त्यांची श्रीमंतीही सिडनीच्या सवाई आहे, तिथेही मोटरगाड्या झुंडीने धावत असतीलच पण सिडनी ती सिडनी! महा मोटरबाज! जगातल्या उत्तमोत्तम मॉडेल्सच्या मोटरगाड्यांचा अथकपणे चाललेला पासिंग शो. होंडा, टोयोटा, मित्सुबिशी, निस्सानसारख्या जपानी जहांबाज फटाकड्या असोत की मर्सिडीजसारख्या जर्मन महामाया असोत, सगळ्या जणी अहमहमिकेने दिमाखात दौडत असतात. त्यांचा वेग आणि आवेग, त्यांची तंदुरुस्ती आणि तडफ, अंतरंग आणि बहिरंग, आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे भन्नाट धावत असतानाही शिस्तीत सांभाळलेली शिष्ट शालीनता!

या प्रचंड वाहतुकीचे नियंत्रण कोण करते? अदृश्य राहणारे पोलीस. त्यांची अबोलपणे कामगिरी करणारी रडार यंत्रणा. त्यांचे टिपणासाठी टपलेले कॅमेरे. विनचूकपणे लाल-हिरव्या डोळ्यांची उघडमीट करणारे इशारेबाज दिवे. पण या सर्वांहून वाहतुकीच्या निर्वेध आणि विनबोभाट चलनवलनाचे श्रेय दिले पाहिजे ते स्वयंअनुशासनाचे व्रत घेणाऱ्या सिडनीच्या सभ्य, सुसंस्कृत सर्व चक्रधरांना! एकाही चौकात आडवे उभे हात करणारा

सखाराम नाही, शिट्या फुंकणारे, दंडावर दोनचार पट्ट्या डकवलेले हवालदार नाहीत, कुठे कमरेला पिस्तुले लटकावलेले दमबाजी करणारे इनिस्पेक्टर नाहीत आणि तरीही प्रत्येक वाहन आपापली रेषा सांभाळून धावते, कोणीही धटिंगण धसमुसळेपणा करीत नाही, घुसाघूस नाही, 'आयला, रस्ता तुझ्या बापाचा आहे का' असली प्रेमळ भांडणे नाहीत... काय आहे काय हे? आपण स्वप्नात तरी एवढी शिस्त आपल्या वाहतुकीने सांभाळलेली पाहू का? पुन्हा हा सगळा चलच्चक्रपट मूक असतो हे विशेष! फुस्सकन धूर सोडणारे एक्झॉस्ट पाइप नाहीत, धडधड खडखड करीत जाणाऱ्या तुटक्या मोडक्या अवजड ट्रकगाड्या नाहीत, कचाकच ब्रेक लावून धाडधाड आवाज करीत थांबणाऱ्या बसगाड्या नाहीत आणि या सर्वांवर कडी म्हणजे पॉमपॉम, सारेगम, बाजूला व्हा, भुर्रभुर्र, पोंपों, भोंभों करणारे शिंग-कर्णे कोणीही वाजवीत नाही! केवळ गाड्यांतच उत्तम तेलपाणी केलेले असते असे नव्हे तर संपूर्ण गतिमानतेमध्येच कोण बरे असे वंगण घालून ठेवत असते? कधी कधी तर असे वाटते की या दुनियेतील मोटरगाड्यांना हॉर्नच बसवीत नसावेत. क्वचित कोणी आडमुठेपणा केला तर बारीकसा बीप बीप एवढा हॉर्न एखादे वेळी ऐकू येतो. पण हा इशारा ज्याला केलेला असतो तो डोळे वटारून या बारीकशा इशाऱ्याचाही निषेध करतो. उगीच नाही आम्ही म्हणत की सिडनी नगरी बडी बाका, आवाज न करता मोटर हाका!

समजा, तुमच्याजवळ मोटर नसली तर? गुमान आणि वेळेवर धावणाऱ्या बसगाड्या आहेत ना! मोटरींचा सुळसुळाट असल्यामुळे असेल, बसमध्ये फार गर्दी नसते. प्रत्येक बस-थांब्यावर बस कुठून आली, कुठे कुठे थांबणार, कुठे आणि किती वाजता पोचणार याचा तपशील दिलेला असतो. एक्स्प्लोररसारख्या सिडनीदर्शन घडवणाऱ्या बसचे तिकीट काढले की ते दिवसभर चालते. ते फलाण्या गाडीसाठी असते असे नाही तर त्या सुविधेसाठी असलेल्या कोणत्याही बससाठी ते चालते. याशिवाय संपूर्ण एका दिवसासाठी तिकीट, दहा दिवसांसाठी तिकीट, एक महिन्यासाठी तिकीट असल्यामुळे मुशाफिराची केवढी तरी सोय होते. अग अग बशी, मला कुठे नेशी, उगाच नका अशी, करू चौकशी! वाट्टेल तेवढे फिरा.

सिडनीत फिरता फिरता पाहायची ती भव्य बोटॅनिकल गार्डन, म्युझियम आणि दुनियेतील एक नामांकित जलचरघर (ॲक्वेरियम). या जलचरघरात अक्राळविक्राळ जलचर आपण जवळून पाहू शकतो, आणि तरी मन भयचकित झाल्याशिवाय राहत नाही. शार्कसारखे मासे, जिवे मारणारे महाकाय अष्टभुज (ऑक्टोपस), केव्हा आपला ग्रास घेतील याचा भरंवसा नसलेल्या मगरी-सुसरी आणि चटेरीपटेरी कॅप्टनसारखे किंवा उलटसुलट उड्या मारून करमणूक करणारे डॉल्फिनसारखे निरुपद्रवी मासे – खरोखर समुद्राच्या तळाशी अचपळपणे वावरणाऱ्या अवघ्या जीवसृष्टीचे चित्तचक्षुचमत्कारिक दर्शन या ॲक्वेरियममध्ये होऊ शकते. ते पाहताना आपले वय मागे मागे सरकत जाते आणि आपण एकदम कुमारदशेत प्रवेश करतो.

आधुनिक स्थापत्याची सिडनीत रेलचेल असली तरी व्हिक्टोरियन काळातल्या कलापूर्ण वास्तूंनाही कसोशीने संरक्षण देण्यात आले आहे. त्यात सिटी सेंटरला असलेल्या भव्य सात तालांच्या इमारतीचा समावेश आहे. आत आधुनिक, आकर्षक चिजांचा मायाबाजार भरगच्च भरलेला आहे. खालून वर, वरून खाली जाण्यासाठी विजेच्या सरक-जिन्यांची भरपूर सोय आहे. पण कुठेही मूळ वास्तूच्या शतकपूर्व सौंदर्याला धक्का लावलेला नाही. मधोमध असलेल्या घुमटाखाली एक प्रचंड घड्याळ बसवलेले असून राजवाड्याभोवतालचे पहारेकरी बदलावेत तसे घड्याळासभोवतीच्या चौथऱ्यावर खडी ताजीम देणारे शिपाई ठराविक घटकेला तालबद्ध हालचाल करून अंतर्धान पावतात. त्यातून दिवस असावा इंग्लंडच्या राणीच्या वाढदिवसासारखा, महोत्सवाचा. मग तर सगळी शान जरा जादाच असते. ती पाहायला मुहूर्त साधून बघे जमतात. त्यांतील निम्म्याशिम्म्या प्रेक्षकांना तरी फक्त घड्याळाची गंमत तेवढी पाहायची असावी. व्हिक्टोरियन वास्तुकला म्हणजे काय याचा थांगपत्ता असणारे थोडेच!

सर्व शहरे सारखीच असतात का? अरळविरळ उपनगरे आणि भाऊगर्दी उसळणारे डाऊन टाऊन. 'बंगला नवा नवकोनी, फुलबाग बगीचा भवती' अशी निवासस्थाने बाजारपेठेपासून फटकून असणारी; तर हारीने लागलेली भरगच्च दुकाने आणि त्यांत लोटलेली गर्दी यांनी गजबजलेले बाजारी संकुल म्हणजेच डाऊन टाऊन, अशी दोन परस्परविरोधी चित्रे प्रत्येक

महानगराच्या चौकटीत चपखल बसवलेली असतात. सकाळी मुंग्यांची रांग निवासी पेठांतून बाजारपेठांकडे धावत येते आणि सायंकाळी हीच रांग उलट दिशेने तुरुतुरू परत फिरते. आता जगातल्या सर्वच महानगरांना एकच प्रकारची कळा चढलेली आहे. सिडनीत फरक एवढाच की शहराचा विस्तार अफाटलेला असल्यामुळे एक नूर डाऊन टाऊन तर दस नूर निवासी पेठा!

पूर्वी ऑस्ट्रेलियात कायम वस्तीसाठी स्थलांतर करणारी माणसे कमी असत. ऑस्ट्रेलियाही आपले दरवाजे किलकिले करायला तयार नसे. अलीकडे ही परिस्थिती बदलली आहे. ऑस्ट्रेलियाचे मूळ वस्तीकर अधिक इंग्लंडमधून तडीपार केलेले अँग्लो सॅक्सन बंद्यांचे कुटुंबकबिले एवढीच लोकसंख्या आता ऑस्ट्रेलियात नांदत नाही. चिनी, जपानी, थायी, मलेशियन, इंडोनेशियन, सामोअन, फिजीयन, भारतीय, पाकिस्तानी, श्रीलंकन, अरब, आफ्रिकन, लेबॅनीज, मेक्सिकन, क्यूबन – किती तरी प्रकारची माणसे देशांतर करून कायमची ऑस्ट्रेलियात रुजू पाहत आहेत. संपत्तीच्या बळावर जपान्यांनी तर भूखंड लाटण्याचा सपाटा चालवला आहे. सर्व प्रकारची उपाहारगृहे, सिडनीसकट सर्व शहरांत उत्तम धंदा करीत आहेत. म्हणाल त्या प्रकारचे अन्न आता इकडे मिळू शकते. सांस्कृतिक कार्य करण्यासाठी प्रत्येक समाजाच्या संस्था निघाल्या आहेत. इतकेच नव्हे तर बेताबेताने, कोणाच्या डोळ्यांत खुपू न देता आपापली प्रार्थना मंदिरे उभारण्यासाठीही खटपटी चालू असतात. मशिदी उभ्या राहिल्या आहेत तशी गोपुरांसह मंदिरेही बांधली जात आहेत. त्यांत सिडनीच्या परिसरातील एक अतिविशाल बुद्धमंदिर पर्यटकांचे खास आकर्षण ठरले आहे. एका टेकाडावर, सभोवतीच्या आक्षितिज भूमीवर दृष्टी लावून उभ्या असणाऱ्या या मंदिराच्या प्रांगणातले वातावरण निवांत आहे. सारे कसे शांत शांत आहे – खरे तर थोडे उदास उदास आहे. पण नेटका आणि स्वच्छ परिसर आणि किंचित बेढब का होईना पण मंदिराचे रंगीत नक्षीकाम यांमुळे हे बुद्धमंदिर ऑस्ट्रेलियन भूमीवर उठून दिसते, वेगळे दिसते हे निश्चित.

माझ्या मनात आले की सिडनी, कॅनबेरा, मेलबर्न – सर्व ऑस्ट्रेलियन शहरांत दोन जागतिक महायुद्धांत धारातीर्थी पडलेल्या झुंजार सैनिकांची

स्मारके बांधलेली आहेत. आपल्या युद्धकौशल्याचा अभिमान ऑस्ट्रेलियनांना भरमसाट आहे. ऑस्ट्रेलिया वसवताना हजारो आदिवासींचे शिरकाण टास्मानियात गोऱ्या लोकांनी केलेले आहे. नुकतेच टास्मानियातच एक भयानक हत्याकांड झाले. त्यात एका माथेफिरूने एकाच फटक्यात ३५ जणांना गोळ्या घालून ठार केले. त्यानंतर पंतप्रधान हॉवर्ड यांनी सरसकट पिस्तुलांना परवाने देऊ नयेत असा पार्लमेंटमध्ये ठराव आणला असता, 'शस्त्र बाळगण्याचा आम्हांला जन्मसिद्ध हक्क आहे' अशी चळवळ करणारी 'गन् लॉबी' निर्माण झाली आहे. अशा या ऑस्ट्रेलियात बुद्धाच्या प्रचंड मंदिराचे दर्शन घेता घेता त्या परमकारुणिकाच्या शिकवणुकीचा काही अंश जर मान्यता पावला तर बुद्धमंदिराच्या निर्मितीचे चीज झाले असे म्हणता येईल. आपल्या लढाऊपणाची अहंता मिरवणाऱ्या ऑस्ट्रेलियन बहादुरांना कधी तरी 'बुद्धं सरणं गस्सामि' म्हणण्याची प्रेरणा होईल का!

खरे तर हा सवाल आज अवघ्या दुनियेपुढेच आहे!

ooo


# देखते रहना, काय काय नि किती किती !

सर्व प्रगत देशांप्रमाणे ऑस्ट्रेलियातही प्रत्येक आठवड्यात पाच दिवसच काम करण्याची प्रथा आहे. म्हणजेच शनिवार-रविवार नेहमीच सुट्टी. त्यात पुन्हा शुक्रवारी किंवा सोमवारी काही ना काही निमित्ताने अतिरिक्त सुटी मिळाली की लाँग वीकएन्डचा लाँगर वीकएन्ड होतो! मग तर मजाच! परिवारासह कुठे तरी दूर दूर जलदर्शनाला नाही तर स्थलदर्शनाला जायचं. पण पोट्ट हो, जाऊन जाऊन जाणार कुठे? कुठेही गेलात तरी ते ठिकाणही सहसा सिडनीच्या चतुःसीमांतच असते! पण म्हणून काही नाउमेद व्हायला नको.

ऑस्ट्रेलियातले दाट वस्तीचे प्रदेश पाहिले की लक्षात येते, त्या बेटाला वस्तीचे कंकणाकृती ग्रहण आहे! किनाऱ्याकिनाऱ्याने शहरे वसलेली किंवा वसवलेली आहेत. अगदी उत्तरेला डार्विन, नैर्ऋत्येला पर्थ, मग ॲडलेड. दक्षिणेला मेलबर्न किंवा टास्मानियातील होबर्ट. जरा उत्तरेकडे सरकल्यावर कॅनबेरा. पूर्व किनाऱ्याने उत्तरेकडे जाता जाता आधी मायापुरी सिडनी, त्यानंतर ब्रिस्बेन आणि त्याच्याही उत्तरेला पर्यटकांचे लाडके रम्य स्थान केर्न्स. झरकन् नकाशावर छडी फिरवली की सगळी नगरे-महानगरे कशी हाताच्या एका मंडलाकार हालचालीने दाखवता येतात. पण शहराशहरांतली अंतरे तशी जबरदस्त आहेत. सिडनीहून ब्रिस्बेन आणि ब्रिस्बेनहून केर्न्स म्हणजे दोन हजार किलोमीटर. हे झाले मुंबईहून नागपूरला आणि तिथून कलकत्त्याला जाण्यासारखे! आता बोला! तीन दिवसांची सुटी झाली तरी शंभर शंभर मैल लांबीरुंदीच्या मोठ्या शहरांतून दूर दूर तरी जाणार कसे आणि कुठे?

दूर दूर जायची तशी जरूर नाही. सिडनीच्या परिसरातच प्रेक्षणीय आणि सुखाने कालक्रमणा करण्याजोग्या जागा काही कमी नाहीत. मुख्य म्हणजे महानगरालगतच नील पर्वत – ब्लू माउंटन्स आहेत! उंच उंच कडे, चित्रविचित्र सुळके, भोवळदऱ्या, डोंगरांच्या

अंगाखांद्यांवर घनगर्द झाडी– निसर्गसौंदर्याची अक्षरशः उधळण! या प्रदेशाला आणखी एक वरदान आहे ते अनेकरंगी शुककुळातील पक्ष्यांचे! त्यात रोझेला पक्षी तर अंगावर इंद्रधनुष्याचे रंगच माखून येतात. या रंगीतसंगीत पाखरांना एक अभयदान मिळालेले आहे – येथील आकाशात दुसऱ्या पाखरांचा जीव घ्यायला टपलेल्या ससाणे-घारी-गिधाडांसारख्या शिकारी पक्ष्यांचा (प्रेडेटरी बर्डस्) अभाव आहे. सुखाने भराऱ्या मारा बरे रंगयात्रींनो! तीन बहिणी नावाचे तीन सुळके शेजारी शेजारी उभे आहेत. त्यांच्या दर्शनासाठी त्यांच्या समोरील पहाडावर एक खडकमाची तयार



झालेली आहे. सुटीच्या दिवशी या माचीवर झुंबड उसळते. डफगाणी किंवा गिटारवादन यांचा आवाज घुमतो. जत्रेत कमाई चांगली होते हे जाणून काही (खरे खोटे) आदिवासी नर्तक आपले ओबडधोबड, अक्राळविक्राळ मुद्रांचे विकट नृत्य करून दाखवतात. जमलेल्या परदेशी मुशाफिरांना, विशेषतः श्रीमंत अमेरिकी आणि जपानी प्रवाशांना त्यांचे फार अप्रूप वाटते आणि ते नर्तकांसह आपली रंगीत प्रकाशचित्रे काढून घेतात. जवळच रोप-वे आहे, स्मृतिचिन्हे विकणारे दुकान आहे, शीतपेये आणि 'झटपट मागावे की चटपट मिळावे' असे खाद्यपदार्थ पुरवणारी दुकाने आहेत. हाय गे सिडनी! एवढे असून केरकचरा, कागदबोळे, उष्ट्या अन्नाचे शेषप्रसाद या जत्रेतल्या नेहमीच्या सुंदर दृश्यांचे मात्र दर्शन येथे कोठेही होत नाही! उलट जवळच असलेल्या हरित तृणांच्या मखमालीवर बागडणारी गोंडस बाळे हवी तेवढी दिसतात. कुलुकुलू करीत केसाळ देह झुलवणारे उच्च जातींचे कुत्रेही रुबाबात हिंडून मालकाची ऐपत जगजाहीर करीत असतात, बाबागाड्या आणि वृद्धांसाठी ढकलगाड्या अशा सुविधाही साफसुरळीत काम करीत असतात. दिवस कलू लागला किंवा आभाळ भरून येण्याची लक्षणे दिसू लागली की नाइलाजाने माणसे आपापल्या वाहनांकडे निघून जातात आणि मग मात्र येताना होता त्यापेक्षा वेग दुपटीत नेऊन घरोघर पसार होतात.

नीलगिरीच्याच परिसरात शांत निवांत किनारेही पुष्कळ आहेत. एकाकी प्रवाशासारखी एकटी उभी असलेली झाडे फार मोहक दिसतात. भरतीच्या लाटांनी धडका देऊन खडकात एक बोगदा पाडला आहे. त्यातून भरतीचे पाणी आकाशाच्या दिशेने उसळी घेते – ब्लो होल! जणू निसर्गाने निर्माण केलेले प्रचंड कारंजेच! त्याहीपेक्षा एक मोठे आकर्षण म्हणजे थंडीवाऱ्याचा मारा खाऊन डोंगरकपारींत विलक्षण आकारांच्या गुहा तयार झाल्या आहेत. त्या पाहण्याची माझी संधी हुकली याची मला चांगलीच चुटपूट लागलेली आहे.

'एकविसाव्या शतकातील दुर्ग!' असे लोकविलक्षण अभिधान मिरवीत नॉत्रदाम नावाची प्रासादतुल्य वास्तू केवळ एका गुलहौशी श्रीमंताने अभिजात सौंदर्यदृष्टीच्या बळावर निर्माण केलेली आहे. दुनियेतील उत्तमोत्तम फर्निचर, व्याघ्रचर्मे, मृगचर्मे, शिकारीत गवसलेल्या काळवीटांची सशृंग शिरे, नाना तऱ्हांचे शोभिवंत करंडक, भोजनपात्रे

आणि चषक, मूर्तिकलेचे अलौकिक नमुने इत्यादी विस्मयकारक वस्तुजातांनी हा राजमहाल खूप ऐश्वर्यसंपन्न केलेला असला तरी त्याची रचना मात्र खूप साधी आहे; तिच्यात उत्तम लाकडाचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर केलेला आहे. दरवाजे आणि गवाक्षे यांनाही एक अभिजात डौल आहे. मागील बाजूस पुष्करिणी असून तिच्यातील रंगीत मासे आणि प्रफुल्ल कमळे यांची अवर्णनीय शोभा आपले मन वेधून घेते. नॉत्रदामचा धनी या प्रासादाच्या एका भागात राहत असला तरी त्याच्या वास्तव्याची एकही निशाणी बाहेर दिसू न देण्याची खबरदारी त्याने घेतलेली आहे. प्रासादात देखील सर्वांना प्रवेश नाही; परंतु सभोवार लावलेल्या तावदानांतून आपण अंतर्गृहाचे दर्शन घेऊ शकतो. सभोवती सुमारे पाच एकर विस्ताराचे प्रांगण आहे, त्यात मालकाने हौसेने निर्माण केलेले प्राणिसंग्रहालय आहे. ऑस्ट्रेलियातील कोआला नावाचे गोजिरवाणे पण मंद प्राणी तर येथे आहेतच पण बंगाली वाघही, किलकिल्या डोळ्यांनीही, आपला थरकाप उडवायला या संग्रहालयात मौजूद आहेत. कोणी म्हणेल, पैसा असला म्हणजे असले रंग-ढंग सहज करता येतात! पण हे खरे नाही. पैसा असला तर रात्रंदिवस तो चैनीत उडवता येतो, रम-रमी-रमा यांच्यावरून ओवाळून टाकता येतो, जुगारात हरता येतो... आणखी कैक प्रकारे त्याची विल्हेवाट लावता येते. पण सुंदर छंद जिवाला लावून घ्यायचे आणि अनेकांना त्यांचा आनंद लुटू द्यायचा... अशा बुद्धीने आपले धन वेचणारे विरळा! म्हणून तर नॉत्रदामसारखे सौंदर्यतीर्थ निर्माण करणाऱ्याला धन्यवाद दिले पाहिजेत.

नॉत्रदामच्या धन्याची सर्व पूर्वपीठिका समजली नाही परंतु त्याच्या जन्मकहाणीत स्पेन आणि फ्रान्स या दोन देशांतील संस्कृतीचा कोठे तरी घनदाट संबंध आलेला असावा. याचा एक ढळढळीत पुरावा म्हणजे याच माणसाने उत्तम घोड्यांची पैदास करण्याची हौस शर्थीने पुरी केली आहे. ऑस्ट्रेलियाना पार्क नावाच्या मोकळ्याढाकळ्या उपवनात एल् कॅबॅलो ब्लांको (शुभ्र अश्वराज) नावाची एक अश्वशाळा त्याने निर्माण केली आहे. या उपवनात करमणुकीचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. तऱ्हेतऱ्हेचे प्राणी आहेत. पक्षी आणि सर्प यांचे नानाविध नमुने येथे पाहता येतात. मेंढ्यांची लोकर कशी कापली जाते याचे प्रात्यक्षिक तर आहेच, पण इच्छा असेल


तर मुशाफिरांना लोकर कटाईत भागही घेता येतो. मोकळे मैदान दीडशे एकर एवढे मोठे असल्याने ज्यांना घोड्यावर बसायची हौस असेल त्यांना ही आपली हौस पुरी करता येते आणि जगप्रसिद्ध अस्त्र बूमरँग फेकायचे असेल तर ते शिकायचीही सोय आहे. बागेत फेरफटका करायला छोटेखानी आगिनगाडी आहे. म्हणजे मुलांची चैनच! गमतीशीर बग्गी किंवा घोड्याने ओढलेल्या ट्रॅमगाडीत बसावे, वल्हवा रे नाव म्हणत हवे तर होडी वल्हवत फिरावे किंवा टम्म फुगलेल्या शिडाच्या होडीतून फिरावे... सगळ्या गमतीजमतींचा कळस म्हणजे 'नाच रे घोड्या छुमछुम तालात' हा अतिशय सुंदर नाचणाऱ्या घोड्यांचा कार्यक्रम. या नाचासाठी भव्य स्टेडियम बांधलेला असून पडदे, आरसे, हंड्याझुंबरे यांनी तो शोभिवंत केलेला आहे. पण समजा, ही सगळी ऐट केली असती आणि घोडे मात्र असते लंगडे-लुळे किंवा शामळू-बावळे तर आपला केवढा हिरमोड झाला असता! या शामियान्यातला एकेक घोडा जसा काही इंद्राघरचा उच्चैःश्रवा! मालिश केलेले आणि देहावर तुकतुकीत पॉलिश झळकवणारे दिमाखदार अश्वराज... काय त्यांची उभे राहण्याची ऐट! काय त्यांच्या चालीचा डौल! काय त्यांच्या हालचालींतली लयकारी! यांना म्हणतात उमदे घोडे! एरवी जगात शामभटाच्या तट्टाण्या आणि महाबळभटांची अडेलतट्टे काय कमी असतील का? यांतला एकेक घोडा म्हणजे विश्वविजयी वीराने अभिमानाने ज्यावर आरूढ व्हावे असा –


विजयी विश्व तुरंगा प्यारा!

ooo

# थँक्यू पेंग्विन, थँक्यू कुक!

छावणी कॅनबेरा! छावणीच नाही तर काय! शहर इतके नवे कोरे की नवेपणाच्या वासाशिवाय त्याला दुसरा कसलाच गंध नाही. मुळात ऑस्ट्रेलिया म्हणजे नव्या दमाच्या नव्या शिपायांनी वसवलेले राष्ट्र. राष्ट्राला राजधानी तर हवीच. ती कुठेब्रे वसवावी, कोणतीब्रे असावी,





याची थोडीफार धुमशान घातल्यानी आणि त्यांनी ठरवल्यानी की कॅनबेराचा माळ राजधानी वसवायला बेस आहे. बेत ठरला म्हणजे ठरला. सगळीं कामे शिस्तीत होऊ लागली. अन् हां हां म्हणता हीऽऽ मोट्ठी राजधानी उभी राहिली. सुरेख, आखीव रेखीव विशाल रस्ते. व्यवस्थित कोन साधून आणि कामकाजाचे अंदाज बांधून उठवलेले भव्य इमले. सर्वत्र वृक्षराजींची खडी सलामी. जिथे नसेल पाणी तिथे कुठली गाणी! हे ओळखून कृत्रिमरीत्या निर्माण केलेला नैसर्गिक तलाव. आणि हे सारे दृश्य पाहून बघणाऱ्यांची मने कशी उंच उसळी घेतील याची चुणूक दाखवण्यासाठी सरोवराच्या पाण्यातच उंच उसळत राहणारे गगनस्पर्शी कारंजे. रंगीबेरंगी ध्वज फडकत ठेवण्यापेक्षा स्फटिकशुभ्र कारंजे थुईथुई उडत ठेवणे ही कल्पनाच किती उदात्त आणि सुंदर आहे! या सरोवराच्या मागे उभे आहे ऑस्ट्रेलियाचे मंत्रालय. विधानसौध म्हणा हवे तर. मात्र त्याचा कळस न सोनेरी, न मंदिरासारखा शोभिवंत आकाराचा. तो आहे भूमितीतील लांबट उंच त्रिकोणाच्या सांगाड्यासारखा. याला म्हणतात मॉडर्निटी! थोडक्यात, कळस म्हणजे विरस करण्याचा कळस! रंग कसा? रंगाचा बेरंग करणारा!

एकूणच ऑस्ट्रेलियात 'उंच उंच माड्या नाहित कामाच्या... त्याहुनी घरे चिमुकली बरी' असे व्रत जनतेला प्रिय असावे. त्यामुळे राजधानीमध्येही उत्तुंग इमारतींचा सोस नाही. शिकॅगो-न्यूयॉर्कसारखे ढगात घुसवलेले मिनार नाहीत. राहती घरे तर एकदम घरेलू. वाटा आटोपशीर मापाच्या. त्यात पुन्हा राजधानीची लोकवस्ती एकदम माफक. भपका नाही, भव्यता नाही, भारून टाकण्याची ईर्ष्या नाही... सारे कसे शांत शांत!

– आणि तरी कॅनबेरा तद्दन रुखासूखा. अनाकर्षक. स्वच्छ साफसुथरा पण सुंदर नाही. वेगळा पण व्यक्तित्वशून्य. कार्बूझिएने निर्माण केलेल्या चंडीगढला जशा अनेक सोयी सुविधा आहेत, नगररचना तंत्राची नवलाई आहे आणि तरीदेखील त्याचे कोरेपणच टोचत राहते. करकरीत घडी जशी शरीराला पीडा देते तशी ही अतिव्यवस्थित नगरे, कितीही जवळीक झाली तरी दूरस्थ, तटस्थ वाटत राहतात.

अशा प्रदेशात आपण काय करावे? अधिकृत राजधानीकडे पाठ फिरवावी आणि अनधिकृत राजधानीकडे मोहरा वळवावा. म्हणून तर

सिडनीच्या महाप्रमाण परिसराचा निरोप घेऊन निघालेल्या मुशाफिराने पुढे आपला पडाव करावा तो मेलबर्नला. तिथे आपल्या स्वागताला कॅनबेरासारखी नीरव शांतता येत नाही. तिथे फुललेली असतात बहुरंगी फुले. रस्त्यांच्या दुतर्फा असतात हिरव्यागार दूर्वांनी झाकलेली अंगणे. तेथे डुलत असतात प्रसन्न हसरी फुले. पुष्कळ दिवसांनी भेटतात भारतीय चिमण्या. क्वचित् कावळेसुद्धा. जरा समुद्रकिनाऱ्याशी लगट केली तर सी-गल्स् भंडावू लागतात, त्यांचेही अप्रूप वाटते. मेलबर्नजवळ आहे जगातील एक नामांकित पर्यटन स्थळ – फिलिप आयलंड! आधी समुद्रकिनाऱ्यावर जाऊन प्रशांत महासागराचे डोळे भरून दर्शन घ्यावे. मग यावे तिथल्या जलचर-अजबखान्याकडे. मोठमोठ्या काचपेट्यांत प्रेक्षकांना दर्शनसुख देण्यासाठी हुबेहूब चित्रसज्जा केली आहे, मत्स्य-सर्प आणि समुद्रपक्ष्यांची. आपले लक्ष्य मात्र असावे मावळतीच्या मुहूर्ताकडे.

भगवान सहस्ररश्मी का कोण तो, अस्ताचलाकडे निघाला की शेकडो माणसे निःस्तब्ध होऊन समुद्राच्या लाटांवर नजर लावून बसतात. वेळ असावी खास करून भरतीची. फार मोठे उधाण नको – हळुहळु चुळबुळ करीत लाटा, येउन पुळणीवर ओसरती... आणि त्या लाटांवर स्वार होऊन येतात फिलिप आयलंडचे नवलाचे पक्षी, पेंग्विन! पक्षी खरे, मात्र माणसासारखे फेंगड्या पायांनी लुटुलुटू चालत येणारे द्विपाद प्राणीच म्हणायचे. पक्षी खरे, मात्र त्यांची घरे न झाडांवर न झुडुपांवर. ती असतात समुद्रकिनाऱ्यावरच्या लव्हाळ्यांच्या किजबिज गर्दीतल्या बिळांत! ते समुद्रपक्षी असतात, मात्र सायंकाळी निवाऱ्याला येतात भूमीवर आणि पहाटेच्या वेळी ओहोटीच्या ओघात सरमिसळ होऊन स्वतःला समुद्रात झोकून देतात. छोट्या छोट्या माशांवर ताव मारतात आणि अगदी बिच्चारेपणाचा आव आणून गरीबडेपणाने लपतछपत बिळांत जाऊन गुडुप होतात.

एके काळी असे पेंग्विन यायचे ते काही शेकड्यांच्या घोळक्याने. पण शिकारी पेंग्विनांची शिकार करण्याची संधी घेणारी दुष्ट माणसे काही कमी असतात का? जीवो जीवस्य जीवनम् या वचनाचा चालताबोलता वस्तुपाठ फिलिप आयलंडच्या किनाऱ्यावर सतत चालू असायचा. परिणामी पेंग्विन-संख्या विरळ झाली आहे. तरीही रोज सायंकाळी साठ-सत्तर पेंग्विन तरी हजेरी लावतातच. अंटार्क्टिकावरच्या त्यांच्या भाईबंदांचे आकार जरा


आडमाप असतात. तुलनेने फिलिप आयलंडचे पेंग्विन छोटुकले आहेत. या छोटुकल्यांची पलटण सायंकाळी परेड निघाल्यासारखी चालत आली की 'तो दिसे सोहळा अनुपम्य!' तशात मी गेलो तो काळ होता त्यांचा मिलनमोसमाचा. म्हणजे थोड्याच दिवसांत लोकसंख्येचा विस्फोट होईल, हे आलेच! कावळे, चिमण्या, पारवे, बदके नित्याचेच दिसतात. पोपट, कोकिळ आणि कंपनी देखील ठायी ठायी दर्शन देऊ शकते. पण पेंग्विनांच्या पलटणींची परेड पाहून घेतलीच पाहिजे कारण 'न मिळे अशि मौज पुन्हा पाहण्या नरां। ती बघण्या जावे हो मेलबर्नपुरा॥'

फिलिप आयलंडची मौज पाहून परत फ़िरताना मन थोडे उदास होते. नाविलाजाला इलाज नाही! म्हणून परत फिरायचे. मग दुसऱ्या एखाद्या दिवशी मेलबर्न नावाच्या नव्या दुनियेतल्या जुन्या शहरात चक्क ट्रॅममधून भटकायला जावे. राणी सरकारच्या काळातल्या भरपूर वास्तू पाहाव्या. म्युझियमला भेट द्यावी. चित्रशाळा दिसली की ऑस्ट्रलियन आदिवासींची चित्रकला आणि त्यांचे विणकाम, भरतकाम पाहून, हे सगळे किती भारतीय आदिवासींच्या कलेसारखे आहे असा अचंबा खुशाल वाटू द्यावा. मग दूर अंतरावर मेलबर्नचा उंचच उंच मनोरा दिसतो त्याच्या दिशेने चालू पडावे आणि वाटेत लागणारे समरभूमीच्या मानकऱ्यांचे स्मारक आधी दुरून आणि मग जवळून पाहावे. अशी ठिकाणे किती स्वच्छ ठेवावी, किती शांत असावी, तिथे गांभीर्य कसे माहेरा यावे, कारुण्य आणि उदात्तता यांचा कसा संगम घडवावा आणि स्मारक पाहून जाणाऱ्यांच्या मनावर कसे नाना तरंग निर्माण करावे याचा प्रत्ययकारी अनुभव धारातीर्थी पडलेल्या सैनिकांच्या स्मारकाच्या परिसरात हटकून येतो. साध्या पण प्रशस्त पायऱ्यांनी निर्माण केलेली अनेकस्तरीय वास्तू, सूर्यकिरणांचा भर माध्यान्ही कवडसा झेलेल असे टिपण साधून रचना केलेले प्रमुख समाधिस्थान आणि मुख्य म्हणजे अवडंबर आणि आविर्भाव टाळून केलेली नितांत साधेपणाची योजना ही या स्मारकाची वैशिष्ट्येच म्हटली पाहिजेत.

जवळच असलेल्या फिट्झेरॉय उद्यानात फेरफटका मारल्याशिवाय विसावा घ्यायला जाऊ नये की जेवणखाणाची घाई करू नये. हरतऱ्हेची हिरवी सोयरीधायरी इथे दिमाखात उभी आहेत. शंभर फूट उंची म्हणजे खुजेपणाच म्हणायचा! उंच उंच वृक्षराज वल्कलधारी ऋषिमुनींच्या

आश्रमात वस्तीला असल्याप्रमाणे विश्रब्धपणे उभे असतात पण आपल्या वयाचाही अहंकार मिरवत नाहीत. जीर्ण वयही जीर्ण सालींप्रमाणे कसे झोकात धारण करतात! याच उद्यानात आणखी एक आक्रीत भेटेल. दक्षिण गोलार्धातील सात नभांखाली फिरून नवक्षितिजे निर्माण करणाऱ्या जिम् कुकचे घर– कॅप्टन कुकचे घर तुमची वाट पाहात उभे आहे. खरे म्हणजे कुक होता ब्रिटिश आणि त्याचे घरही होते ब्रिटनमध्येच. पण नवजात ऑस्ट्रेलियाने त्याचे घर आपल्या महानगरात असले पाहिजे असे ठरवले. म्हणून भिंती– खिडक्यादारांसकट घर उचलून आणले इंग्लंडमधून आणि उभे केले मेलबर्नच्या या पार्कात. घर अतिशय छोटे आहे. छोटे म्हणजे टुमदार. माळ्यावर शयनगृह. शयनगृहात जुजबी खाटा. साध्या गाद्या. सैंपाकघरात जुनीपानी भांडीकुंडी. कढई-पातेली-ओगराळी-चिमटे. कुकसाहेब, हौ डिड यू कुक? व्हॉट डिड यू कुक?– ते कोणास ठाऊक? पण तुम्ही तुमच्या कुतूहलाच्या कालथ्याने हा गोलार्ध उलथापालथा परतला तेव्हा आम्हांला मिळाले हे नवे जग – ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, अंटार्क्टिकाचे! थँक यू कॅप्टन, थँक यू व्हेरी मच!

ooo



# फळांच्या सुगंधी मदिरेची धुंदी

ऑस्ट्रेलियातली सगळी नगरे किनाऱ्या-किनाऱ्याने वसली आहेत ही गोष्ट खरी, पण अगदी खरी नाही. म्हणजे सर्व खंडाला लोकवस्तीचे कंकणाकृती ग्रहण लागले आहे, त्यामुळे मोठमोठ्या शहरांच्या शेजारी प्रशांत महासागराची सोबत हटकून असतेच. आणि तरीही उंच उंच डोंगरमाथीही आपले अस्तित्व भरपूर जाणवून देतात. त्यामुळे सिडनी काय आणि मेलबर्न काय, सागर आणि डोंगर यांना खेळीमेळीनेच राहणे भाग आहे. हिंस्र श्वापदांच्या प्रचंड कळपांसारख्या समुद्राच्या लाटा शेपट्या आपटत जमिनीकडे चाल करून आल्या तरी डोंगरावर आपटल्यावर कशा शहाण्या मुलांसारख्या शिस्तीत माघार घेतात. उलट, निळाशार समुद्र तसेच वनराईच्या ठिपक्यांनी आणि घरांच्या छपरांनी सजवलेले देखणे भूभाग यांचे विहंगम दर्शन घडवण्यासाठीच आपली योजना झाली आहे, अशी डोंगरपठारांचीही पक्की समजूत झाली आहे.


निसर्ग आणि नागरी जीवन यांनी जसे सहजपणे सहजीवन स्वीकारले आहे त्याप्रमाणेच मूळचे वस्तीकर आणि नव्याने डेरेदाखल झालेले अँग्लो-सॅक्सन यांनीही आपल्याला एकत्र नांदावे लागणार आहे याची खूणगाठ मनाशी बांधली आहे. ऑस्ट्रेलियाने कितीही आधुनिकता स्वीकारली, मिनी अमेरिका असल्याचा आविर्भाव आणला तरी जुन्या वस्तीकरांच्या खाणाखुणा त्यांना पुसून टाकता

आलेल्या नाहीत. कधी गावांची नावे, कधी रस्त्यांची, कधी नद्यांची वा धबधब्यांची – वाचताना मुशाफिरांच्या मुखांवर एखादी तरी स्मितरेषा उमटल्याशिवाय राहत नाही. पॅरामेट्टा हे सिडनीतल्या – मद्रासमधल्या नव्हे – हमरस्त्याचे नाव आहे! एका उपनगराचे नाव आहे, वोलानगाँग. वाटते की १५-२० हजार वर्षांपूर्वी जगाच्या या भागात द्राविड भाषा नक्की नांदून गेलेल्या असाव्यात  मेलबर्नजवळ एका पर्वतावर उंचच उंच वृक्षांनी निर्माण केलेले एक विराट उद्यान आहे. त्याचे नाव आहे डॅंडीमॉंग हिल्स. प्रत्येक देशात कलंदर कलावंत असतातच की! तसा एक कलंदर सृष्टीशी एकरूपता साधत जनलोकांना टाळून एकांडेपणाने वनातच येऊन राहिला. उपेक्षित आदिवासींच्या पोरावाळांचा चाचा बनला आणि एकाकी जीवनात भरपूर सगेसोयरे भेटल्याप्रमाणे आनंदात कालक्रमणा करून शांतपणे काळाच्या स्वाधीन झाला. त्याला एक मुलखावेगळा छंद होता. झाडांच्या भल्यामोठ्या खोडांवर त्याने शिल्पाकृती कोरल्या, कधी आपल्या शिल्पांना अक्कणमाती-चिक्कणमातीची जोड दिली. मेलबर्न शहर तसे पाहण्यासारखे आहे. पार्कच पार्क, तलावच तलाव, आटपाट रस्ते, धनंतर बाजारपेठा. लोकसंख्या मात्र एकूण चारच लाख हं! एका दृष्टीने पृथ्वीच्या पाठीवरल्या अनेक मोठ्या शहरांसारखे एक शहर. पण आपण काय करावे? शहरापासून गाडी जरा बाहेर काढावी. फार दूर नाही, तशी पन्नास मैलांच्या आतच डॅंडीमॉंग हिल्ससारखी ठिकाणे आहेत. इथे रिकेट्स सॅंक्युअरीसारखी मजेदार शिल्पशाळा आहे. जंगलाचेच मंगल केलेले आहे. मनुष्यप्राण्याची कशी गंमत असते पहा. 'आपली' मुले-माणसे सोडून, 'आपली वाडीवस्ती' विसरून दूर दूर एकांतवास पत्करायचा आणि तिथल्या वेड्यावगड्या माणसांशी रेशमी अनुबंध जोडायचे — काय असेल अशा वागण्यामागचे रहस्य? 'गर्दीत माणसांच्या' माणूस शोधण्याचा हा प्रयत्न होता का? की 'जनांचा प्रवाहो' ओलांडून नव्या जनांच्या प्रवाहात मिसळण्याची ही हौस होती?

सिडनी, कॅनबेरा, मेलबर्न या त्रिकोणात मुशाफिर गुरफटून गेला तर त्याने योजलेला प्रवासाचा अवधी तिथेच संपून जाईल की! प्रेक्षणीय आणि अनुभवलेच पाहिजे असे या प्रदेशात, कमी नाही – पण फारच आहे, म्हणून काढता पाय घेणे कठीण असते. शेकडो एकर पसरलेल्या

सफरचंदांच्या सुंदर बागा, तिथले रसरशीत फळांचे सुगंधी वैपुल्य – सर्व फळे आणि फळांचे रस यांच्यावर चालणाऱ्या शास्त्रशुद्ध स्वच्छ प्रक्रिया आणि कोणीही मोहात पडावे असा त्या त्या फळांचा रस, हीच केवढी अपूर्वाई आहे! निसर्गाने ऑस्ट्रेलियाला इतका भरभरून फलसंभार दिलेला आहे; संत्री, सफरचंदे, द्राक्षे, कलिंगडे, पेअर – म्हणाल ते – सारे उत्तमच मिळते आणि कमतरता कशाचीच नाही. पण आम्ही माणसे एवढ्यावरच खूष नसतो. द्राक्षे म्हणजे अवघ्या दुनियेला मोहात पाडणारी अक्षरशः अमृततुल्य फळे. पण ही द्राक्षे आंबवून त्यांचे मद्य तयार केल्याशिवाय माणसाला चैन पडत नाही. युरोपमध्ये दक्षिण युरोप, ऑस्ट्रिया, फ्रान्स या सर्व देशांत माफक मादक वाइन्स उत्तमोत्तम तयार होतात (असे म्हणतात!). फ्रान्समधील उत्कृष्ट वाइनचे नाव आहे कोनॅक. युगोस्लाव्हियाने तेच नाव आपल्या मद्याला दिले. लगेच फ्रेन्च लोकांनी गहजब केला. कोनॅक हे फक्त फ्रेन्च मद्याचेच नाव असू शकते, असा त्यांनी धोशा लावला. मग बिचाऱ्या युगोस्लाव्ह लोकांनी आपल्या मद्याचे नाव बदलून विनॅक केले. अलीकडे सर्व युरोपियन देश, अमेरिका यांना ऑस्ट्रेलिया हा नवा प्रतिस्पर्धी निर्माण झाला आहे. उत्तम वाइन्स करण्याबद्दल ऑस्ट्रेलियाची ख्याती पंचखंड पृथ्वीवर पसरली आहे. आता ऑस्ट्रेलियात ठायीठायी द्राक्षमळे बहरतात आणि त्यांना जोडून मदिरोद्योगही (वायनरी)! तऱ्हेतऱ्हेच्या मद्यांची विनामूल्य चव तर चाखून पहा असे आमिष हे मदिरोद्योजक दाखवीत असल्यामुळे असेल कदाचित, जरा सवड मिळाली की शेकडो लोकांचे लोंढे मदिरोद्योगांचे दर्शन घेण्यासाठी तिकडे रवाना होतात. हंटर्स व्हॅली या भागात तर मदिरानिर्मितीचे अनेक उद्योग भरभराटीला आले आहेत. त्यांना उदार आश्रय देण्यासाठी षौकीन लोकांची झिम्मड उडते. आणि त्यांची गंमत पाहायला आमच्यासारखे बिगर षौकीनही तिकडे लोटतातच. नमुने चाखताचाखता झिंगणारांचा नमुना मात्र कुठे दिसला नाही.

ooo



# सोनकिनारा ते समुद्रसेतू

हिंदुस्थान सोडून निघालो तेव्हाच मनात एक नोंद केली होती – बाकी प्रेक्षणीय स्थळे पाहायला गेलो नाही तरी चालेल, पण उत्तर ऑस्ट्रेलियात केर्न्सला मात्र निश्चित जायचेच. खरे म्हणजे क्वीन्सलँडपासून उत्तरेचा सर्वच मुलूख म्हणजे अनोख्या निसर्गसौंदर्याची लयलूट आहे. आधी आपण प्रवेश करावा ब्रिस्बेन या अत्याधुनिक शहरात आणि मग किनाऱ्याकिनाऱ्याने घरंगळत जावे केर्न्सला. किनारा असातसा नाही, त्याचे नावच आहे सोनकिनारा – गोल्ड कोस्ट. शुभ्र रेतीने झाकलेल्या विस्तीर्ण

पुळणीवरून मनसोक्त विहार करणारे बेबंद तारुण्य हे गोल्ड कोस्टचे वैभव आहे. उन्हात तापून तप्त सुवर्णाची कांती देहावर चढवलेले स्त्रीपुरुष इथे मोकळेपणाने विहरतात, म्हणून हा सोनकिनारा आहे. प्रशांत सागरातून उदयाला आलेला सूर्य आपली सोनकिरणे ऑस्ट्रेलियाच्या ज्या रेतीवर प्रथम पिळून टाकतो, तो हा सोनकिनारा. संपूर्ण आग्नेय आणि दक्षिण ऑस्ट्रेलियातले हवामान म्हणजे इंग्लिश हवामानाची नक्कल. वातावरण कधी ढगाळ होईल आणि पाऊस येईल, सांगता येत नाही. पण क्वीन्सलँडचा

किनारा मात्र सदैव उन्हात नाहणारा. केवळ एवढ्यासाठी त्याला सोनकिनारा म्हणतात का? की ऑस्ट्रेलियात सोनें मिळणार याची ग्वाही प्रथम इथे मिळाली म्हणून हा सोनकिनारा!

ऑस्ट्रेलियातल्या बाकी महानगरांपेक्षा उंच इमारतींची अधिक आवड आहे ती ब्रिस्बेनला. ब्रिस्बेन नदी सुतासारख्या सरळ पात्रातून वाहणारी. दुतर्फा चिरेबंद विस्तृत घाट. नदीत कुठे साचलेल्या पाण्याची डबकी नाहीत की घाण मारणाऱ्या शेवाळाची बेटे नाहीत. प्रसन्न नदी, प्रशस्त काठ आणि त्यावर माणसांनी निर्माण केलेली शोभिवंत बागशाही. का कोणास ठाऊक, बागेतल्या गुंफांना नावे देताना कोणा कल्पकाला गौतम बुद्धाचे चरित्र आठवले आहे! एक देऊळ आहे ते चक्क नेपाळेश्वराने बांधले आहे. नदीकाठचा हा पार्क म्हणजे ब्रिस्बेनचे फुफ्फुस आहे. या फुफ्फुसाचा पंप सदैव चालू असतो. त्यामुळे नागरिकही सायंकाळी हवा खायला इकडेच फिरकतात आणि इकडे आल्यावर भेळपुरी, पकोडे असले चटकमटक त्यांना आठवतही नाही.

ब्रिस्बेनमधे, ते आवडले म्हणून अधिक रमता येणार नव्हते, कारण वेध लागले होते केर्न्सचे. केर्न्सजवळच्या समुद्रात जगातल्या विख्यात आश्चर्यांपैकी एक आश्चर्य – आणि तेही नैसर्गिक – पाहायला जगातून प्रवासी येत असतात. द ग्रेट बॅरिअर रीफ. समुद्राच्या अंतरंगात असलेला अजस्र पाषाणसेतू. हा किती खडकांचा बनलेला आहे कोणास ठाऊक? या सेतूत एकूण किती बेटे आहेत त्यांना गणती नाही. काही हिरवीगार-घनगर्द झाडीने झाकलेली. काही प्रवालवेष्टित. निसर्गाचे नानाविध चमत्कार दाखवून थक्क करणारी. तिळा उघड म्हणताच आपल्यासमोर खुली होणारी अलिबाबाची एक रत्नगुंफाच जशी!

समाजजीवनाला सगळ्यांत आवश्यक गुण कोणता? स्वयंअनुशासन. ऑस्ट्रेलियाचे नेमके हेच वैशिष्ट्य आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत प्रत्येक गोष्ट कशी सुनियोजित, सुविहित आणि सुव्यवस्थित. वाहतूक नियंत्रण असो, व्यवसायाचे अथवा व्यापाराचे संचालन असो, सहल असो की जगप्रवास असो – काळजीपूर्वक आखणी करून सर्व साधकबाधक शक्यतांचा आधीच पूर्ण विचार करायचा, मग योग्य वेळी योग्य ती पावले टाकायची हे अशा सुसंघटित समाजाच्या अंगवळणीच पडलेले असते.

केर्न्सला मोटेलमध्ये मेहमान म्हणून तुमचे स्वागत झाले की पुढील सर्व गोष्टी आपोआप सुरळीतपणे पार पडतात. सचित्र पुस्तिकांसह माहिती मिळते, वाहनव्यवस्थेचे तपशील सांगण्यात येतात, ठरलेल्या वेळी तुमची आरामशीर गाडी तुम्हांला बोटीच्या धक्क्यावर घेऊन जाते, तिथले सोपस्कार गोंधळ गडबड न होता पार पडतात आणि तुम्ही अगदी सराइतासारखे मार्गस्थ होता. ग्रेट बॅरिअर रीफवर आम्हांला जायचे होते एका छोट्याशा गावी. त्याचे नाव होते कुरुंदा. आपल्या कुरुंदवाडचेच लाडिक नाव वाटले ते. पण प्रवास असा मजेशीर की जाताना जायचे आकाशातून आणि परत येताना प्रवास करायचा जमिनीवरून. आकाशातून जायचे ते स्काय रेलने. स्काय रेल म्हणण्यापेक्षा याला स्काय वॅगन म्हणायला हरकत नाही. कुरुंदाला पोचायला चांगला तास-दीड तास लागतो. पण आपल्या 'डब्यात' इनमीन साडेतीन माणसे. फार तर चार. म्हणजे आपण आपले, आपले आपण! अतिशय गर्द जंगलावरून आपला प्रवास होतो. या जंगलाला म्हणतात रेन फॉरेस्ट. पावसाने रुजवलेले, पावसाने जोपासलेले, पावसाने राखलेले. पावसाने वाढवून दाट दाट आणि उंच उंच केलेले. शेजारची झाडे उंच झाली की नव्या झाडांना उंच झाल्याशिवाय जगणेच अशक्य होते. मग तीही उंच होतात, अवघे अरण्य उंच होते आणि आपण त्याच्याहूनही उंचावरून प्रवास करतो. अशी अनेक जंगले पार केल्यानंतर गाव येणार असते. इथेदेखील माणसे जंगलतोड करू शकतातच, त्यामुळे अधूनमधून हिरव्या वृक्षराजीत खणल्यासारखी विवरे पडतात. पुष्कळ झाडे दिसतात फणसाच्या झाडांसारखी, जांभळासारखी. थोडक्यात ओळखीची वाटतात, पण ती असतात मात्र अगदी वेगळीच. आपल्याला नावेही माहीत नाहीत अशी. आपल्याकडे डोंगरदऱ्यांतून फर्नची झाडे वाढतात पण फांद्या फुटलेली झाडे क्वचित दिसतात. ती दिसतात इकडे ऑस्ट्रेलियात आणि न्यूझीलंडमधे. कुरुंदाला जाताना तर खूपच दिसतात. आपल्याला कुतूहल कमी असते का? या झाडाचे नाव काय, त्या झाडाचे नाव काय? झाडाच्या फांद्यांवर शेवाळ धरते आहे का, सुगंधी ऑर्किडस् वाढताहेत का? एक ना दोन! स्काय रेलमधून जाताना प्रवाशांना झाडांशी सलगी कशी करता येईल? ही अडचण ओळखून साहेबाने वाटेत स्टेशने उभी केली आहेत, एकेक फलाटाची. तुम्हांला फलाटावरच सोडून सोडणारा

डबा पुढे निघून जातो. काही बिघडले नाही, पुढचा येणारा डबा तुम्हांला पुढे घेऊन जाईल. अमुक नंबरचा डबा माझा, हे लक्षात ठेवायची गरज नाही. स्काय रेल ही अखंड फिरणाऱ्या डब्यांची एक मालिका असते. वजनाचा तोल सांभाळणे या तत्त्वावर ती चालते – खिडक्या मोठमोठ्या असतात. मला खिडकी, मला खिडकी असे भांडण करण्याची जरूर नाही. कुरुंदाला जाताना स्काय रेलने जावे आणि येताना घाट-बोगदे पार करणारी झुकझुक गाडी घ्यावी. म्हणजे या भूमीचे दर्शन एकदा आकाशातून घ्यावे आणि एकदा जमिनीवरून. कोकण रेल्वेने प्रवास करताना कसे वाटेल याची चुणूकच इथे आपल्याला पाहायला मिळते. थोडक्यात मिनी रेल्वेने मिनी कोकणातून प्रवास केल्याचे सुख मिळते.

प्रवासाचे ठीक आहे. कुरुंदात गेल्यावर करायचे काय, पाहायचे काय, खायचे काय, असे प्रश्न एकामागोमाग एक कोणाच्याही मनात येतील. हो हो, जरा सबूर!

❖

# जळी सप्तरंग, आनंदतरंग

कुरुंदा हे बोलूनचालून पर्यटकांसाठी वसवलेले गमतीजमतीचे गाव आहे. आपण जाणार एखादाच दिवस, पण या गावाला वर्षाचे बारा महिने आणि महिन्याचे तीसही दिवस जशी काही जत्रा भरलेली असते. जत्रा म्हणवत नाही; कारण अव्यवस्था नाही, गडबड नाही, गोंधळ नाही. ताशे-नगारे, ढोल-पिपाण्या असला कसलाही गोंगाट नाही. नवलाईच्या चिजा विकणारी दुकाने मात्र हारीने लागलेली आहेत. खाण्यापिण्याची लहानमोठी ठिकाणे अर्थात भरपूर आहेत. डोंगरकुशीत वसलेले गाव. त्यामुळे वाटा वळणाच्या, सर्वत्र चढ आणि उतार. बूमरँग आणि तीरकमठे, आदिवासींच्या टोप्या अथवा जाकिटे असला माल तर मिळेलच, पण सर्व गिरि-विहारांच्या ठिकाणी मिळतो तसला फॅशनेबल मालही कमी मिळत नाही. सर्पोद्यान आहे आणि अजबखानेही आहेत, पण दोन जागा विशेष मनात भरतात. एक आहे विहंगवन. खरे म्हणजे याला शुक-बहात्तरी म्हणायला हरकत नाही. हिरव्यागार अंगाच्या आणि लाल चोचीच्या आपल्या ओळखीच्या पोपटांपासून ते पंचरंगी काकाकुवांपर्यंत सर्व जातींची शुक-कुले इथे आनंदाने बागडतात. कोणालाही छोटेखानी पिंजऱ्यांत बंदिस्त केलेले नाही. सर्कसच्या तंबूसारखे मोठे जाळीचे पक्षी-घर असते. आत झाडे आणि वेली, झरे आणि ओढे अशी पक्ष्यांना अगदी घरच्यासारखी वाटायला लावणारी सजावट असते. त्यावर मनसोक्त कूजन करीत, माना वाकड्या करून शीळ घालीत त्यांनी हवे तसे दुडदुडावे, बागडावे. प्रेक्षकांनी त्यांना बघावे आणि त्यांनी प्रेक्षकांना बघावे. त्यांनी आपल्याशी आणि आपण त्यांच्याशी खुशाल सलगी करावी. हवेहवेसे वाटणारे एखादे गुबगुबीत गिर्रेबाज पाखरू आपल्या मनगटावर येऊन बसते आणि लाड करून घेते. त्याला आपले भय नाही आणि आपल्याला त्याचे भय नाही. काही पक्षी एकटे, एकांडे. बरेचसे दुकटे दुकटे म्हणजे जोडीजोडीने. काही छोटे मोठे मेळावे करून किलबिलाट करणारे. ते आपल्या जवळ येतात,

आपल्या ओंजळीतून खाऊ दिला तरी खातात आणि काही तर फोटोसाठी चक्क पोज देतात.

तिथे आणखी एक जगावेगळे अजबघर आहे ते म्हणजे फुलपाखरांचे उद्यान. मुळात कल्पनाच मनोहर आणि त्यात चित्रविचित्र छटा पंखांवर मिरवणारी फुलपाखरे एकत्र पाहाता येणार ही केवढी मोठी आनंदपर्वणी. पण व्यापारी वृत्ती कशी बेरकी असते. म्हणून इवलीशी फुलपाखरे पाहायला छोट्या मुशाफिरांची मोठी गर्दी होणार हे ओळखून या उद्यानात प्रवेश फी जरा मोठीच ठेवलेली आहे. म्हणून तिकडे वळण्यापेक्षा निसर्गाची शोभा पाहणेच अधिक श्रेयस्कर असे बहुधा मुशाफिर ठरवीत असावेत. कुरुंदाला वड-औदुंबरांच्या जातीचे एक झाड आहे. त्याच्या अंगाखांद्यावरून जमिनीपावत लोंबलेल्या पारंब्या आता अशा दाट वाढलेल्या आहेत की वृक्षाच्या बुंध्याभोवती त्याचाच एक पडदा लावल्याचा भास होतो.


दुपार ओसरली. सूर्य कलला. थोडीफार पावसाची लक्षणे दिसू लागली. तेव्हा कुरुंदा नामक कुरुंद-वाडीवरून झुकझुक गाडी पकडून पहाडापहाडांतून बोगदे आणि पूल पार करीत केर्न्स नामक नेरळला जाण्यासाठी प्रस्थान ठेवणे योग्य असा निर्णय घेणे ओघाने आले. फरक एवढाच की माथेरान नेरळच्या प्रवासापेक्षा हा प्रवास निदान पाचपट दीर्घ आणि गाडी चित्रमय प्रदेशातून जाणारी. ढग आले होते हे खरेच, थोडाफार पाऊसही होता. झाडामाडांवर सतेज हिरवी झिलई चढली होती. नजरेला निववणारे धबधबे वाटेत भेटत होते. इंजनेर लोकांची कमाल वाटणारे पूलही वाटेत भेटत होते. झुकझुक गाडी मात्र स्वच्छ होती, आरामशीर होती, साफसुरळीत चालत होती. कोकण रेल्वे झाल्यावर प्रवास कसा होईल याचा ट्रेलरच इथे अनुभवायला मिळतो.







समुद्रसेतूवरचे खेडे पाहणे मजेदार असले तरी त्याचे खरे आकर्षण अगदी वेगळे आहे. या सेतूवरच्या एखाद्या बेटावर जाऊन समुद्राच्या तळाशी असलेल्या संपत्तीचे दर्शन मुशाफिरांना घडते, ही या प्रवासाची



खासियत आहे. ग्रेट ॲडव्हेंचरर नावाचे वाफोर अशा बेटांवर प्रवाशांना झोकांत घेऊन जातात. या बेटांत एक मोठे बेट आहे हरितद्वीप – ग्रीन आयलंड. आपण काय करायचे? रामपारी निघायचे. बोटीमधे शिरायचे. सोयिस्कर आसन धरायचे. नावाप्रमाणे शांत असलेल्या प्रशांत महासागराच्या छाताडावरून ग्रीन आयलंडचा भाऊचा धक्का आला की लहान मुलाच्या उत्साहाने उतरायचे आणि काहीशा अरुंद जेटीवरून बेटाकडे मोर्चा न्यायचा. या जेटीच्या दोन्ही बाजूंना पाण्याकडे नजर गेली तर मात्र पाय लवकर उचलणे कठीण जाईल. तेथे समुद्राचे पाणी गुडघाभर खोल असेल नसेल, पण नाना रंगांचे मोठमोठे मासे झुंडीने फिरताना दिसतात. निवळशंख पाण्याच्या स्फटिकभूमीखाली त्यांचे दर्शन अक्षरशः मनोहर असते. त्यात भर घालण्यासाठी त्या उथळ पाण्यात बुचकळ्या मारण्यासाठी उतरलेल्या कमनीय किशोरी आणि युवती आपले लक्ष वेधून घेतात तो भाग अलाहिदा!

ग्रीन आयलंड – हरित द्वीप. स्वच्छ मराठीत सांगायचे तर हिरवाळीचे बेट – म्हणजे निळ्या समुद्राच्या मखमालीवर ठेवलेला प्रचंड हिरव्या पाचूंचा लांब आकाराचा ढिगारा आहे जसा! हिरवाळीच्या बेटावर नावाप्रमाणेच गर्द हिरवी झाडी आहे, वाट चुकायला आमंत्रण देणाऱ्या वाटा आहेत. अर्थात वाट चुकली तरी मुशाफिराने बावरून जाऊ नये म्हणून त्याला मार्गदर्शन करणाऱ्या पाट्या ठायीठायी लावलेल्या आहेत. येथे जलविहाराच्या सर्व सोयी प्रवाशांच्या सुखासाठी पुरवल्या जातात. पाणबुड्यांसारखे वेष, वल्ह्यासारखे हातमोजे-पायमोजे, या सामग्रीसह समुद्रस्नानाचा आनंद अनुभवा किंवा सर्फ रायडिंगसाठी जा किंवा एखादे सुरक्षित लगून पाहून पोहायची हौस भागवून घ्या. बेटावर क्षुधाशांती, तृषाशांती यांची वाण नाही. हवे तर द्यूताची हौसही पुरवून घेता येईल. किंवा हे काहीच करायचे नसेल तर 'आकाश मंडप प्रिथिवी आसन' अशा उदात्त वातावरणात वृक्षवल्ली आणि वनचरें या सोयऱ्यांशीही जवळीक करता येईल. बाकी ऑस्ट्रेलियातील वनचरेंही मुलखावेगळी आणि गोंडस आहेत. विशेषतः जन्म झाल्यावरही आपल्या अपत्याला अक्षरशः पोटात घेऊन हिंडणारे कांगारू आणि आपल्या गोजिरवाणेपणाने स्वतःचे लाड करायला लावणारे कोआला हे ऑस्ट्रेलियन प्राणिसृष्टीतील दोन खास नमुने आहेत. कांगारू नजरेत

भरतो त्याच्या विचित्रपणाने आणि कोआला गोंडसपणाने! जलचरघर नेहमीच अद्भुत असते, तसे येथेही आहे. सर्पही हवे तर स्नेहबंधन जोडू शकतील. पण मकरउद्यानात मात्र सावधान!

दुरून पाहिले तर एखादा खडबडीत काळा खडक पडला आहे असे वाटते. अशा दोन तीन खडकांना डावी किंवा उजवी घालून पुढे गेले आणि जरा मागे राहिलेल्या सोबत्यांसाठी म्हणून आपण काही अंतर पुन्हा माघारी आलो तर त्या खडकांनी जागा तरी बदललेली असते किंवा तोंड दुसरीकडे वळवलेले असते किंवा इंच इंच लढवीत ते दोनचार इंच पुढे सरकलेले असतात. केवढाल्या मगरी! मगरी कसल्या, काळ-मगरीच या. मकरोद्यानात ठेवल्या आहेत म्हणून सुस्त आणि निरागस वाटतात, पण घनदाट जंगलातल्या पाणथळीत चुकून कोणाचा पाय लागला तरी तो अपमान या मगरी अपमान करणाऱ्यासकट गिळून टाकत असतील. प्राचीन दुनियेचे महाकाय अवशेष अजूनही कुठे कुठे सापडतात आणि त्या अवशेषांची फेरजुळवणी करून इतिहासपूर्वकालीन महाभयंकर दिनासुरांची कल्पना आपण आता थोडीफार करू शकतो. पण कलियुगातल्या या मगरींचे दर्शन काय कमी भयावह आहे? यांच्या कुळातील पूर्वज यांच्यापेक्षा दोनचार पट मोठे असतील असे मानले तर त्यांच्या संभाव्य स्वरूपाच्या कल्पनेनेच अंगावर काटा उभा राहतो. अर्थात माणसाच्या मनाची मोठी गंमत आहे. आता तसले महाकाय प्राणी पृथ्वीवरून अंतर्धान पावले आणि मनुष्यप्राण्याजवळ आत्मसंरक्षणाची आणि अन्य विनाशाची अनेक साधने उपलब्ध झाली याची जाणीव दुनियेतील सर्वांना झाल्याबरोबर राक्षसी आकाराच्या प्राण्यांचे भय कोणालाच वाटेनासे झाले. आता भय उरले आहे ते अणुपरमाणूंहून लहान असलेल्या जीवजंतूंचे!

ज्या नौकेत बसून हिरवाळीच्या बेटावर यायचे तिचे नाव महान साहसी, 'द ग्रेट ॲडव्हेंचरर'! समुद्रसेतूच्या सफरीत साहस असते ते समुद्राच्या पोटात शिरण्यात! पृथ्वी वसुंधरा आहे आणि तिच्या पोटात असंख्य तेजस्वी रत्ने आहेत. आकाशात अगणित तारका आहेत, नक्षत्रे आहेत आणि अजून आकाराला न आलेल्या तेज:पुंज तारकाकणांच्या असंख्य राशीही आहेत. पण पृथ्वी आणि आकाश यांचे वैभव अदृश्य तरी किंवा आपल्या आटोक्याच्या पलीकडे तरी. सागरसंपत्तीची गोष्ट वेगळी. ती

दृश्य आहे पण कष्टसाध्य आहे. ती लाभेल असे वाटते पण सुळकन् हातांतून निसटून जाते. मोती आणि पोवळी यांसारख्या बहुमोल मानल्या गेलेल्या संपदेची गोष्ट सोडा. पण केवळ शंख आणि शिंपले घेतले, चुनखडी चित्रे आणि समुद्रफेसापासून घडलेली फुले घेतली तरी त्यांची अपरंपार विविधता आणि मनाच्या वर्तुळात न मावणारी सुंदरता – किती विलक्षण गोष्टी आहेत या! सागरातली खरी संपत्ती आहे ती मात्र जिवंत जित्या-जागत्या जीवसृष्टीची. प्रचंड आकाराचे जलचर आणि चारोळ्या-लवंगा यांच्याहूनही बारीक असे जिजीविषू जीव, कठीण पाषाणांत सुरक्षित राहणारी कालवे आणि चक्रव्यूहासारख्या गुप्त भुयारी विवरांत लपून राहणाऱ्या चिंबोऱ्या, भस्सकन् रेतीत बीळ पाडून अदृश्य होणारे खेकडे आणि सर्वांत अलौकिक सुंदर म्हणजे नाना आकारांचे, नाना परींचे, शेकडो रंगांचे छटेल चट्ट्यापट्ट्यांचे, उभ्या-आडव्या-तिरक्या-उंच-खोल, सतत सुळकांड्या मारून हुलकावण्या देणारे मासे! फुले आणि फुलपाखरे दोहोंचे जसे असंख्य रंग, अगणित आकार, परोपरीचे प्रकार – तसे जातिनाम तेवढे मत्स्य पण प्रत्येकाचा ठसा वेगळा! लक्ष चौऱ्याऐंशीच काय पण मासे म्हणजे कोट्यवधी ठसे! मात्र हे सगळे वैभव जलावगुंठित! पाण्याची बुंथी बाजूला झाली तर मत्स्यकन्येचे रुपडे नजरेत भरणार!

हिरवाळीच्या बेटावरची गोष्ट वेगळी. अगदी पाणबुडी नव्हे पण पाणडुबी बोट घ्यायची इथे. तिला तिरप्या तावदानांच्या खिडक्या चौफेर लावलेल्या असतात. तिची भ्रमंती सुरू होते सागराच्या पृष्ठभागाखाली. वाटते, बिचाऱ्या मासोळ्यांना हा नवा दांडगा मासा कोण आला आहे, तो मित्र आहे का शत्रू आहे हे काही म्हणता काही कळत नसावे. माशांचे थवेच्या थवे बोटीला बिलगून हिंडू लागतात. कोणी उताणे-पाताणे पोहतात आणि वदनोदर दर्शन देतात. कोणी लांबुटके सडसडीत, कोणी बुटके धष्टपुष्ट, रुपेरी-सोनेरी, जांभळे-पिवळे, वर्ख लावल्यासारखे, कोणी काळ्यापांढऱ्या चट्ट्यापट्ट्यांच्या वेषात, कोणी अंमळ अचपळ मासोळ्या, कोणी वल्ह्यासारखी शेपटे मारीत पाणी कापणारे बडेमियाँ – मासे मंडळींची इतकी जवळीक, परस्परांबद्दल इतका विश्वास – मुख्य म्हणजे माणसांबद्दल त्यांच्या मनांत इतका विश्वास, इथल्यासारखा आणखी कोठे दिसणार?


या चलत्मस्य दर्शनाला निसर्गाने जी पार्श्वभूमी बहाल केली आहे तीही

सप्तरंगी आहे. यांना म्हणायचे पोवळी किंवा कॉरल्स. पण रत्ने म्हणून माणसे ओरबाडून काढतात ती ही कॉरल्स नव्हेत. या समुद्रफेनात रुजलेल्या म्हणा किंवा फेनाच्या बनलेल्या म्हणा किंवा फेनाचे रूपांतर झालेल्या वनस्पतीच आहेत. त्यांना नारिंगी, पिवळे, भगवे, केशरी, लाल, जांभळे, निळे, कबरे अशा रंगांनी कोणी न्हाऊ घातले असेल? समुद्राच्या तळाशी किंचित किंचित हलता झुलता रंगबहार गालिचा निर्माण करणाऱ्या या कॉरल्सची सुंदरता लक्षद्वीपला, मॉरिशसला – थोडक्यात अन्य द्वीपांजवळही आपण पाहू शकतो. पण सागरसेतूजवळच्या समुद्रात एवढ्या विस्तृत प्रदेशावर आणि विपुल प्रमाणात ही पोवळ्यांची जादू आपण पाहातो की केवळ या एका वैशिष्ट्यासाठीसुद्धा या महान सागरसेतूला जगातले अद्‌भुत आश्चर्य मानावयास हरकत नाही. 'अहो लब्धं नेत्रनिर्वाणम्' असा चक्क संस्कृत धन्योद्‌गार काढून मुशाफिराने कष्टाने घराची वाट धरावी एवढेच बाकी उरते.

ooo

# बाय ऑस्ट्रेलिया, हाय न्यूझीलंड

ऑस्ट्रेलियात पुष्कळ पाहिले आणि पुष्कळ राहिले. मनाच्या शिंपलीत काही मावले, बरेचसे ओसंडले, सांडले. ऑस्ट्रेलियाची टिपणे टिपता टिपता तिथल्या माणसांची चित्रे साऱ्या पार्श्वभूमीवर रेखाटायला हवी होती, ते राहूनच गेले. साठ-सत्तर दिवसांच्या धावत्या प्रवासात ऑस्ट्रेलियातील नाना परींच्या वस्तीकरांशी जवळून ओळख होणे हे दुरापास्तच. भक्कम धाष्टर्य दाखवणाऱ्या धंदेवाईक प्रवासवर्णन-लेखकाला हेही जमते किंवा जमवावे लागते. इकडून तिकडून आणलेली बुद्धी कितीही शिणवली तरी येरागबाळांना ते कसे जमावे?





ऑस्ट्रेलियात काय पाहिले याच्या सुखद आठवणी आहेत आणि काय पाहू शकलो नाही याची विलक्षण चुटपूटही मनाला लागलेली आहे. ॲडलेडला जायचे होते. शक्य तर पर्थलाही. परंतु काळ, वेग आणि अंतर यांच्या गणितात ते बसेना. ॲडलेडला जायचे होते ते मुख्यतः दुरून का होईना सर डॉन ब्रॅडमनना पाहावे-या हेतूने. पण क्रिकेटचा

हा अनभिषिक्त बादशहा कोणालाही सहजासहजी भेटत नाही, दर्शनही देत नाही असे कळले आणि मन निराश झाले. वायव्य सीमेवरील डार्विन हे देखील खूप दूर – जवळ जवळ अलंघ्य अंतरावरचे वाटले. ऑस्ट्रेलियाच्या मध्य प्रदेशात बरीचशी भूमी वैराण आहे पण जेथे हिरवळ आणि चारा आहे तेथे गाईगुरांची प्रचंड खिल्लारे आहेत, मेंढ्यांचे आपल्या कल्पनेतही मावणार नाहीत असे मोठाले कळप आहेत, त्यांची देखभाल किंवा रखवाली करण्यासाठी हाताच्या बोटावर मोजण्याएवढी कुत्रीही पुरेशी ठरतात, अशा गोष्टी कानावर येतात परंतु यांतील काहीच बघण्याची संधी मिळाली नाही. अलीकडे तर म्हणे मोठ्या कळपांचे नियमन करण्यासाठी छोटी विमाने किंवा हेलिकॉप्टर्सदेखील वापरण्यात येतात. पण हे सारे आवाक्याबाहेर राहिले. मेंढ्यांची लोकर कापणे (शीअरिंग) हा एक खास अनुभव असतो आणि मुशाफिरांना तो घेता यावा यासाठी योजना उपलब्ध असतात. पण या योजना इतरांसाठी, असे म्हणून त्या सोडून दिल्या. ओपल म्हणजे अनमोल खडे – एक प्रकारची रत्नेच. पण अस्सल ओपल्सच्या शो केसपाशी फिरकण्याचीही हिम्मत होत नाही, तेथे ओपल्स हाताळणे वा विकत घेणे दूरच राहिले. तीच गोष्ट आभूषणांसाठी वापरल्या जाणाऱ्या पोवळ्यांची. दूर दक्षिणेला टास्मानिया बेट आहे तेथे अप्रतिम निसर्गसौंदर्य आहे. पण माझ्या वास्तव्याच्या काळात टास्मानियात होबर्टजवळच्या एका उपाहारगृहात कोणा अमानुष गुन्हेगाराने एकाच सपाट्यात ३५ माणसांचे मुडदे पाडले. त्यामुळे टास्मानियाला भेट देण्याची प्रबळ ऊर्मी मी मनातच जिरवून टाकली.

माझे मन मला सांगू लागले, तुझा ऑस्ट्रेलियातला शेर संपला आहे. पण धीर सोडू नकोस. दक्षिण समुद्रात आणि तेही फार दूर नाही, एक छोटेसे नंदनवन तुझी वाट पाहात आहे. पुन्हा पुन्हा दूरदूरचे प्रवास झेपण्यासारखे तुझे वय राहणार आहे का? सायंकाळची सोनेरी किरणे साऱ्या आसमंतावर वेगळेच तेज सांडत आहेत. हा क्षण चतुराईने पकड. पकड एक सफाईदार हवाई जहाज, उत्तर न्यूझीलंडमध्ये... चल बेटा, चल ऑक्लंडला!

काळाला अंत नाही आणि पृथ्वी विशाल आहे, हे अर्धसत्य आहे. ओहोटीच्या वेळी घोटाभर पाण्यात उभे राहावे आणि पायाखालची वाळू

सरकत असते याचा अनुभव घ्यावा आणि मग मनाशी खूणगाठ बांधावी की आपल्या पायाखालून काळही असाच नकळत सरकत जातो, सरत जातो. आयुष्याच्या अखेरच्या पर्वात जवळ उरते ती हळहळ. मनात चुकचुकते ती चुटपूट! हे राहून गेले आणि ते राहून गेले. अमुक संधी आली होती ती गमावली. थोडा धीर धरला असता तर तमुक लाभ झाला असता, पण ऐन वेळी उतावीळपणाने हातचे सोडून पळत्याच्या पाठीमागे धावलो. तेल नाही, तूप नाही, हाती धुपाटणे आले.

आता हेच पहा ना! नॉर्वेमध्ये जायचे आणि लिल् हॅमरपर्यंत जाऊन बर्फावरचे खेळ न पाहता परत फिरायचे. पुन्हा उत्तर ध्रुवाजवळ असलेल्या लिल् हॅमरला आपण जातोय कशाला? 'हुकली रे संधी हुकली' म्हणून स्वतःशी झुरमुरत बसायचे झाले! अमेरिकेत जाऊन आधुनिक बहाद्दर दुनियेची – म्हणजे 'ब्रेव्ह न्यू वर्ल्ड'ची – यात्रा करायची, पण होनोलुलू किंवा ग्रँड कॅन्यॉन किंवा यलो स्टोन नॅशनल पार्क – इकडे फिरकायचेच नाही. मग पश्चात्तापाशिवाय हाती राहतेच काय? म्हणून तर ऑस्ट्रेलियाला जातानाच त्रिवार निश्चय केला होता की कांगारूंची भूमी पाहायची आणि किवींच्या देशाचे तोंडही पाहायचे नाही, असला करंटेपणा आपण करायचा नाही. नुसता ऑस्ट्रेलिया अनुभवायचा आणि न्यूझीलंडची तोंडओळखही करून घ्यायची नाही हा – शुद्ध मराठीत सांगायचे तर – दळभद्रीपणा झाला.

उत्सुक मनाने आणि विस्फारित नजरेने न्यूझीलंडमध्ये ऑकलंडच्या विमानतळावर मी उतरलो. विमानतळ तसा ऐसपैस होता. पण उत्तुंग नव्हता. पुढे लक्षात आले की सगळ्या न्यूझीलंडलाच 'उंच उंच माड्या नाहित कामाच्या' हे वचन ब्रीदवाक्यासारखे वाटत असावे. आजच्या जगातल्या अत्याधुनिक शहरांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे आभाळात घुसलेल्या उंचच उंच मिनारांच्या अनेक मजली इमारती. मोजता येऊ नयेत असे मजल्यावर मजले. रस्त्यात म्हणजे जमिनीवर उभे राहून छपराकडे पाहू लागल्यास मुशाफिरांच्या टोप्या खाली पडाव्यात अशी चोख व्यवस्था. पण हे सारे इतर शहरांत. ऑकलंडला एक आदबशीर ठेंगणेठुसके रूप आहे. ते नीट डोळ्यांत साठवण्यासाठी काय करावे? एक-तरू गिरीवर (वन ट्री हिलवर) जावे... म्हणजे मोटर न्यावी! डोंगरमाथ्यावरून खूप

मोठे क्षितिज न्याहाळावे. हळूहळू असे लक्षात येते की पायथ्यापलीकडे वसलेल्या ऑकलंडला शांतपणे, निवांतपणे नांदायचे आहे. नाही त्याची झाडामाडांशी होड, नाही आभाळाला खरवडण्याचा (स्कायस्क्रेपिंगचा) हव्यास. पाणी, जमीन, वनस्पती आणि शांततेत अर्धवट झोपी गेलेली घरकुले यांचा सुंदर मेळ साधून ऑकलंड, फलकावर काढलेल्या चित्रासारखे देखणे दिसते आहे आणि निवांतपणे नांदते आहे.

फसू नको मुशाफिरा! शांतता देखील भासते तेवढी शांत नसते. वन ट्री हिलवर जो उंच स्तंभ उभा केला आहे ते आहे युद्धात कामी आलेल्या न्यूझीलंडच्या शिपायांचे स्मारक. परंतु शेजारी जो एक-तरू उभा आहे तेही आहे एक स्मारकच. वसाहत निर्माण करू पाहणाऱ्या गोऱ्या लोकांशी मूळ वस्तीकर आदिवासी जे माओरी त्यांचा सुप्तगुप्त संघर्ष आहे. गंमत अशी की या संघर्षाचे प्रतिबिंब टेकाडावरच्या झाडात देखील पाहता येईल. सध्या वाढते आहे ते झाड उपऱ्यांनी आणलेले आहे, आमचा मूळ वृक्ष हा नव्हे, असा माओरींचा दावा आहे. मुळे घट्ट रोवून उभ्या असलेल्या वृक्षाचे हात, पाय, मस्तक तोडून टाकण्यासाठी आणि तो उपऱ्यांचा वृक्ष जमीनदोस्त करून टाकण्यासाठी माओरी अतिरेक्यांनी या वृक्षावरच सौप्तिक पर्वाचे हल्ले चढवलेले आहेत. घातपाती कारवायांपासून वृक्षाला वाचवण्यासाठी आता सक्त पहारे वाढवण्यात आले आहेत.

या संघर्षाकडे दुर्लक्ष करून आसमंतात नजर टाकावी. ऑकलंड नगरीचे विहंगम दर्शन घ्यावे. दहा-अकरा लाख वस्तीचे हे शहर – अर्थात न्यूझीलंडमधले सर्वांत मोठे शहर. वस्ती दहा लाखांची असली तरी विस्तार महानगराचा आहे. साहजिकच शहर कसे सदा हातपाय पसरणारे झालेले आहे. फार रुंद नव्हेत पण फार अरुंदही नव्हेत असे बेतशीर रस्ते. वळणेवाकणे माफक पण अति आखीवरेखीवपणाही नाही अशी त्या रस्त्यांची योजना. हिरव्या सोयऱ्याधायऱ्यांना सुखात वाढू देऊन माणसांनाही सुखकर वाटतील अशा गृहरचना. सारांश, 'टुमदार कुणाची छान, नवति भरज्वान, छबीली नगरी!' हिचे रूप डोंगरमाथ्यावरून पाहून डोळ्यांत साठवावे आणि मग तिची जवळून ओळख करून घेण्यासाठी तिच्या बाजारपेठेतून आणि अति गर्दी नसलेल्या वाटांवरून चक्कर मारावी.

ऑकलंडमध्ये येणाऱ्या मराठी पाहुण्यांना खास उत्तम पाहुणचार करणारे युगुल म्हणजे डॉ. सुधाकर आणि अनुराधा मायदेव. डॉक्टर संमोहन वैद्यकातील निष्णात तज्ज्ञ आहेत पण तितकीच त्यांची खासियत म्हणजे त्यांचे मायदेश आणि मायभाषा यांवरील प्रेम. मायदेव मूळचे सांगलीचे. आता वर्षानुवर्षे न्यूझीलंडमध्ये व्यवसाय आणि वास्तव्य केल्यामुळे त्यांना ऑकलंडचे म्हणणेच अधिक साजून दिसेल. त्यांचे मराठी लिहिणे प्रौढ असल्यामुळे ते काहीसे क्लिष्ट वाटते अशी लाडिक तक्रार तरुण मंडळी अधूनमधून करतात, पण मला तरी ते शुद्ध मराठीचा आग्रह धरणारे उत्तम भाषाप्रेमी वाटले. त्यांच्या सहधर्मचारिणीने, अनुराधाताईंनी, त्यांचा हा गुण व्यवस्थित उचललेला आहे, सांभाळलेला आहे. याचे एक गमतीशीर उदाहरण म्हणजे मायदेवांच्या घरचे दोन कुत्रे. त्यांची नावे काय असावीत? एकाचे नाव आहे श्वान आणि दुसऱ्याचे कुत्रा. होय, होय – चक्क मराठी नाव कुत्रा. बोला आता! मराठीचा अभिमान, टॉमी टॉमी, यू, यू, यू म्हणणाऱ्या कोणा पुणेकराला की 'कुत्रा, बाहेर जाऊन बस पाहू', अशी आज्ञा फर्मावणाऱ्या डॉ. सुधाकर-अनुराधाताईंना!

'वाटेत दिसणाऱ्या प्रत्येक बोचक्यात तोंड खुपसून त्यात काय आहे याचा शोध घ्यायचा असे करणाऱ्या मांजरासारखा माझा स्वभाव आहे' असे आचार्य अत्रे म्हणत असत. मला वाटते, माझ्या स्वभावातही असेच कुतूहल नित्य जागे असते. अनुराधाताईंनी ते कसे ओळखले कुणास ठाऊक? त्यांनी मला इतर अजबखान्यांप्रमाणे माओरी जीवनाचे दर्शन घडवणाऱ्या अफलातून अजबखान्यातही नेले. माओरींच्या गोधड्या आणि कांभरुणे, झगे आणि शिरोभूषणे, तुझ्या गळा-माझ्या गळा करीत घातलेल्या माळा, तऱ्हेतऱ्हेचे शिंपल्यांच्या जडावाचे दागिने आणि शोभेच्या वस्तू या गोष्टी तर तेथे होत्याच पण त्या बरोबरच त्यांची घरकुले आणि त्यांतील सजावटी, भित्तिचित्रे, काष्ठशिल्पे, आदिम अवस्थेतल्या मानवसमूहांना भावतात तशा भुताखेतांच्या आणि देवदेवतांच्या प्रतिमा – तात्पर्य, माओरींच्या जीवनाचे सम्यक् नसले तरी भरपूर भान करून देणारा हा अजबखाना ऑकलंडमध्ये पाहता येतो.

कितीही अजबखाने रचले आणि कितीही जीवनदर्शने घडवली तरी माओरींच्या अंतरंगाचे स्वच्छ प्रतिबिंब कोणाला आणि कसे दिसणार ते

कळत नाही. जगामधील अनेक आदिवासी जमातींपैकी एक जमात एवढीच माओरींची या दुनियेतली नामोनिशाणी नाही. माओरी न्यूझीलंडच्या एकूण लोकसंख्येमध्ये १५ ते २० टक्के आहेत. स्वभावतः ते लढवय्ये आहेत. आपली अस्मिता जपण्यासाठी निकरावर येण्याची त्यांची प्रवृत्ती आहे. आता महत्प्रयासाने त्यांना मौवाळ करण्यात आले आहे. त्यांचा कडवा विरोध सौम्य करण्यात आता बरेच यश मिळालेले आहे. पूर्वी साक्षात् व्हिक्टोरिया राणीने माओरींशी तह केला आहे. या तहान्वये माओरी म्हणतील तर त्यांची भूमी त्यांना परत द्यायला लागेल असे ठरलेले आहे. या कलमावर बोट ठेवून अधून मधून बंडखोर माओरी आपली भूमी परत मागत असतात. परंतु आता अलीकडच्या काळात अटीतटीची, टोकाची भूमिका ते सहसा घेत नाहीत. शक्य तो अँग्लोसॅक्सन वसाहतवाल्यांशी जमवून घ्यावे, आपले प्रश्न सामोपचाराने आणि गोडीगुलाबीने सोडवावेत हे त्यांना पटत चालले आहे. त्यामुळे पुष्कळदा आपल्या वैराचे उकळते तेल युरोपीय समाजाच्या वड्यावर ओतण्याऐवजी ते नव्याने न्यूझीलंडचा आश्रय करणाऱ्या आशियाई समाजांच्या वांग्यावर ओतावे, त्यांना होरपळून काढावे ही वृत्ती माओरींत वाढत चालली आहे. इंग्लिश वस्तीकर आता जाणार नाहीत हे माओरींनाही पक्के माहीत आहे. म्हणून आपल्या संतापाच्या आगीत भारतीय, फिजियन, सामोअन अशा लोकसमूहांना टाकायला हरकत नाही ही भूमिका अनेक माओरी राजकारणी घेत असतात. उलट माओरींच्या जीवनाशी आपल्याला एकरूप व्हावे लागणार आहे या बेरकी हिशोबाने काही इंग्रेज राजकारणी स्वतःला गोरे माओरी म्हणवून घेत असतात. जगभर पंचखंडांत नजीकच्या भविष्यात एक संघर्ष पेटणार आहे याची चाहूल न्यूझीलंडमध्ये लागते आहे. तसे पाहिले तर हा देश किती चिमुकला आहे! सर्व देशाची वस्ती किती? मुंबईच्या एकतृतीयांश! या ३०-३५ लाखांत माओरी किती? जेमतेम ५ लाख. पण हे ५ लाख म्हणजे एक प्रश्नचिन्ह आहे. ही भूमी कोणाची? अति आदर्शवादी भूमिकेवरून पाहिले तर माओरींची. हे इथले आदिवासी रहिवासी. जंगलांच्या आश्रयाने पण आपल्या सांस्कृतिक कल्पनेने शतकानुशतके जीवन कंठणारे वनवासी. समजा, उद्या तेथील वसाहतवाद नष्ट होऊन

भूमी पुन्हा सर्वस्वी भूमिपुत्रांची झाली तर सोन्याच्या खाणी सापडतील? पेट्रोल अधिकाधिक मिळत जाईल? नवे नवे उद्योग आकाराला येतील? सामाजिक सभ्यता (सिव्हिलिझेशन) विकसित होईल? हा देश अधिकाधिक प्रगत होईल? आधुनिक दुनियेत त्याचा मानसन्मान चिरंतन काळ टिकेल? की असे काहीच होणार नाही? शेतीवाडी खुरटत जाईल? जंगलचे कायदे प्रबळ होऊन समाज सुसंस्कृतताही गमावून बसेल? कालचक्र ठप्प होऊन पुन्हा गतार्थ झालेल्या युगात देश लोटला जाईल? त्याच्याकडे बुभुक्षित निष्ठुर नजरा वळतील? त्याच्यावर अनिर्बंध अत्याचार सुरू होतील? जगातील राष्ट्रांच्या मालिकेतून एक फुटका मणी ओघळून पडेल?

विचारांचे असे भिरभिरे मनात भिरभिरू लागले की ध्यानात येते, न्यूझीलंडसारखाच प्रश्न आफ्रिकन राष्ट्रांपुढे उभा राहणार आहे; फिजी आणि पापुआ यांची समस्या अशीच होणार आहे; अमेरिका आणि कॅनडा यांसारखे प्रगत श्रीमंत देशदेखील अशा प्रश्नांमुळे चांगलेच अडचणीत सापडणार आहेत. आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका इतकेच नव्हे तर युरोप आणि उत्तर अमेरिकेत देखील या यक्षप्रश्नाचे उत्तर शोधावेच लागेल. सवंग लोकाभिमुखतेची भूमिका घेऊन कोणाचेच भागणार नाही. काळे आणि गोरे; तथाकथित उच्चवर्णीय नि तुच्छवर्णीय; मूळचे आणि उपरे; भूमिपुत्र आणि अभ्यागत असले भेदाभेद म्हणजे अमंगळ भ्रम आहेत हे कटुसत्य असले तरी सर्वांना पत्करावेच लागेल. मानवाचे अंती एक गोत्र या सूत्राला मान्यता द्यावीच लागेल. हे परिवर्तन शांततेने, समजुतीने, संघर्ष आणि रक्तपात टाळून कसे घडवून आणायचे याचा शोध २१ व्या शतकात घेण्याचा निश्चय सर्व विश्वहितचिंतकांना करावा लागणार आहे.

एका गोष्टीची गंमत वाटते : अशा प्रश्नांची कावकाव मनाला त्रास देऊ लागली की मन सृष्टीची नाना विलसिते अनुभवण्यात सर्व चिंता मिटवू पाहते. ऑकलंडसारख्या शहराच्या भोवती सृष्टिचमत्कार आणि निसर्गसौंदर्य या दोन्हींची लयलूट आहे. आधीच न्यूझीलंड म्हणजे प्रति स्वित्झर्लंड म्हणावे असे सुंदर. हिरव्या वनराया. वृक्षांची सुरम्य तटबंदी लाभलेले सुरेख रस्ते. तरी एक राहिले – न्यूझीलंडच्या अति सुंदर

कळत नाही. जगामधील अनेक आदिवासी जमातीपैकी एक जमात एवढीच माओरींची या दुनियेतली नामोनिशाणी नाही. माओरी न्यूझीलंडच्या एकूण लोकसंख्येमध्ये १५ ते २० टक्के आहेत. स्वभावतः ते लढवय्ये आहेत. आपली अस्मिता जपण्यासाठी निकरावर येण्याची त्यांची प्रवृत्ती आहे. आता महत्प्रयासाने त्यांना मौवाळ करण्यात आले आहे. त्यांचा कडवा विरोध सौम्य करण्यात आता बरेच यश मिळालेले आहे. पूर्वी साक्षात् व्हिक्टोरिया राणीने माओरींशी तह केला आहे. या तहान्वये माओरी म्हणतील तर त्यांची भूमी त्यांना परत द्यायला लागेल असे ठरलेले आहे. या कलमावर बोट ठेवून अधून मधून बंडखोर माओरी आपली भूमी परत मागत असतात. परंतु आता अलीकडच्या काळात अटीतटीची, टोकाची भूमिका ते सहसा घेत नाहीत. शक्य तो अँग्लोसॅक्सन वसाहतवाल्यांशी जमवून घ्यावे, आपले प्रश्न सामोपचाराने आणि गोडीगुलाबीने सोडवावेत हे त्यांना पटत चालले आहे. त्यामुळे पुष्कळदा आपल्या वैराचे उकळते तेल युरोपीय समाजाच्या वड्यावर ओतण्याऐवजी ते नव्याने न्यूझीलंडचा आश्रय करणाऱ्या आशियाई समाजांच्या वांग्यावर ओतावे, त्यांना होरपळून काढावे ही वृत्ती माओरींत वाढत चालली आहे. इंग्लिश वस्तीकर आता जाणार नाहीत हे माओरींनाही पक्के माहीत आहे. म्हणून आपल्या संतापाच्या आगीत भारतीय, फिजियन, सामोअन अशा लोकसमूहांना टाकायला हरकत नाही ही भूमिका अनेक माओरी राजकारणी घेत असतात. उलट माओरींच्या जीवनाशी आपल्याला एकरूप व्हावे लागणार आहे या बेरकी हिशोबाने काही इंग्रेज राजकारणी स्वतःला गोरे माओरी म्हणवून घेत असतात. जगभर पंचखंडांत नजीकच्या भविष्यात एक संघर्ष पेटणार आहे याची चाहूल न्यूझीलंडमध्ये लागते आहे. तसे पाहिले तर हा देश किती चिमुकला आहे! सर्व देशाची वस्ती किती? मुंबईच्या एकतृतीयांश! या ३०-३५ लाखांत माओरी किती? जेमतेम ५ लाख. पण हे ५ लाख म्हणजे एक प्रश्नचिन्ह आहे. ही भूमी कोणाची? अति आदर्शवादी भूमिकेवरून पाहिले तर माओरींची. हे इथले आदिवासी रहिवासी. जंगलांच्या आश्रयाने पण आपल्या सांस्कृतिक कल्पनेने शतकानुशतके जीवन कंठणारे वनवासी. समजा, उद्या तेथील वसाहतवाद नष्ट होऊन

भूमी पुन्हा सर्वस्वी भूमिपुत्रांची झाली तर सोन्याच्या खाणी सापडतील? पेट्रोल अधिकाधिक मिळत जाईल? नवे नवे उद्योग आकाराला येतील? सामाजिक सभ्यता (सिव्हिलिझेशन) विकसित होईल? हा देश अधिकाधिक प्रगत होईल? आधुनिक दुनियेत त्याचा मानसन्मान चिरंतन काळ टिकेल? की असे काहीच होणार नाही? शेतीवाडी खुरटत जाईल? जंगलचे कायदे प्रबळ होऊन समाज सुसंस्कृतताही गमावून बसेल? कालचक्र ठप्प होऊन पुन्हा गतार्थ झालेल्या युगात देश लोटला जाईल? त्याच्याकडे बुभुक्षित निष्ठुर नजरा वळतील? त्याच्यावर अनिर्बंध अत्याचार सुरू होतील? जगातील राष्ट्रांच्या मालिकेतून एक फुटका मणी ओघळून पडेल?

विचारांचे असे भिरभिरे मनात भिरभिरू लागले की ध्यानात येते, न्यूझीलंडसारखाच प्रश्न आफ्रिकन राष्ट्रांपुढे उभा राहणार आहे; फिजी आणि पापुआ यांची समस्या अशीच होणार आहे; अमेरिका आणि कॅनडा यांसारखे प्रगत श्रीमंत देशदेखील अशा प्रश्नांमुळे चांगलेच अडचणीत सापडणार आहेत. आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका इतकेच नव्हे तर युरोप आणि उत्तर अमेरिकेत देखील या यक्षप्रश्नाचे उत्तर शोधावेच लागेल. सवंग लोकाभिमुखतेची भूमिका घेऊन कोणाचेच भागणार नाही. काळे आणि गोरे; तथाकथित उच्चवर्णीय नि तुच्छवर्णीय; मूळचे आणि उपरे; भूमिपुत्र आणि अभ्यागत असले भेदाभेद म्हणजे अमंगळ भ्रम आहेत हे कटुसत्य असले तरी सर्वांना पत्करावेच लागेल. मानवाचे अंती एक गोत्र या सूत्राला मान्यता द्यावीच लागेल. हे परिवर्तन शांततेने, समजुतीने, संघर्ष आणि रक्तपात टाळून कसे घडवून आणायचे याचा शोध २१ व्या शतकात घेण्याचा निश्चय सर्व विश्वहितचिंतकांना करावा लागणार आहे.

एका गोष्टीची गंमत वाटते : अशा प्रश्नांची कावकाव मनाला त्रास देऊ लागली की मन सृष्टीची नाना विलसिते अनुभवण्यात सर्व चिंता मिटवू पाहते. ऑकलंडसारख्या शहराच्या भोवती सृष्टिचमत्कार आणि निसर्गसौंदर्य या दोन्हींची लयलूट आहे. आधीच न्यूझीलंड म्हणजे प्रति स्वित्झर्लंड म्हणावे असे सुंदर. हिरव्या वनराया. वृक्षांची सुरम्य तटबंदी लाभलेले सुरेख रस्ते. तरी एक राहिले – न्यूझीलंडच्या अति सुंदर

म्हणता येईल अशा दक्षिण बेटावर जाणे मला शक्यच झाले नाही, पण उत्तर बेटही काही कमी सुंदर नाही. मला हा प्रत्यय यावा म्हणून मायदेव मंडळींनी मला नेले दीडदोनशे मैलांवरील रोटेरुआला. तिथे आहेत गंधकमिश्रित उष्णोदकाची कारंजी. गरम पाण्याच्या दहा झऱ्यांपैकी शेवटच्या झऱ्यातील उकळत्या पाण्यात मक्याची गोड गोड कणसे उकडतात आणि मुशाफिराला मजेदार मेजवानी मिळते. इथे सुप्त ज्वालामुखींची खदखदणारी मुखे आहेत आणि जवळच आहेत हॅमिल्टनसारखी देखणी उपनगरे. डोळ्यांच्या शिंपल्यात मावेल तेवढे अद्‌भुत सौंदर्य भरून घेत आणि दक्षिण ध्रुवावरून येणारा जोरकस शीतल वारा झेलत मी या मुलखाचा निरोप घेतला. एका सुंदर प्रवासस्वप्नाची परिसमाप्ती झाली.

न्यूझीलंड! मी तुला पुन्हा भेटेन, नक्की भेटेन. या जन्मी जमले नाही तर... तर पुढल्या जन्मी!!

ooo

भू-प्रवास

REFBK-0029381